CMYK

SOLAPUR TARUN BHARAT


# सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १८८ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### अमिताभ बच्चन उभारणार धर्मशाळा

**अयोध्या** : मेगास्टार अमिताभ बच्चन यांनी अयोध्येत एका प्रस्तावित धर्मशाळेचा बांधकाम आराखडा 'अयोध्या विकास प्राधिकरणा'कडे सादर केला आहे. ही धर्मशाळा त्यांचे वडील आणि प्रसिद्ध कवी हरिवंशराय बच्चन यांच्या नावाने ओळखली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या प्रस्तावित धर्मशाळेत २० हून अधिक खोल्या असण्याची शक्यता आहे. यामुळे देशाच्या विविध भागांतून अयोध्येला भेट देणाऱ्या भाविकांना राहण्याची सोय आणि इतर सुव्यवस्थित सुविधा उपलब्ध होतील, असे अयोध्या विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष अनुराग जैन यांनी मंगळवारी सांगितले. अयोध्या ज्या भव्य रूपात साकारली जात आहे, त्यात देशभरातील अनेक नामवंत व्यक्तींचे योगदान आहे. याच मालिकेत, प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांनीही एका धर्मशाळेच्या आराखड्यासाठी अर्ज केला आहे. ज्यामध्ये २० हून अधिक खोल्या असतील, असे जैन म्हणाले.

### डंपर-कारच्या धडकेत चार जणांचा मृत्यू

**दिडवाना** : राजस्थानात एका भरधाव डंपरने कारला जबर धडक दिली. यात चार जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना दिडवाना-कुचमन जिल्ह्यातील नवान शहरात बुधवारी सकाळी मित्री बायपासवर घडली. मृतांमध्ये एक जोडपे, त्यांची मुलगी आणि कार चालकाचा समावेश आहे. पोलिसांनुसार, या अपघातात कारचा चक्काचूर झाला आणि मृतदेह आत अडकले होते. मृतदेह बाहेर काढण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. अपघातानंतर डंपर चालक घटनास्थळावरून पळून गेला. पोलिसांनी मृतदेह नवान उप-जिल्हा रुग्णालयाच्या शवागारात नेले. हे कुटुंब बुधवारी सकाळी एका धार्मिक स्थळावरून परत येत होते. नवानहून मित्रीकडे जात असताना नारायणपुराहून नवानकडे वेगाने येणाऱ्या डंपरने कारला धडक दिली.

### हेलिकॉप्टर कोसळले; तिघांचा मृत्यू

**लॉस एंजेलिस** : लॉस एंजेलिसमधील एका भागात मंगळवारी स्थानिक वृत्तवाहिनी एनसीबीचे हेलिकॉप्टर कोसळून त्याला आग लागली. यात तिघांचा मृत्यू झाला. अपघात झाला त्यावेळी वार्ताहर एका कार आणि सिटी बसमधील अपघाताचे वार्तांकन करत होते. लॉस एंजेलिस अग्निशमन दलाच्या माहितीनुसार, सॅन फर्नांडो व्हॅलीतील चॅट्सवर्थ भागात एका इमारतीजवळ हे हेलिकॉप्टर कोसळले. अपघातात दोन जण ठार आणि सहा जण जखमी झाले. एका जखमीला रुग्णालयात नेण्यात आले, परंतु त्याची प्रकृती कशी आहे हे समजू शकले नाही. हेलिकॉप्टरमध्ये किती जण होते, याची माहिती घेण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, असे लॉस एंजेलिस अग्निशमन दलाचे प्रवक्ते कॅप्टन ब्रँडेन सिल्व्हरमॅन यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

# 'मोदीनॉमिक्स' भारताच्या वेगवान आर्थिक विकासाचा पाया

### संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे प्रतिपादन

**कोलकाता, १६ सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मोदीनॉमिक्स' नावाच्या आर्थिक दूरदृष्टीने भारताच्या वेगवान आर्थिक विकासाचा पाया घातला आहे तसेच देश विकास आणि सुशासनाच्या मार्गावर स्थिरपणे वाटचाल करत आहे, असे मत संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी बुधवारी कोलकाता येथे आयोजित पत्रपरिषदेत व्यक्त केले.

सिंह पुढे म्हणाले, मोदींच्या नेतृत्वाखालील भारताची विकासगाथा एका अशा परिसंस्थेमुळे शक्य झाली, जिने देशाच्या 'बौद्धिक शक्ती आणि मनुष्यबळाला' आपली पूर्ण क्षमता वापरण्यास सक्षम केले. २०१४ पूर्वीही भारताकडे बौद्धिक शक्ती आणि मनुष्यबळ दोन्ही होते. परंतु, ते त्यांच्या पूर्ण क्षमतेने काम करत नव्हते. मोदींनी एक अशी परिसंस्था निर्माण केली आहे, जिथे बौद्धिक शक्ती आणि मनुष्यबळ दोन्ही त्यांच्या पूर्ण क्षमतेने काम करू शकतात.



कोलकाता येथील एका पत्रकार परिषदेदरम्यान राजनाथसिंह यांचे स्वागत करताना मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी

**आज भारत 'सुव्यवस्थित-सुशासित'**

संरक्षण मंत्री पुढे म्हणाले, आज भारत 'सुव्यवस्थित आणि सुशासित' आहे.गरिबांच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी असलेला सार्वजनिक पैसा आता मध्यस्थांच्या खिशात जात नाही. देशाच्या वाढत्या संरक्षण निर्यातीवरही प्रकाश टाकत त्यांनी सांगितले की, भारत आता १०० हून अधिक देशांना संरक्षण उपकरणे निर्यात करत आहे. मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगाल विकसित भारताच्या उभारणीच्या ध्येयासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**स्वार्थापेक्षा सेवेची वचनबद्धता कायम**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या भाजपाच्या महिनाभर चालणाऱ्या 'सेवा से संकल्प' मोहिमेबाबत सांगताना सिंह म्हणाले, मोदींच्या 'सेवावृत्ती'च्या संदर्भातही ही मोहीम महत्त्वपूर्ण आहे. गत काही वर्षांत त्यांचे पद, जबाबदाऱ्या आणि भूमिका बदलल्या असल्या तरी, स्वार्थापेक्षा सेवा ही त्यांची वचनबद्धता कायम आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच, यावर्षी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून वंदे मातरम्ची सर्व सहा कडवी गाण्यात आली. हे पश्चिम बंगालप्रती आदराचे प्रतीक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

(वृत्तसंस्था)

## विदर्भातील अष्टविनायक

# पांडवांनी दर्शन घेतलेला वायगावचा सिद्धिविनायक

### उजव्या सोंडेचा गणपती, भक्तांचे श्रद्धास्थान

**संतोष शेंडे**

**टाकरखेडा शंभू, १६ सप्टेंबर**

भातकुली तालुक्यातील श्रीक्षेत्र वायगाव हे धार्मिक श्रद्धेसोबतच पौराणिक आणि ऐतिहासिक वारसा जपणारे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून परिचित आहे. गावातील उजव्या सोंडेच्या सिद्धिविनायकाची अद्भुत गणेशमूर्ती भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असून, दरवर्षी महाराष्ट्रासह शेजारील राज्यांतून हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात.

वायगावच्या सिद्धिविनायकाशी महाभारतकालीन आख्यायिका जोडली गेली आहे. महाभारतातील विराट पर्वाच्या काळात पांडव अज्ञातवासात असताना चिखलदरा परिसरात आले होते. अज्ञातवासाची सांगता करताना परतीच्या प्रवासात त्यांनी वायगाव येथील गणेशमूर्तीचे दर्शन घेतल्याची आख्यायिका आजही सांगितली जाते. त्यामुळे या गणेशस्थानाला धार्मिक श्रद्धेबरोबरच पौराणिक महत्त्व प्राप्त झाले आहे. सुमारे सहा शतकांपूर्वी वायगाव परिसरात खोदकाम सुरू असताना ही गणेशमूर्ती आढळून आल्याचे सांगितले जाते. मुघल आक्रमणाच्या काळात मूर्तीभंजनाची भीती असल्याने मूर्ती सुरक्षित ठेवण्यासाठी ती भूमिगत करण्यात आली होती. अचलपूर, दर्यापूर, खोलापूर आदी भागांत मुघलांची ठाणी असल्याने वायगावातील गणेशमूर्ती बराच काळ भूमिगत ठेवण्यात आल्याचे सांगितले जाते. काळाच्या ओघात इंगोले कुटुंबाच्या घराजवळ ही मूर्ती पुन्हा सापडली. त्यानंतर तिची वाडारूपी मंदिरात प्रतिष्ठापना करण्यात आली. भाविकांची वाढती संख्या आणि श्रद्धेचा ओघ लक्षात घेऊन इंगोले कुटुंबाने पुढाकार घेत ट्रस्टची स्थापना केली. कुटुंबीयांनी स्वतःची शेती



देत भव्य मंदिराची उभारणी केली. सध्या मंदिराचे व्यवस्थापन इंगोले व पाटील कुटुंबातील सदस्यांकडून केले जाते.

वायगाव सिद्धिविनायक मंदिरात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम होत असले तरी, भाद्रपद शुक्ल चतुर्थी ते पौर्णिमा या कालावधीत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गणेश जयंती उत्सवही येथे मोठ्या भक्तिभावाने साजरा होतो.

**मूर्तीचे आगळेवेगळे वैशिष्ट्य**

मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायकानंतर महाराष्ट्रात उजव्या सोंडेची अशी वैशिष्ट्यपूर्ण सिद्धिविनायक मूर्ती वायगाव येथे असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे या मंदिराला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महाभारतकालीन आख्यायिका, शेकडो वर्षांचा इतिहास आणि अखंड भक्तिपरंपरा यांचा संगम असलेले वायगावचे सिद्धिविनायक मंदिर आजही भाविकांसाठी श्रद्धेचे जागृत स्थान आहे.

# शहजाद भट्टी नेटवर्क दहशतवादी संघटना घोषित

### केंद्राची 'यूएपीए'अंतर्गत

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी नेटवर्कला (एसबीएन) केंद्रीय गृह मंत्रालयाने बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत (यूएपीए) दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले आहे.

दहशतवाद खपवून न घेण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेनुसार ही कारवाई करण्यात आली आहे. मंत्रालयाच्या मते, हे नेटवर्क सीमेपलीकडून शस्त्रे, स्फोटके आणि अमली पदार्थांची तस्करीसोबतच तरुण आणि किरकोळ गुन्ह्यांमध्ये सामील असलेल्यांना दहशतवादाकडे आकर्षित करण्यात गुंतले आहे.

मंत्रालयानुसार, शहजाद भट्टीचे नेटवर्क दहशतवादात सामील असून, भारतातील विविध दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा सहभाग आहे. या नेटवर्कचा कथित उद्देश तरुण आणि स्थानिक गुन्हेगारांना आमिष दाखवणे, त्यांना भारतविरोधी कारवायांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणे आणि सीमेपलीकडे शस्त्रे, स्फोटके आणि अमली पदार्थांची तस्करी करणे हा आहे. या माध्यमातून देशाच्या लोकशाही व्यवस्थेला, सामाजिक-जातीय सलोख्याला आणि अंतर्गत सुरक्षेला गंभीर धोका निर्माण केल्याचा आरोप या नेटवर्कवर आहे.

**यादीत समाविष्ट होणारी ४६ वी दहशतवादी संघटना**

केंद्रीय गृह मंत्रालयाने बुधवारी जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेत, यूएपीएच्या कलम ३५(१)(अ) चा वापर करण्यात आला आहे. याअंतर्गत, शहजाद भट्टी नेटवर्कचा यूएपीएच्या पहिल्या अनुसूचीमध्ये समावेश करण्यात आला आहे. या यादीत भारतीय कायद्यानुसार दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलेल्या संघटनांची नावे आहेत. अधिसूचनेनुसार, शहजाद भट्टी नेटवर्क ही या यादीत समाविष्ट होणारी ४६ वी संघटना आहे.

**तरुणांना दहशतवादासाठी केले जाते प्रोत्साहित**

शहजाद भट्टी नेटवर्कने तरुणांना कट्टरपंथी बनवण्यासाठी प्रलोभने आणि इतर पद्धतींचा वापर केल्याचा आरोप आहे. या नेटवर्कवर किरकोळ गुन्ह्यांमध्ये सामील असलेल्या स्थानिक लोकांना दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित केल्याचाही आरोप आहे. एसबीएन इतर प्रतिबंधित संघटना आणि तत्सम नियुक्त संस्थांच्या सहकार्याने भारतविरोधी कारवायांसाठी निधी उभारण्यातही सामील आहे. या नेटवर्कवर हिंसक कारवायांद्वारे सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवल्याचाही आरोप आहे, असेही मंत्रालयाने स्पष्ट केले.

(वृत्तसंस्था)

### खाण कोसळली, ६७ कामगारांचा मृत्यू

**खार्तूम** : सुदानच्या पश्चिम कोर्डोफान प्रांतातील नुहुद शहरालगत अलजारा ही सोन्याची खाण कोसळून ६७ कामगारांचा मृत्यू झाला. ढिगाऱ्यात अजूनही अनेक कामगार अडकले असून, त्यांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे.

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त देशभरात कार्यक्रम

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभारात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १७ सप्टेंबर रोजी ते ७६ वा वाढदिवस साजरा करत आहेत. हा दिवस 'भाजपा सेवा' दिवस म्हणून साजरा करण्यात येत आहे. पंतप्रधानांच्या सार्वजनिक जीवनाला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा दिवस साजरा करण्यात येणार आहे. या अंतर्गत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत देशभरात 'सेवा संकल्प अभियान' राबवले जाईल.



भाजपाने नागरिकांना पंतप्रधानांच्या नावाने घरात 'आशीर्वादाचा दिवा' लावण्याचे आवाहन केले आहे. याशिवाय सेवा आणि जनसहभागाशी संबंधित कार्यक्रम होतील. वडनगर आणि वाराणसी येथून सेवा संकल्प बाईक यात्रा सुरू होईल. तर, विविध राज्यांमध्ये लाभार्थींचे कार्यक्रम, रक्तदान, स्वच्छता आणि इतर कार्यक्रम होतील. मध्यप्रदेशातील उज्जैनमध्ये २५ लाखांहून अधिक दिवे लावले जातील. तर, मुंबईत गेटवे ऑफ इंडियासह १० प्रमुख ठिकाणे दिव्यांनी उजळून टाकली जातील. पंतप्रधानांच्या जन्मस्थान वडनगर येथून सकाळी 'वडनगर ते वाराणसी' सेवा संकल्प बाईक यात्रा निघणार आहे. वाराणसी येथूनही यात्रा निघेल. ही यात्रा १० राज्यांमधील १९३ जिल्ह्यांमधून आणि सुमारे ११५९ गावांतून जाईल. या यात्रेचा समारोप ७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. कोलकाता येथील बोईमेला मैदानावर सुमारे ५० हजार अन्नपूर्णा योजना लाभार्थ्यांना एकत्र आणण्याची तयारी आहे. कोलकातामधील अनेक घाटांवरही दिवे लावले जातील. मुंबईतील १० प्रमुख ठिकाणी रोषणाई करण्याची योजना आहे. यामध्ये गेटवे ऑफ इंडिया, आरे कॉलनी, बाणगंगा, गिरगाव चौपाटी, वांद्रे बँडस्टँड आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यासह इतर ठिकाणांचा समावेश आहे. मिझोराममध्ये १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरपर्यंत 'सेवा संकल्प अभियान' चालेल. (वृत्तसंस्था)


उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी डेहराडून येथे आयोजित 'युवा संकल्प दिवस' कार्यक्रमात पारंपरिक वेशभूषेतील कलावंत

# निमंत्रण देऊनही रहमान 'ब्रिक्स'साठी गैरहजर

■ परराष्ट्र मंत्रालयाची माहिती ■ बांगलादेशचा दावा फेटाळला

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांना ब्रिक्स शिखर परिषद आणि द्विपक्षीय चर्चेसाठी निमंत्रण देण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिमस्टेकचे अध्यक्ष या नात्याने त्यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले होते, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली. रहमान यांना निमंत्रण नसल्याचा बांगलादेश परराष्ट्र मंत्रालयाचा दावा त्यांनी फेटाळला.

रहमान यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर, पंतप्रधान मोदींनी त्यांना द्विपक्षीय भेटीसाठीही आमंत्रित केले होते. तथापि, भेटीच्या तारखा निश्चित करण्याच्या चर्चेतून बांगलादेशने माघार घेतली. ब्रिक्स शिखर परिषदेसाठी भारतीय दूतावासाकडून रहमान यांना बिमस्टेकचे अध्यक्ष म्हणून आमंत्रित केले होते. त्यांना दोनदा निमंत्रण देण्यात आले. मात्र, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही, असे जयस्वाल यांनी सांगितले. बांगलादेश परराष्ट्र मंत्रालयाचा निमंत्रण न मिळाल्याचा दावा निराधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

(वृत्तसंस्था)

**भारतासोबतच्या कराराचा आढावा घेणार**

» बांगलादेशातील रहमान सरकारने भारताविरोधात आपली भूमिका कायम राखत भारतात प्रशिक्षिण घेतलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय भारतासोबत पायाभूत सुविधा क्षेत्रात झालेल्या द्विपक्षीय करारांचा आढावा घेण्याचा निर्णयही त्यांनी घेतला आहे. सत्ताधारी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे (बीएनपी) संसदेतील मुख्य प्रतोद नुरुल इस्लाम मोनी यांनी सांगितले की, आम्ही भारतासोबत झालेल्या १०१ करारांचा आढावा घेत आहे. आवामी लीग सरकारने एका मित्र देशाला झुकते माप देऊन बांगलादेशच्या राष्ट्रीय हिताशी तडजोड केल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

# रिलायन्स फाऊंडेशनकडून तिरुपती देवस्थानमला २५ इलेक्ट्रिक बसेस

### अनंत अंबानींचे वचन पूर्ण

### ब्रह्मोत्सवाच्या काळात नव्या बस दाखल

**तिरुमला, १६ सप्टेंबर**

तिरुमलाला येणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास अधिक आरामदायी आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने रिलायन्स फाउंडेशनने तिरुमला तिरुपती देवस्थानमकडे २५ इलेक्ट्रिक बस सुपूर्द केल्या आहेत. या बससाठी स्वतंत्र ईव्ही चार्जिंग स्टेशनची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या बसांना हिरवा झेंडा दाखवला. नव्या इलेक्ट्रिक बसेसमुळे दरवर्षी तिरुमलाला भेट देणाऱ्या लाखो भाविकांना पर्यावरणपूरक वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांवरील अवलंबित्वही कमी होण्यास मदत होईल. तिरुमलामध्ये ब्रह्मोत्सवाचा उत्सव सुरू असून, यावेळी मोठ्या संख्येने भाविक तिरुमलाला येत असताना या बस सुपूर्द करण्यात आल्या आहेत. रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांनी जून २०२६ मध्ये तिरुमला दौऱ्यादरम्यान तिरुमला तिरुपती देवस्थानमला २५ इलेक्ट्रिक बस देण्याचे वचन दिले होते. अवघ्या तीन महिन्यांत रिलायन्स फाउंडेशनने हे वचन पूर्ण केले आहे. या बससाठी आवश्यक चार्जिंग सुविधा उभारण्यासाठी 'जिओ-बीपी'ने तांत्रिक सहकार्य केले आहे.

दरवर्षी लाखो भाविक भगवान वेंकटेश्वरांच्या दर्शनासाठी तिरुमलाला येतात. त्यांचा प्रवास अधिक आरामदायी करण्यासाठी योगदान देणे हे आमच्यासाठी सौभाग्य आणि जबाबदारी दोन्ही आहे. या २५ इलेक्ट्रिक बस तिरुमला तिरुपती देवस्थानमच्या प्रयत्नांना आमचे छोटेसे योगदान आहे. तिरुमलेश्वराच्या तीर्थयात्रेचा अनुभव अधिक आरामदायी करण्यासोबतच या परिसरातील समृद्ध जैवविविधतेचे संवर्धन करण्याच्या प्रयत्नांना हातभार लावणे, हा यामागचा उद्देश आहे, असे अनंत अंबानी म्हणाले.

(वृत्तसंस्था)

# चंद्रपूरमध्ये रोकडे ज्वेलर्सच्या भव्य शोरूमचा शुभारंभ

**चंद्रपूर, १६ सप्टेंबर**

चंद्रपूरकर गत अनेक वर्षांपासून ज्या क्षणाची वाट पाहत होते, तो क्षण अखेर साकार झाला आहे. दागिन्यांच्या दुनियेत १२४ वर्षांहून अधिक काळाचा विश्वास आणि पाच पिढ्यांचा समृद्ध वारसा लाभलेले नामांकित 'रोकडे ज्वेलर्स'ने चंद्रपूरमध्ये नवीन भव्य बहुमजली शोरूम सुरू केले आहे. यासोबतच शहराच्या ज्वेलरी बाजारपेठेत एक नवा अध्याय जोडला गेला आहे. १५ सप्टेंबरला आयोजित या ऐतिहासिक आणि दिमाखदार सोहळ्याला शहरातील अनेक दिग्गज, प्रभावशाली व प्रतिष्ठित व्यक्तींसह मोठ्या संख्येने ग्राहकांनी हजेरी लावली.

या सोहळ्याचा औपचारिक शुभारंभ रोकडे कुटुंबाचे ज्येष्ठ स्तंभ भैय्याजी रोकडे आणि वंदना भैय्याजी रोकडे यांच्या हस्ते पारंपरिक दीपप्रज्वलन करून करण्यात आला.






याप्रसंगी रोकडे ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक राजेश भैय्याजी रोकडे, संचालक सारंग भैय्याजी रोकडे, संचालक पारस राजेश रोकडे, संचालिका अनामिका राजेश रोकडे, संस्कृती सारंग रोकडे यांच्यासह अनेक मान्यवर होते. या सर्वांनी रोकडे परिवाराला या नवीन प्रवासासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या.

**एकाच छताखाली दागिन्यांचे अथांग विश्व**

हे बहुमंजली शोरूम चंद्रपूर शहरातील प्रमुख भाग गिरनार चौकात साकारले आहे. हे शोरूम केवळ दागिन्यांच्या खरेदीचे केंद्र नसून, ग्राहकांना एक आधुनिक, प्रीमियम आणि जागतिक दर्जाचा शॉपिंग अनुभव देण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. या शोरूममध्ये ग्राहकांसाठी गोल्ड, डायमंड, पोलकी, कुंदन, ब्राइडल आणि फाईन सिल्वर ज्वेलरीचे अत्यंत आकर्षक आणि नवनवीन कलेक्शन उपलब्ध आहे. पारंपरिक भारतीय दागिन्यांपासून ते आधुनिक डिझाइन्सपर्यंत, विविध सण-उत्सव आणि आवडीनुसार एक विस्तृत रेंज येथे पाहायला मिळेल.

(तभा वत्तसेवा)

### १२४ वर्षांचा विश्वास पुढे नेण्याचा संकल्प

या सुवर्णप्रसंगी रोकडे ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक राजेश रोकडे यांनी चंद्रपूरकरांचे आभार मानत म्हटले की, ग्राहकांचा विश्वास हीच रोकडे ज्वेलर्सची सर्वात मोठी पुंजी आहे. संस्थेची प्राथमिकता नेहमीच शुद्धता, पारदर्शकता आणि उत्कृष्ट डिझाईनच्या माध्यमातून ग्राहकांना सर्वोत्तम अनुभव देण्याची राहिली आहे. १२४ वर्षांपासून कायम असलेला विश्वास आणि पाच पिढ्यांचा वारसा पुढे नेत आता चंद्रपूरकरांना आपल्या आनंदाच्या क्षणांसाठी, विवाह सोहळा आणि कौटुंबिक उत्सवांसाठी शहरातच जागतिक दर्जाच्या दागिन्यांची विस्तृत शृंखला उपलब्ध होणार आहे.

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित






## विचारपुष्प



समाज केवळ व्यक्तींची बेरीज नव्हे, त्याहून काहीतरी अधिक आहे. ज्याप्रमाणे कुटुंब व्यक्तींपासून बनते, परंतु ते व्यक्तींचा केवळ समूह नसून, त्याहून काहीतरी अधिक आहे. ते एक जैविक अस्तित्व आहे.

**- स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# ‘ईपीएफओ’ वेतन मर्यादेत २५ हजारांपर्यंत वाढ



**मोदींकडून कर्मचाऱ्यांना वाढदिवसानिमित्त भेट | केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय | ५१ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना फायदा | योजनेसाठी दरवर्षी ११,३३९ कोटींचा खर्च | सामाजिक सुरक्षा होणार अधिक मजबूत**



### कसा होणार फायदा ?

- दरमहा २५,००० रुपयांपर्यंत कमावणारे सर्व कर्मचारी ईपीएफओच्या कक्षेत येतील.
- भविष्य निर्वाह निधी व निवृत्तीवेतन यासारखे लाभ मिळतील.
- सध्याचा वार्षिक भार १०,२५० कोटी रुपये आहे, तर आता ११,३३९ कोटींचा खर्च करावा लागेल
- पुढील पाच वर्षांत एकूण खर्च ५६,६९६ कोटी असेल.
- कर्मचाऱ्यांना ईपीएफओ विम्याचा लाभ मिळणार आहे. ■

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा मिळण्याच्या उद्देशाने कर्मचारी भविष्य निधीच्या (ईपीएफओ) लाभासाठीची मासिक वेतन मर्यादा १५ हजार रुपयांवरून २५ हजार रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

यामुळे पीएफ बचत आणि निवृत्ती वेतनाच्या माध्यमातून ५१ लाख कर्मचाऱ्यांना थेट फायदा होणार आहे, शिवाय पीएफ कपातीमुळे कर्मचाऱ्यांची बचत वाढेल आणि एक मोठा सेवानिवृत्ती निधी उपलब्ध होईल. या योजनेसाठी केंद्र सरकार दरवर्षी ११,३३९ कोटींचा निधी उपलब्ध करून देणार आहे. लाखो कर्मचाऱ्यांना ईपीएफच्या कक्षेत आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रपरिषदेत दिली. या निर्णयामुळे खासगी कंपन्यांना आता २५ हजारांपर्यंत मूळ वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांचा पीएफच्या कक्षेत समावेश करणे बंधनकारक असेल. यामुळे पीएफ बचत आणि निवृत्ती वेतनाच्या माध्यमातून ५१ लाख कर्मचाऱ्यांना थेट फायदा होईल. यापूर्वी, पंधरा हजारपेक्षा जास्त मूळ वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी पीएफ कपात करणे हे त्यांच्या विवेकाधीन होते.

नवीन आदेशामुळे, पीएफ कपातीमुळे कर्मचाऱ्यांची बचत वाढेल आणि एक मोठा सेवानिवृत्ती निधी उपलब्ध होईल. हा नवीन बदल गेल्या काही वर्षांतील सातत्यपूर्ण वेतनवाढ, वाढते उत्पन्न आणि औपचारिक रोजगाराच्या विस्ताराचे प्रतिबिंब आहे. वैष्णव म्हणाले, जर एखाद्या कर्मचाऱ्याचा मूळ पगार अधिक महागाई भत्ता (डीए) २५ हजार किंवा त्यापेक्षा कमी असल्यास, कंपनीला त्या कर्मचाऱ्याचा ईपीएफ मध्ये समावेश करणे बंधनकारक असेल. १५ हजारांपेक्षा जास्त मूळ पगार असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी हे ऐच्छिक होते.

**१२ वर्षांनंतर सुधारणा**

वेतन मर्यादेतील सुधारणा १२ वर्षांनंतर करण्यात आली आहे. २००४ ते २०१४ पर्यंत ईपीएफओची वेतन मर्यादा अपरिवर्तित होती. मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर सप्टेंबर २०१४ मध्ये ती १५ हजारांपर्यंत वाढवण्यात आली होती. सातत्यपूर्ण वेतनवाढ, वाढते उत्पन्न आणि औपचारिक रोजगाराचा विस्तार प्रतिबिंबित करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. कामगारांसाठी एक मजबूत सामाजिक सुरक्षा जाळे तयार करण्याच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे आहे. या निर्णयामुळे अधिक कामगारांना संघटित क्षेत्राचे संरक्षण मिळेल.

**सामाजिक सुरक्षा म्हणजे काय ?**

सामाजिक सुरक्षा म्हणजे कर्मचारी भविष्य निधी (ईपीएफ), कर्मचारी निवृत्तीवेतन योजना (ईपीएस) आणि ईपीएफओची विमा संरक्षण योजना होय. सध्याच्या प्रणालीनुसार, २० किंवा अधिक कर्मचारी असलेल्या पात्र कंपन्यांमधील, दरमहा १५ हजार रुपयांपर्यंत मूळ वेतन मिळवणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपरोक्त योजनेत समाविष्ट करणे अनिवार्य होते. परंतु, आता तसे होणार नाही. नवीन मर्यादा लागू झाल्यानंतर, २५ हजारांपर्यंत मूळ वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी ईपीएफ, ईपीएसमध्ये सामील होणे अनिवार्य असेल.

**हातात येणाऱ्या पगारावरही परिणाम**

नवीन मर्यादेच्या अंमलबजावणीमुळे ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन १५ हजार ते २५ हजारांच्या दरम्यान आहे, त्यांच्या हातात येणाऱ्या पगारावर परिणाम होऊ शकतो. या कर्मचाऱ्यांचा एपीएफमध्ये सहभाग झाल्याने त्यांच्या पगारातून १२ टक्के रक्कम पीएफमध्ये वळती होणार आहे.

◂ (वृत्तसंस्था)

## मानाच्या पाणीवेस गणपती



## आज ज्येष्ठा गौरी आवाहन






## महत्त्वाचे

### बाजारातील मंदीला पूर्णविराम

**मुंबई :** गुंतवणूकदारांची चौफेर खरेदी आणि घसरलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे भारतीय शेअर बाजाराने सलग दोन दिवसांच्या घसरणीला ब्रेक लावला. आंतरराष्ट्रीय बाजारातील संमिश्र संकेतांच्या पृष्ठभूमीवर बुधवारी ‘निफ्टी’ने २३,२०० चा टप्पा ओलांडला. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या पतधोरण बैठकीच्या निकालापूर्वी बाजारात काहीसे सावधतेचे वातावरण होते. सुरुवातीच्या सत्रात बाजारावर काही प्रमाणात दबाव पाहायला मिळाला. मात्र, एफएमसीजी, रियल्टी आणि फायनान्शियल शेअर्समधील तेजीने बाजाराला सावरले. दिवसभराच्या व्यवहारअखेर सेन्सेक्स ३३२ अंकांनी वाढून ७४,३३६ वर बंद झाला. निफ्टीमध्ये ९९ अंकांची वाढ नोंदवली गेली असून, तो २३,२१७ च्या पातळीवर स्थिरावला. मुख्य निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्सची कामगिरी संथ राहिली.

### जरांगे आंदोलनावर ठाम, उद्या मुंबईकडे

**बीड :** राज्यात मराठा आरक्षणावरुन वातावरण तापले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आंदोलनावर ठाम असून, शुक्रवारी ते आपल्या निवडक समर्थकांसह मुंबईला निघतील, अशी घोषणा त्यांनी बुधवारी पत्रपरिषदेत केली. मला मुंबईत येण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला, तर मराठ्यांना मुंबईत बोलावू, असा इशाराही त्यांनी दिला आहे. सरकारकडून पाठवण्यात आलेल्या ड्राफ्टवर सध्या चर्चा सुरू आहे. हैदराबाद गॅझेटनुसार मराठ्यांच्या नावांच्या नोंदी सापडल्याचा दावा जरांगे यांनी केला. या नोंदींच्या आधारे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करावी, तसेच नऊ सप्टेंबरच्या जीआरप्रमाणे हैदराबाद गॅझेटचा सुधारित जीआर तातडीने काढावा, अशी मागणी त्यांनी केली. ■

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# झीरम खोरे हत्याकांडातील १० माओवाद्यांना मृत्युदंड

## एनआयए न्यायालयाचा १३ वर्षांनंतर निकाल, २९ जणांच्या हत्येत ठरवले दोषी

**रायपूर, १६ सप्टेंबर**

काँग्रेस परिवर्तन यात्रेच्या ताफ्यावर २५ मे २०१३ रोजी झालेल्या हल्ल्यात २९ जणांचा बळी घेणाऱ्या सर्व दोषी दहा माओवाद्यांना जगदलपूर येथील एनआयए न्यायालयाने बुधवारी फाशीची शिक्षा सुनावली आहे.

जवळपास १३ वर्षे चाललेल्या खटल्यात १०१ साक्षीदारांचे जबाब आणि एनआयएने सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे विशेष न्यायाधीशांनी ५ सप्टेंबर रोजी दोन महिलांसह १० आरोपींना दोषी ठरवले होते आणि शिक्षेबाबतचा निर्णय १६ सप्टेंबरपर्यंत राखून ठेवला होता. बुधवारी न्यायालयाने क्रूर हत्याकांड प्रकरणाचा निकाल जाहीर केला.

साक्षीदारांचे जबाब आणि पुराव्याच्या आधारे नागरिकांवर बेछूट गोळीबार करणाऱ्या दहा माओवादी क्रूर कृत्यासाठी दोषी असून, त्यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात येत आहे, असे न्यायालयाने म्हटले. दोषींना ३० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अपील करण्याचा अधिकार आहे. युक्तिवाद करताना फिर्यादी पक्षाने गुन्हेगारांना मृत्युदंडाची शिक्षा देण्याची मागणी केली होती, तर बचाव पक्षाने मानवतेचा दाखला देत कमीत कमी शिक्षा द्यावी अशी मागणी केली होती. माओवाद्यांनी आयईडी स्फोट घडवून जंगलातून जाणाऱ्या ताफ्यावर गोळीबार केला होता. यावेळी माओवाद्यांनी राजकीय नेते आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना वेगळे केले. या हल्ल्यात तत्कालीन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नंदकुमार पटेल, महेंद्र कर्मा आणि माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ला यांचा मृत्यू झाला होता.

**हल्ला नियोजनबद्ध**

हा हल्ला अचानक केलेला नव्हता. माओवाद्यांनी अनेक आठवड्यांपासून तयारी केली होती. तत्कालीन रमण सिंह यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने हल्ल्याच्या दोन दिवसांच्या आत तपास एनआयएकडे सोपवला. सरकारने चौकशीसाठी छत्तीसगड उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्या. प्रशांत कुमार मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली न्यायिक आयोगही स्थापन केला होता. ◂ (वृत्तसंस्था)



‘ग्लोबल फिनटेक फेस्ट-२०२६’मध्ये एनईटीसी फास्टॅगच्या पोर्टेबिलिटीला बळकटी देण्यासाठी ‘वन टॅग’चे अनावरण करताना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी

### दिशा सालियन प्रकरणाचा तपास सीमा पाहुजांकडे

**मुंबई :** दिशा सालियन मृत्यू प्रकरणी सीबीआयने नव्याने एफआयआर दाखल केल्यानंतर याचा तपास सुवर्णपदक विजेत्या महिला पोलिस अधीक्षक सीमा पाहुजा यांच्याकडे सोपवला आहे. ■


# सेन्सॉर बोर्डाच्या नवीन समितीची घोषणा

## पद्मश्री रमेश पतंगे, वामन केंद्रे, पंकज त्रिपाठी, प्रीती झिंटाचा समावेश

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ अर्थात् सेन्सॉर बोर्डाची पुनर्रचना करीत बुधवारी नवीन १८ सदस्यीय समितीची घोषणा केली.

केंद्र सरकारने बुधवारी जारी केलेल्या अधिसूचनेत चित्रपट, दूरदर्शन, संगीत आणि कला क्षेत्रातील अनेक प्रमुख व्यक्तींचा समावेश आहे.



सिनेमॅटोग्राफ कायद्यांतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकारने मंडळाची पुनर्रचना केली असून, नवीन समितीत ‘तरुण भारत’चे स्तंभलेखक पद्मश्री रमेश पतंगे, अभिनेत्री प्रीती झिंटा, अभिनेता सुनील शेट्टी, टीव्ही कलाकार रूपाली गांगुली, पल्लवी जोशी, पंकज त्रिपाठी आणि ज्येष्ठ बंगाली चित्रपट अभिनेते प्रसेनजीत चॅटर्जी यांसारख्या प्रमुख व्यक्तींचा समावेश आहे. इतर सदस्यांमध्ये विनोद अनुपम, मनोज जोशी, अभिषेक जैन, रिकी केज, प्रियदर्शन, हंसराज हंस, सुप्रिया यरलागड्डा, यतिंद्र मिश्रा, नीला माधव पांडा, निशिगंधा वाड, वामन केंद्रे यांचाही समावेश करण्यात आला आहे. नवीन मंडळाचा कार्यकाळ पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून पुढील तीन वर्षांसाठी किंवा पुढील आदेश येईपर्यंत असेल.

◂ (वृत्तसंस्था)

# पक्ष वैयक्तिक मालमत्ता असल्यासारखे ठाकरे वागायचे

**शिंदेंच्या वकिलांचा सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद**

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

शिवसेनेचे नेतृत्व उद्धव ठाकरे की एकनाथ शिंदे यांनी करावे यावरून फूट पडली नाही. तर उद्धव यांनी शिवसेनेची विचारधारा बाजूला सारून काँग्रेस सोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने ती फूट पडली.उद्धव यांनी पक्षांतर्गत लोकशाही कधीच मानली नाही. ते पक्ष हा वैयक्तिक मालमत्ता असल्यासाखे वागले, असा युक्तिवाद ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल यांनी बुधवारी एकनाथ शिंदे यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात केला.

शिंदेंची बाजू मांडताना कौल पुढे म्हणाले, तत्कालीन परिस्थिती पाहता निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष एकनाथ शिंदेंना देण्याचा निर्णय घेतला, तो योग्यच होता. सादिक अली प्रकरणापासून हा निकष कशा प्रकारे विकसित झाला आणि निवडणूक आयोगाने प्रत्येक प्रकरणात तो कसा लागू केला, याचा विचार करावा. प्रत्येक जण म्हणतो की, आम्ही पक्षाच्या घटनेचे पालन करतो. जेव्हा पक्षाच्या संघटनात्मक रचनेचे परीक्षण करतो, तेव्हा काय दिसते तर, हा पक्ष हुकूमशाही पद्धतीने चालवला जातो. पक्षाच्या दोन तृतीयांशपेक्षा जास्त सदस्यांची नियुक्ती पक्षाध्यक्षांकडून केली जाते. निवडणूक आयोगाने अखेरीस असा निष्कर्ष काढला की, या प्रकरणातील विशिष्ट आणि असामान्य परिस्थिती लक्षात घेता, विधिमंडळातील बहुमत हा व्यवहार्य निकष होता. सुभाष देसाई प्रकरणात विधिमंडळातील बहुमताच्या निकषाचा विचार करण्यास मनाई करण्यात आली आहे, असे सूचित करणे पूर्णपणे दिशाभूल करणारे आहे, असेही कौल यांनी सांगितले.

**पक्षातील अंतर्गत लोकशाहीचा प्रश्न महत्त्वाचा**

कौल पुढे म्हणाले, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ शिवसेनाप्रमुख पद गोठवण्यात आले. त्यानंतर पक्षप्रमुख पद निर्माण करण्यात आले. बाळासाहेबानंतर पक्षाला चांगल्या उत्तरदायित्वाची अपेक्षा होती. मात्र, उद्धव ठाकरेंकडून ती पूर्ण झाली नाही. ठाकरे यांनी पक्षाला वैयक्तिक व्यवस्थेप्रमाणे वापरण्याचा प्रयत्न केला. ◂ (वृत्तसंस्था)

# अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

## ❙ मालगुडी डेजमुळे मिळाली प्रसिद्धी ❙ ‘केजीएफ’, ‘केजीएफ-२’ या चित्रपटांमध्येही केले काम

**मुंबई, १६ सप्टेंबर**

भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानासाठी ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात येणार आहे. भारत सरकारने बुधवारी यासंदर्भात घोषणा केली. २२ सप्टेंबरला गुजरातच्या केवडिया येथे आयोजित होणाऱ्या ७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात अनंत नाग यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

दरवर्षी भारतीय चित्रपटसृष्टीतील अविस्मरणीय आणि उत्कृष्ट योगदानाबद्दल एका पुरस्काराने सन्मानित केले जाते. हा पुरस्कार भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान मानला जातो. यंदा ज्येष्ठ कन्नड चित्रपट अभिनेते अनंत नाग यांना या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत मुख्य नोडल एजन्सी असलेल्या प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने आपल्या सोशल मीडियावर अनंत नाग यांचा एक फोटो शेअर केला आणि लिहिले की, ‘दादासाहेब फाळके पुरस्कार जाईल.’



**३०० हून अधिक चित्रपटांमध्ये केला अभिनय**

अनंत नाग हे एक ज्येष्ठ अभिनेते आणि राजकारणी आहेत. ते कन्नड चित्रपटसृष्टीतील त्यांच्या उत्कृष्ट योगदानासाठी ओळखले जातात. अनंत यांनी आपल्या कारकीर्दीत ३०० पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये काम केले आहे. कन्नड व्यतिरिक्त, त्यांनी हिंदी, तेलुगू, तमिळ, मराठी आणि मल्याळम् चित्रपटसृष्टीतही काम केले आहे. २०२५ मध्ये सन्मान, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित झालेले अनंत नाग यांचे खरे नाव अनंत नागरकट्टे आहे. अनंत यांना दूरदर्शनवरील घराघरात लोकप्रियता मिळाली. त्यांनी यशच्या ‘केजीएफ’ आणि ‘केजीएफ-२’ या ब्लॉकबस्टर चित्रपटांमध्येही काम केले आहे.

### पंतप्रधान मोदींची ‘एक्स’वर पोस्ट

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनंत नाग यांचे अभिनंदन केले आहे. मोदींनी ट्विटरवर लिहिले की, अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन. त्यांचे उत्कृष्ट काम आणि सहजसुंदर अभिनयाने अनेक दशकांपासून भारतीय चित्रपटसृष्टीवर, विशेषतः कन्नड चित्रपटसृष्टीवर, एक खोल ठसा उमटवला आहे. त्यांनी आपल्या पात्रांमध्ये जिवंतपणा आणला आहे. ते खरोखरच या पुरस्कारासाठी पात्र आहेत. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# 'या' शुल्काचा फेरविचार व्हावा...

गेल्या दशकात भारताने तंत्रज्ञान आणि विशेषतः 'डिजिटल' अर्थव्यवस्थेत ज्या प्रचंड वेगाने झेप घेतली, ती प्रगत राष्ट्रांनाही अचंबित करणारी आहे. एकेकाळी साधी बँकिंग सेवा केवळ उच्चभ्रू आणि शहरी भागापुरती मर्यादित मानली जात होती, त्याच देशातील गल्लीबोळातल्या भाजी विक्रेत्यापासून ते थेट पंचतारांकित हॉटेल्स आणि आलिशान मॉल्सपर्यंत प्रत्येक ठिकाणी आज 'डिजिटल पेमेंट'साठी एकच आवाज ऐकू येतो, 'स्कॅन कोड द्या...'. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) विकसित केलेल्या 'युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस' अर्थात 'युपीआय' यंत्रणेने भारताच्या आर्थिक व्यवहारांत अभूतपूर्व अशी क्रांती घडवून आणली आहे. हे जाळे इतक्या सहज आणि पारदर्शकपणे विणले गेले की, दशकानुदशके रोख रकमेवर चालणारी भारतीय अर्थव्यवस्था अवघ्या काही वर्षांत रोखविरहित व्यवहाराच्या आघाडीवर जगात अग्रेसर ठरली. उत्तम वेग, पारदर्शकता आणि डिजिटल स्वरुपामुळे 'युपीआय' हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य अंग झाले आहे.

गेल्या सहा वर्षांपासून 'युपीआय'च्या ही संपूर्ण यंत्रणा नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत होती. परंतु, 'एनपीसीआय'ने नुकत्याच घेतलेल्या निर्णयाने हा यशस्वी डिजिटल प्रवास काहीसा संथावतो की काय, असे वाटू लागले आहे. येत्या १५ ऑक्टोबरपासून व्यावसायिक संस्था आणि व्यापाऱ्यांसाठी २ हजार रुपयांपेक्षा अधिकच्या युपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के इतके शुल्क आकारले जाणार आहे. तसेच ७५ हजार रुपयांपेक्षा जास्तीच्या व्यवहारांसाठी हे शुल्क ३०० रुपयांपर्यंत मर्यादित ठेवले गेले आहे. तांत्रिकदृष्ट्या हे शुल्क व्यापाऱ्यांवर लादले जात असल्याचे आणि दोन व्यक्तींमधील वैयक्तिक व्यवहार यातून मुक्त असल्याचे दिसत असले, तरी शेवटी या शुल्काचा अंतिम फटका सर्वसामान्य नागरिकांनाच बसणार आहे, हे समजून घेतले पाहिजे.

'युपीआय'च्या अथांग आणि अवाढव्य विस्ताराची आकडेवारी थक्क करून सोडणारी आहे. वित्तीय वर्ष २०२५-२६ च्या ताज्या अहवालानुसार, भारतात एका वर्षात तब्बल २४ हजार १६२ कोटींपेक्षा जास्त युपीआय व्यवहार पार पडले, ज्यांचे एकूण मूल्य सुमारे ३१४ लाख कोटी रुपयांच्या घरात आहे. दररोज सरासरी ६६ कोटींहून अधिक व्यवहार या यंत्रणेद्वारे केले जातात. जगभरातील एकूण रिअल-टाईम डिजिटल व्यवहारांपैकी एकट्या भारताचा वाटा सुमारे ४९ टक्के एवढा जास्त आहे. एवढी अवाढव्य यंत्रणा चालवण्यासाठी सरकार, बँका आणि फिनटेक कंपन्यांना खर्च येत असेल. संसदीय वित्तीय समिती आणि उद्योग क्षेत्राच्या अंदाजानुसार, संपूर्ण युपीआयचे 'इकोसिस्टम' सुरळीत चालवण्यासाठी वर्षाला साधारणतः १५ हजार ते २० हजार कोटी रुपयांचा देखभाल व तांत्रिक खर्च येतो. मात्र, हा खर्च दिसायला मोठा वाटत असला, तरी प्रत्येक व्यवहाराचा विचार केला तर हा खर्च अवघा ५ ते १० पैसे इतका अत्यल्प आहे. वार्षिक ३१४ लाख कोटी रुपयांच्या प्रचंड व्यवहारांशी तुलना केली, तर २० हजार कोटी रुपयांचा खर्च फारच कमी. एवढा नगण्य खर्च भागवण्यासाठी युपीआय व्यवहारांवर थेट शुल्काचा बोजा कशासाठी? येत्या काळात हा प्रश्न सर्वसामान्यांना अस्वस्थ करणार ठरू शकतो. त्यावर सरकार आणि 'एनपीसीआय'चा युक्तिवाद असा आहे की, या शुल्कातून सर्वसामान्य व्यक्तींच्या व्यवहाराला पूर्णपणे वगळण्यात आले आहे; जेणेकरून त्यांच्यावर या शुल्काचा भुर्दंड बसणार नाही. केवळ २ हजार रुपयांवरील व्यावसायिक व्यवहारांवरच हे शुल्क लागू असेल. खरे तर हा केवळ कागदी आणि तांत्रिक युक्तिवाद आहे. भारताच्या करप्रणालीचा आणि व्यापारी मानसिकतेचा आजवरचा इतिहास सांगतो की, जेव्हा जेव्हा सरकार व्यापाऱ्यांवर किंवा उद्योगांवर कोणताही कर किंवा शुल्क लादते, तेव्हा तो कर व्यापारी आपल्या स्वतःच्या नफ्यातून किंवा खिशातून कधीही देत नाहीत. तो ग्राहकांकडूनच वसूल करतात. आधीचा 'सेल्स टॅक्स' असो, किंवा जीएसटी असो, शेवटी सारा भार सर्वसामान्य नागरिकांच्याच मानगुटीवर बसला आहे. एवढ्यावर व्यापाऱ्यांचे समाधान होत नाही. पुढे 'सरचार्ज' किंवा 'सर्व्हिस चार्ज'च्या नावाखाली ते नागरिकांना लुटतात. आजवरचा हा कटू अनुभव विचारात घेतला, तर १५ ऑक्टोबरनंतरही हेच घडणार असे दिसते. व्यावसायिक आस्थापना २ हजार रुपयांवरील युपीआय व्यवहारांवर लागणारा ०.४ टक्के 'एमडीआर' स्वतः सहन करणार नाहीत. ते ग्राहकाला एकतर रोख पैसे मागतील किंवा वस्तूच्या देयकात छुप्या मार्गाने ते ५ ते १० रुपये जोडून घेतील. धोरणकर्त्यांसाठी, युपीआय कंपन्यांसाठी, बँकांसाठी आणि व्यापाऱ्यांसाठी ५ किंवा १० रुपयांची रक्कम क्षुल्लक असेलही; परंतु भारतातील बहुसंख्य गरीब, मध्यमवर्गीय आणि हातावर पोट असणाऱ्या सामान्य जनतेसाठी दैनंदिन व्यवहारातील ५-१० रुपयांचे मूल्य फार मोठे असते. किराणा सामान, औषधे, कपडे किंवा दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करताना हा ५-१० रुपयांचा भुर्दंड वारंवार बसू लागला, तर महागाईच्या विळख्यात आधीच पिचलेल्या सामान्य जनतेला त्रास होणार.

याहीपेक्षा या सशुल्क धोरणाचा घातक परिणाम म्हणजे, केंद्र सरकारने गेल्या दशकात ज्या मूळ धोरणात्मक उद्देशासाठी युपीआयची यंत्रणा उभारली आहे, त्या उद्देशालाच नख लागू शकते. 'डिजिटल इंडिया' आणि 'कॅशलेस इकॉनॉमी'च्या संकल्पनेलाही धक्का बसेल. अर्थव्यवस्थेचे अधिकाधिक औपचारिकीकरण व्हावे यासाठी देशातील रोख व्यवहारांचे प्रमाण कमी व्हावे, समांतर अर्थव्यवस्था (ब्लॅक मनी) रोखली जावी आणि अर्थव्यवस्थेत पारदर्शकता यावी, हा खरा उद्देश होता. तो यशस्वी होण्याच्या मार्गावर आहे. पण युपीआय व्यवहारांवर शुल्क आकारणे सुरू झाले तर त्याला खीळ बसू शकते. या शुल्कातून वाचण्यासाठी सर्वसामान्य नागरिक आणि छोटे व्यापारी पुन्हा एकदा रोख व्यवहाराकडे वळू शकतात. आधीच, रोखीने व्यवहार केले तर पैसे कमी खर्च होतात, अशी लोकांची मानसिकता आहे. आता युपीआयवर नाममात्र का होईना, पण शुल्क लागणार असेल, तर ही मानसिकता अधिक दृढ होईल. जुना पायंडा समाज स्वीकारेल आणि तो युपीआयच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे विसंगत ठरेल. त्यामुळेच यावर अत्यंत समतोल आणि वास्तववादी मार्ग काढणे गरजेचे आहे आणि ते शक्यही आहे. डिजिटल पेमेंटचे जाळे आहे तसे जपणे आणि त्याचवेळी सामान्य जनतेचे रक्षण करणे असा सुवर्णमध्य साधला गेला पाहिजे. १ लाख रुपयांपर्यंतचे सर्व प्रकारचे युपीआय व्यवहार हे पूर्णपणे मोफत आणि शुल्कमुक्त ठेवले पाहिजे. जीवनावश्यक वस्तू, वैद्यकीय खर्च, शिक्षण, रेशन, वाहतूक आणि शेतीविषयक अवजारे यांच्या खरेदीला या शुल्कातून वगळले पाहिजे. युपीआय यंत्रणेचा खर्चाच भागवायचा आणि त्यासाठी शुल्क आकारायचेच असेल, तर ते उच्चभ्रू आणि चैनीच्या व्यवहारांवर आकारले जावे. उदाहरणार्थ, दागदागिने (ज्वेलरी), महागड्या गाड्या, महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि पंचतारांकित सेवा यासारख्या उच्चमूल्य व्यवहारांवर ते आकारले जावे. खर्चाच भरून काढायचा तर तिथून मिळणाऱ्या उत्पन्नातून युपीआय यंत्रणेचा वार्षिक २० हजार कोटी रुपयांचा खर्च सहज भागवता येऊ शकतो. सर्वसामान्यांच्या रोजच्या गरजांवर ही नवी डिजिटल कराची कुऱ्हाड चालवणे योग्य नाही. सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करून व्यवहार्य आणि दिलासादायक निर्णय घ्यावेत. सरकारकडे भरपूर पर्याय आहेत. त्यांचा प्राधान्याने विचार करावा. सरकारी खर्चात कपात करावी, फुकटगिरीची सवय लावणाऱ्या योजनांना कात्री लावावी. पण, असे शुल्क लादू नये. आता ते नाममात्र वाटते. ते भविष्यात वाढू शकते. तसे झाले तर सरकारचा पुढाकार व नागरिकांचे सहकार्य तसेच सर्वांच्या मेहनतीने, विश्वासाने उभारलेली ही अद्भुत अशी युपीआय यंत्रणा मंदावेल. आपली अर्थव्यवस्था पुन्हा एकदा 'कॅश'च्या जुन्या युगात ढकलली जाईल. अर्थव्यवस्थेचे औपचारिकीकरण मंदावले तर काय-काय तोटे होतात, हे सरकारला सांगणे न लगे! ■

# उभारणी प्रक्रियेतून शिकणारे राष्ट्र

**श्रीधर वेम्बू**

डीप टेक तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारताची क्षमता ज्या वेगाने विकसित होत आहे, त्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दूरदृष्टी आणि वचनबद्धतेचा वाटा मोठा आहे. खरे तर भारत आज ज्या-ज्या गोष्टी उभारतो आहे, १५ वर्षांपूर्वी त्यापैकी बहुतांश गोष्टींना अव्यवहार्य असा शिक्का मारून धुडकावून लावले गेले असते. एखाद्या खाजगी भारतीय कंपनीने अंतराळ कक्षेत सोडलेले रॉकेट असो, भारतीय भूमीवरील सेमीकंडक्टरचा कारखाना असो, देशातच डिझाईन करून परदेशात विकली जाणारी संरक्षण प्रणाली असो किंवा मायदेशातच तयार झालेल्या आधुनिक ट्रेन असो... अशा सगळ्यांच गोष्टींसाठी मिळणारे नेहमीचे उत्तर हेच असायचे की, भारतासाठी ही संधी आता निघून गेली आहे, हे तंत्रज्ञान खूप कठीण आहे, यासाठी खूपच भांडवल लागणार आहे आणि इतर देश या शर्यतीत खूप पुढे निघून गेले आहेत.

कायमच असे उत्तर सहज दिले जायचे. मात्र केवळ आर्थिक परिस्थिती अनुकूल होण्याची वाट पाहत बसल्याने कोणताही देश सक्षम बनत नाही तर कामाला प्रत्यक्ष सुरुवात करून, सुरुवातीचे अपयश पचवून तसेच कौशल्ये आणि क्षमता उत्तरोत्तर वृद्धिंगत होईपर्यंत त्या आव्हानाला सातत्याने भिडूनच देश खऱ्या अर्थाने सक्षम बनतो, हेच वास्तव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही गोष्ट फार पूर्वीच ओळखली आणि त्या दृष्टीने ठोस कृती केली आणि आता आपण त्याचेच सकारात्मक परिणाम पाहू शकत आहोत.

आत्मनिर्भरतेचा नेमका अर्थ काय, हे आपण आधी नीट समजून घेतले पाहिजे. आत्मनिर्भरता म्हणजे काही प्रत्येक स्क्रू स्वतःच्याच देशात बनवणे किंवा जगासोबत काम करायला नकार देणे असे नाहीच; त्याउलट आपल्याला आत्मविश्वासाने जगाशी व्यवहार करता यावा या ध्येयाने, आपण ज्या गोष्टी वापरतो त्यांची अभिनव निर्मिती करणे, त्यांची अभियांत्रिकी रचना करणे आणि त्यात सुधारणा करण्याची क्षमता स्वतःमध्ये निर्माण करणे म्हणजे आत्मनिर्भरता.

सेमीकंडक्टर हे क्षेत्र याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. आपल्याकडे चिप डिझाईन करणाऱ्यांची मोठी व्यवस्था आधीपासूनच आहे. असे असूनही चिपची प्रत्यक्ष निर्मिती हा या साखळीतील महत्त्वाचा टप्पा आपण आजवर कधीही गाठू शकलेलो नव्हतो. पण आता ही दरीही दूर होतेय, ढोलेरा इथे टाटा इलेक्ट्रॉनिक्सचा ९१,००० कोटी रुपयांचा प्रकल्प उभा राहतोय. मोटार वाहने, औद्योगिक प्रणाली, ऊर्जा उपकरणांसोबत सूक्ष्मनियंत्रकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रस्थापित प्रक्रियेच्या नोड्ससाठी (एका लहानशा सिलिकॉन चिपवर किती लहान आकाराचे ट्रान्सिस्टर बसवले जाऊ शकतात याचा निर्देशक) दरमहा ५०,००० वेफर्स तयार होतील अशारीतीने या प्रकल्पाची आखणी केली गेली आहे.

प्रत्यक्ष निर्मिती प्रक्रियेत कार्यरत असलेला सेमीकंडक्टर कारखाना चालवण्यासाठी अतिशय शुद्ध वायू आणि रसायने, नेमकी साधने, पॅकेजिंग आणि चाचणी, विश्वासार्ह वीजपुरवठा आणि पाणी, प्रक्रिया अभियंते, देखभाल करणारी पथके आणि शेकडो शिस्तबद्ध पुरवठादारांची गरज असते. याच अनुषंगाने आता ढोलेरा येथील प्रकल्पाच्या माध्यमातून वेफर्सच्या निर्मितीपलीकडे, आपल्या देशाला अधिक सक्षम बनवू शकणाऱ्या क्षमता आणि प्रत्येक टप्प्यावरील तंत्रज्ञानविषयक ज्ञानाची एक संपूर्ण परिसंस्था देशात निर्माण होणार आहे, आणि हेच ढोलेरा प्रकल्पाचे सर्वांत महत्त्वाचे फलित असणार आहे.

आपण हा इथवरच्या टप्पा गाठण्याच्या वाटचालीत केंद्र सरकारकडून मिळालेल्या पाठबळाची भूमिका अत्यंत निर्णायक राहिली आहे. केंद्र सरकारच्या सेमीकॉन इंडिया या कार्यक्रमांतर्गत मान्यताप्राप्त प्रकल्पांना एकूण भांडवली खर्चाच्या ५० टक्क्यांपर्यंत आर्थिक मदत दिली जात आहे. याअंतर्गत मे २०२६ पर्यंत ६ राज्यांमध्ये अशा १२ सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे या प्रकल्पांच्या माध्यमातून सुमारे १.६५ लाख कोटी रुपयांची हमीबद्ध गुंतवणूक होणार आहे. आता सेमीकॉन २.० या अभियानाच्या माध्यमातून सहकार्याचे हे प्रयत्न डिझाईन, उपकरणे आणि कच्च्या मालाच्या क्षेत्रापर्यंत विस्तारले आहेत.

औद्योगिक क्षेत्रांतर्गत आत्मसात केलेल्या धड्यांमुळे मिळणारे फळ कसे उत्तरोत्तर वाढतच जाते याचा अनुभव आपण आधीच घेतला आहे. कधीकाळी मोबाईल फोन जोडणीचे काम हे स्क्रू ड्रायव्हर फिरवण्याचे काम म्हणून या कामाची निंदा केली जात होती. पण या कामाच्या विस्तारलेल्या व्याप्तीनेच मिळणाऱ्या लाभाची व्याप्तीही तितकीच विस्तारली. २०१५ ते २०२६ या आर्थिक वर्षांदरम्यान, भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे मूल्य १.९ लाख कोटी रुपयांवरून १३.११ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले. याच कालावधीत निर्यात देखील ३८,००० कोटी रुपयांवरून वाढून तब्बल ४.२४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली.

मोबाईल फोनचे उत्पादन ६.२७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आणि निर्यात २.५९ लाख कोटी रुपयांवर पोहोचली. केवळ असेंब्ली प्रक्रियेमुळे भारत रातोरात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील महासत्ता बनला नाही. तथापि त्यामुळे कारखाने, कामगार, गुणवत्ता प्रणाली आणि पुरवठादारांच्या पुढील स्तराला आकर्षित करण्यासाठी पुरेशी मोठी देशांतर्गत बाजारपेठ नक्कीच निर्माण झाली.

आता आपण अंतराळाबद्दल बोलूया. जुलै २०२६ मध्ये जेव्हा स्कायरूटच्या विक्रम-१ ने श्रीहरिकोटा येथून उड्डाण केले, तेव्हा हे प्रक्षेपण महत्त्वपूर्ण ठरले. कारण एका खाजगी संघाने प्रणोदन, साहित्य, एव्हियॉनिक्स, सॉफ्टवेअर आणि परिचालन या सर्वांना एकाच आव्हानात्मक यंत्रात एकत्रित करण्याचे तंत्र आत्मसात केले होते. इस्रोच्या संचित ज्ञानामुळे आणि पायाभूत सुविधांमुळे ही शिकण्याची प्रक्रिया शक्य झाली तर इन-स्पेसने त्यासाठी एक व्यावहारिक पूल खुला केला. भारतात आता शेकडो अंतराळ स्टार्टअप्स आहेत. नरेंद्र मोदींनी या अंतराळ पिढीला प्रेरणा दिली आहे.

संरक्षण आयातीमुळे उपकरणे उपलब्ध होऊ शकतात, पण यामुळे आपण महत्त्वाच्या क्षणी असुरक्षित बनू शकतो. भारताचे संरक्षण उत्पादन आर्थिक वर्ष २०२६ मध्ये १.७८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आणि निर्यात आर्थिक वर्ष २०१४ मधील ६८६ कोटी रुपयांवरून वाढून ३८,४२४ कोटी रुपयांवर पोहोचली. हे आकडे अभूतपूर्व गती दर्शवतात. इंडिया एआय मिशन १०,३७१.९२ कोटी रुपयांच्या खर्चासह स्टार्टअप्स आणि संशोधकांसाठी सामायिक संगणकीय सुविधा निर्माण करून मुख्य अडथळ्यांपैकी एक कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. ही एक सुज्ञ सार्वजनिक गुंतवणूक आहे.

हे सर्व एका कमी आकर्षक विषयाकडे घेऊन जाते: संशोधन संस्था. प्रगत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात असे अनेक मोठे टप्पे येतात, जेव्हा दाखवण्यासारखे काहीही प्रभावी नसते. व्हेंचर कॅपिटल अशा दशकभराच्या अनिश्चिततेला निधी देऊ शकत नाही. ती उणीव भरून काढण्यासाठी अनुसंधान राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली, ज्यासाठी २०२३-२८ या काळाकरिता ५०,००० कोटी रुपयांची नियोजित तरतूद आहे. उदयोन्मुख क्षेत्रांमधील खाजगी क्षेत्राच्या संशोधन आणि विकासाला पाठिंबा देण्यासाठी १ लाख कोटी रुपयांची एक स्वतंत्र संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजना आहे.

माझ्या लक्षात आहे, एक काळ होता जेव्हा आपल्याला सॉफ्टवेअर सेवा आणि सॉफ्टवेअर उत्पादने यांमधील फरक ओळखणेही कठीण जात होते. आता ती चर्चा संकुचित वाटते. तरुण भारतीय कंपन्या चिप्स, रॉकेट्स, ड्रोन्स, एआय मॉडेल्स, वैद्यकीय उपकरणे आणि प्रगत सामग्री यांवर काम करत आहेत. हा एक दीर्घ आणि खडतर प्रवास आहे आणि म्हणूनच धोरणातील सातत्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. एखादे उत्पादन केंद्र, संरक्षण मंच किंवा संशोधन विद्यापीठ निवडणुकीच्या चक्रानुसार उभारले जाऊ शकत नाही. कंपन्या आणि संस्थांना प्रतिसाद देण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून मोदी सरकारने सामरिक तंत्रज्ञानाला आपल्या विकास कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी ठेवले आहे.

भारताने प्रगत तंत्रज्ञानाला प्रदीर्घ काळ अशी वस्तू मानले, जी इतरांनी ते कठीण ज्ञान मिळवल्यानंतर विकत घ्यायची असते. आता आपण ते ज्ञान स्वतःच अधिक प्रमाणात मिळवण्याचा पर्याय निवडत आहोत. हाच तो बदल आहे, जो साजरा करण्यासारखा आहे. ■

(लेखक झोहो कॉर्पोरेशनचे संस्थापक आणि माजी मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत)

## निमित्त

# विश्वगुरू भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी

**श्यामकांत जहागीरदार**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा यावेळचा म्हणजे १७ सप्टेंबरचा वाढदिवस विशेष म्हटला पाहिजे. यावर्षी ७ ऑक्टोबरला मोदी सरकार प्रमुख म्हणून २५ वर्षे पूर्ण करीत आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून मोदी यांनी सलग १३ वर्षे काम केले, तर पंतप्रधान म्हणून त्यांना १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. सरकार प्रमुख म्हणून २५ वर्षांचा रौप्यमहोत्सवी कार्यकाळ पूर्ण करणारे नरेंद्र मोदी देशातील एकमेव पंतप्रधान आहेत.

पंतप्रधान झालेले मोदी देशातील पहिले मुख्यमंत्री नाही; याआधी मोरारजी देसाई, विश्वनाथ प्रतापसिंह, चौधरी चरणसिंह आणि एच. डी. देवेगौडा या पंतप्रधानपद भूषविलेल्या लोकांनी मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. पण, हे चौघेही फार काळ पंतप्रधान राहिले नाहीत. पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाचा विचार केला तर मोदी तिसऱ्या स्थानावर आहेत. पहिल्या स्थानावर पंडित जवाहरलाल नेहरू तर दुसऱ्या स्थानावर त्यांच्या कन्या इंदिरा गांधी आहेत. मात्र, या दोघांनाही कधी मुख्यमंत्रिपद भूषवता आले नाही. मुख्यमंत्री आणि पंतप्रधानपद एक तपापेक्षा जास्त काळ भूषविण्याचे भाग्य लाभलेले मोदी देशातील एकमेव तपस्वी नेते म्हटले पाहिजे.

नेहरू, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी वगळता देशात अन्य कोणत्याही पंतप्रधानांना या चार नेत्यांएवढी लोकप्रियता लाभली नाही, ही वस्तुस्थिती आहे. लोकप्रियतेच्या बाबतीत मोदी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यावर निर्विवाद मात केली आहे.

राजकीय क्षेत्रात मोदी यांनी एकापाठोपाठ जे विक्रम केले, ते आतापर्यंत कोणत्याच नेत्याला शक्य झाले नाही. सध्याच्या स्थितीत इंदिरा गांधी यांचा पंतप्रधान म्हणून कार्यकाळ मोदी यांच्यापेक्षा जास्त आहे, पण इंदिरा गांधींना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेता आली नाही. तो विक्रम मोदी यांच्या नावावर आहे. असा विक्रम करत मोदी यांनी पंडित नेहरू यांच्या विक्रमाशी बरोबरी केली.

मोदी यांचे सर्व राजकारण जनतेला डोळ्यासमोर ठेवून केलेले म्हणजे लोककल्याणाशी संबंधित आहे. अनेक छोट्या-मोठ्या गोष्टीतून मोदी यांनी देशातील जनतेची नाडी पकडली आणि मन जिंकले आहे. देशातील अनेक दिग्गज राजकीय नेत्यांना जे शक्य झाले नाही, ते मोदी यांनी करून दाखवले आहे. देशातील सर्वसामान्य जनता ज्या घोषणा देत होती, त्या जवळपास सर्व घोषणांची पूर्तता मोदी यांनी केली आहे. मग, ते स्वप्न जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील कलम ३७० रद्द करण्याचे असो, महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे असो की, मुस्लिम महिलांना स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग उपलब्ध करून देणारा असो की, अयोध्येत राम मंदिर उभारण्याचे असो, या सर्व राष्ट्रीय स्वप्नांची पूर्तता मोदी यांनी केली आहे. एकेकाळी जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार देणारे कलम ३७० निष्प्रभ होऊ शकेल, अयोध्येत राम मंदिर साकार होऊ शकेल, याची कल्पनाही कोणी करू शकत नव्हते, या गोष्टी अशक्यप्राय वाटत होत्या. 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे कवींचे माहात्म्य सांगणारे एक सुभाषित आहे, त्याच धर्तीवर, जे करण्याची हिंमत देशातील आतापर्यंतच्या एकाही राजकीय नेत्याला झाली नाही, त्या सर्व गोष्टी मोदी यांनी शब्दशः आणि चुटकीसरशी घडवून आणल्या. जादूगार आपल्या पेटाऱ्यातून एक-एक चमत्कार घडवतो, तसे अनेक चमत्कार मोदी यांनी राष्ट्रीय राजकारणात घडवले आहे.

मोदींसाठी अशक्य काहीच नाही. 'अशक्य' हा शब्दच त्यांच्या शब्दकोशात नाही. मोदींची राजकीय इच्छाशक्ती, दृढ निर्धार तसेच देशातील गोरगरीब तसेच सर्वसामान्य जनतेबद्दलची आस्था हे मोदी यांच्या यशाचे गमक आहे. सत्तेवर आल्यानंतर मोदी यांनी 'न खाऊंगा न खाने दूंगा' अशी गर्जना केली होती; ती त्यांनी बऱ्याचपैकी साध्य केली आहे. भ्रष्टाचार पूर्णपणे संपवणे कोणालाच शक्य नाही, पण मोदी यांनी भ्रष्टाचारावर नियंत्रण आणले आहे, तो बऱ्यापैकी कमी केला आहे. महत्त्वाचे म्हणजे आज उजळमाथ्याने भ्रष्टाचार करणे कमी झाले आहे, आज भ्रष्टाचार करणाऱ्यांना आपण पकडले गेलो तर कोणी वाचवणार नाही, अशी धास्ती त्यांच्या मनात सतत असते.

लाल किल्ल्यावरून सलग एक तप भाषण करणारे मोदी देशातील दुसरेच पंतप्रधान आहेत. लालकिल्ल्यावरून भाषण करताना मोदी यांनी ज्या कल्पना मांडल्या, मग ती स्वच्छ भारताची असो, आत्मनिर्भर भारताची असो की गरीब कल्याणाची. या सर्व घोषणांची पूर्तता मोदी यांनी केली आहे. मोदी यांची लोकप्रियता समाजाच्या सर्व वर्गांत आहे. आजपर्यंत देशातील कोणत्याही पंतप्रधानांच्या मनात 'परीक्षा पे चर्चा' घ्यावी अशी कल्पना आली नाही. मोदी यांच्या मनात ही कल्पना आल्यावर त्यांनी तातडीने ती कृतीत आणली. अभ्यास करताना आठवी, नववी आणि दहावीच्या मुलांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो; त्याचे निराकरण मोदी यांनी केले. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे विशेष अभियान सुरू केले. देशाचा पंतप्रधान शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये सहज रमतो, हे चित्र भारताने काय जगातील कोणत्याच देशाने अनुभवले नसेल. मोदी दरवर्षी आपली दिवाळी सीमेवरील जवानांसोबत साजरी करतात. २०१४ नंतरची मोदी यांनी आपली एकही दिवाळी पंतप्रधान निवासात साजरी केली नसेल. देशाच्या रक्षणासाठी सीमेवर लढणाऱ्या जवानांसोबत दिवाळी साजरी करण्याची कल्पना आजपर्यंत देशातील एकाही पंतप्रधानाला एखादा अपवाद वगळता सुचली नसेल.

मोदी यांची विचार करण्याची, निर्णय घेण्याची आणि काम करण्याची पद्धतच वेगळी आहे. मोदींच्या मनात विचार करताना, निर्णय घेताना प्रत्येक वेळी देशातील जनता केंद्रस्थानी असते. त्यामुळेच मोदींचे सर्व निर्णय हे धाडसी असले तरी लोकाभिमुख आणि कल्याणकारी असतात. त्यामुळेच मोदी देशहितासाठी तसेच देशातील जनतेच्या कल्याणासाठी काहीही करू शकतात, कोणत्याही थराला जाऊ शकतात, त्यामुळेच 'मोदी है तो मुमकिन है' असा विश्वास देशवासीयांच्या मनात निर्माण झाला आहे. मोदी यांच्या पंतप्रधानपदावर आरूढ झाल्यानंतर देशातील राजकारणाचे चित्र आणि संस्कृती बदलली आहे. मोदी यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे जगात भारताची प्रतिमा बदलली आहे, भारताबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. जगातील अनेक देशांच्या भारताकडून अपेक्षा वाढल्या आहेत, आपल्या अडचणीच्या परिस्थितीत भारत आपल्या मदतीला धावून येईल, असा विश्वास निर्माण झाला आहे. मोदी यांच्या नेतृत्वाचे आणि कर्तृत्वाचे हे यश म्हटले पाहिजे.

मोदी यांच्याबद्दल भारतातीलच नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यातील अनिवासी भारतीयांच्या मनातही विश्वास आहे, आपल्यावर काही संकट आले तर मोदी आपल्यासाठी धावून येतील, असा विश्वास निर्माण झाला आहे. मोदी यांनी आपल्या कृतीने अनेकदा हा विश्वास सार्थ करून दाखवला आहे. त्यामुळेच मोदी यांच्या नेतृत्वात भारताची विश्वगुरू होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली, ही वाटचाल निर्णायक टप्प्यात पोहोचून भारत विश्वगुरू झाल्याशिवाय राहणार नाही आणि तसे झाले तर त्याचे निर्विवाद श्रेय फक्त आणि फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच राहणार आहे. ■

९८८१७१७८१७

# नरेंद्र मोदी यांचे कणखर-लवचीक परराष्ट्र धोरण

**अभिजित लिखिते**

भारताच्या परराष्ट्र धोरणाला नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दशकात अधिक सक्रिय आणि व्यापक स्वरूप प्राप्त झाले. २०१४ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर भारताने अमेरिका, रशिया, जपान, ऑस्ट्रेलिया, युरोप, पश्चिम आशिया आणि आफ्रिका या सर्वच भागांशी संबंध दृढ करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी राष्ट्रीय सुरक्षा, दहशतवाद, ऊर्जा, संरक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञान हे विषय परराष्ट्र धोरणाशी जोडण्यात आले. मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही एका शक्तिकेंद्रावर अवलंबून न राहता भारताच्या हितानुसार विविध देशांशी संबंध ठेवणे. त्यामुळे या धोरणाची ओळख कणखरतेसोबतच व्यवहारवाद, रणनीतिक स्वायत्तता आणि लवचीक अशीही करता येते.

### राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य

परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हित हा मूलभूत आधार असतो. नरेंद्र मोदी यांनी सुरक्षा, आर्थिक विकास, ऊर्जा उपलब्धता, संरक्षण तंत्रज्ञान आणि भारताच्या जागतिक प्रभावाची परस्पर जोडणी केली. भारताने अमेरिकेशी जवळीक वाढवली, परंतु रशियाशी पारंपरिक संबंध कायम ठेवले. इस्त्रायलशी संरक्षण सहकार्य वाढवतानाच अरब राष्ट्रांशीही घनिष्ठ संबंध विकसित केले. या दृष्टिकोनामुळे भारताला एकाच आंतरराष्ट्रीय गटावर अवलंबून न राहता अनेक पर्याय खुले ठेवता आले.

### दहशतवादविरोधातील कठोर भूमिका

नरेंद्र मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणातील सर्वाधिक ठळक बदल म्हणजे दहशतवादाच्या प्रश्नाकडे पाहण्याची पद्धत. उरी हल्ल्यानंतर २०१६ मध्ये झालेली सर्जिकल स्ट्राईक आणि पुलवामा हल्ल्यानंतर २०१९ मध्ये करण्यात आलेली बालाकोट कारवाई, त्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' या घटनांनी भारताने दहशतवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्याची राजकीय इच्छाशक्ती दाखवली. यामुळे भारताचे सुरक्षा धोरण परराष्ट्र धोरणाशी अधिक जवळून जोडले गेले.

### चीनसमोर सामरिक संतुलन

भारतासाठी चीन हा एकाच वेळी मोठा व्यापार भागीदार आणि प्रमुख सामरिक प्रतिस्पर्धी आहे. या द्वंद्वात्मक संबंधांमध्ये मोदी सरकारने संवाद आणि प्रतिबंध या दोन्हींचा वापर केला. डोकलाम आणि लडाखमधील तणावानंतर सीमावर्ती पायाभूत सुविधा, लष्करी सज्जता आणि सामरिक भागीदारी यांना अधिक महत्त्व मिळाले. त्याचवेळी चीनशी पूर्ण संबंधविच्छेद करण्याऐवजी बहुपक्षीय व्यासपीठांवर संवाद कायम ठेवण्यात आला. क्वाडमधील भारताचा सहभाग हा भारत-प्रशांत क्षेत्रातील सामरिक संतुलनाचा महत्त्वाचा भाग बनला. अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासोबत सहकार्य वाढवून भारताने सागरी सुरक्षेतील आपली भूमिका मजबूत केली.

### 'ॲक्ट ईस्ट' आणि आग्नेय आशिया

भारताची पूर्वेकडील भूमिका अधिक सक्रिय करण्यासाठी 'लूक ईस्ट' धोरणाला 'ॲक्ट ईस्ट'चा वेग देण्यात आला. आसियान देशांशी व्यापार, संपर्क, संरक्षण आणि सांस्कृतिक संबंध वाढवण्यावर भर देण्यात आला. जपान आणि ऑस्ट्रेलियासोबतच्या संबंधांनाही यामुळे व्यापक रणनीतिक परिमाण मिळाले. ईशान्य भारताला दक्षिण-पूर्व आशियाशी जोडण्याचा प्रयत्न हा या धोरणाचा आर्थिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा भाग आहे.

पश्चिम आशिया भारतासाठी ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक आणि प्रवासी भारतीय या चारही कारणांमुळे महत्त्वाचा आहे. मोदी सरकारने या प्रदेशातील विविध देशांशी संबंध स्वतंत्रपणे विकसित केले. इस्त्रायलशी संरक्षण आणि तंत्रज्ञान सहकार्य वाढवताना यूएई आणि सौदी अरबशी आर्थिक व सामरिक संबंध मजबूत करण्यात आले. इराणशीही भारताने आपले दीर्घकालीन हितसंबंध जपण्याचा प्रयत्न केला. यामुळे भारताने पश्चिम आशियातील गुंतागुंतीच्या राजकारणात एका गटाची बाजू घेण्याऐवजी स्वतंत्र समीकरणे निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

### अमेरिकेशी रणनीतिक भागीदारी

भारत-अमेरिका संबंध मोदी सरकारच्या काळात संरक्षण आणि तंत्रज्ञानापासून अंतराळ, ऊर्जा आणि भारत-प्रशांतपर्यंत विस्तारले.क्वाड, संरक्षण सहकार्य आणि उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारीमुळे दोन्ही देशांचे संबंध अधिक व्यापक झाले. अमेरिकेशी वाढलेली जवळीक ही चीनच्या वाढत्या प्रभावाच्या पृष्ठभूमीवर भारतासाठी महत्त्वाची ठरली. तरीही भारताने रशियाशी संबंध तोडले नाहीत. त्यामुळे अमेरिकेशी भागीदारी आणि स्वतंत्र निर्णयक्षमता यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न दिसतो.

### प्रवासी भारतीय आणि सांस्कृतिक कूटनीती

नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणात प्रवासी भारतीय समुदायाला विशेष स्थान मिळाले. विविध देशांमध्ये भारतीय समुदायाशी थेट संवाद साधून त्यांना भारताच्या विकास प्रक्रियेशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर योग, भारतीय संस्कृती, बौद्ध वारसा आणि आयुर्वेद यांचा आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रचार करण्यात आला. संयुक्त राष्ट्रांनी २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन स्वीकारणे हे भारताच्या सांस्कृतिक प्रभावाचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

### संरक्षण आणि आर्थिक हितसंबंध

परराष्ट्र धोरण केवळ राजनैतिक बैठका किंवा करारांपुरते मर्यादित न ठेवता संरक्षण आणि आर्थिक हितसंबंधांशी जोडण्यावर भर देण्यात आला. विविध देशांबरोबर संरक्षण सहकार्य, तंत्रज्ञान हस्तांतरण, गुंतवणूक आणि व्यापार वाढवण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे परराष्ट्र संबंधांचा उपयोग भारताच्या आर्थिक आणि सुरक्षा गरजा पूर्ण करण्यासाठी करण्याची प्रवृत्ती अधिक ठळक झाली. ■

९०२८०५५१४१

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

अज्ञात कारणावरून एका ३१ वर्षीय तरुणाने घरातील पत्र्याच्या लोखंडी अँगल ला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सलगर वस्ती भागातील थोरली वस येथे आज बुधवारी दुपारी पावणे एक वाजता उघडकीस आली. रवी रेवनसिद्ध कांबळे (वय ३१ वर्ष रा. थोरली इरण्णा वस्ती, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. आज बुधवारी दुपारी राजा घरामध्ये रवी यांनी गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले. नातेवाईकांच्या साह्याने त्याचा गळफास सोडवून ही खबर सलगर वस्ती पोलिसांना देण्यात आली. हवालदार आर डी जाधव यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात यादी सह दुपारी दोन वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### अपघातात जखमी पादचारी महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

चार चाकी वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या एका वृद्ध महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात मंगळवारी रात्री दहा वाजता मृत्यू झाला. महादेवी शिवाजी कोरे ( वय ७३ वर्ष, रा. राहुल नगर, मजरेवाडी सोलापूर) असे त्या मयत महिलेचे नाव आहे. त्या ११ सप्टेंबर रोजी सकाळी आसरा चौक येथील किनारा हॉटेल जवळून पायी रस्ता ओलांडत असताना एका चार चाकी वाहनाने त्यांना धडक दिली होती. यात जखमी झाल्याने त्यांना दोन खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मुलगा प्रभूलिंग कोरे यांनी दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान मंगळवारी रात्री मृत्यू झाला.

### जिन्यावरून पडलेल्या इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

घरातील जिन्यावरून पडून जखमी झालेल्या एका इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात मंगळवारी सायंकाळी सहा वाजता मृत्यू झाला. गणेश नामदेव कदम (वय ४४ वर्ष, रा. गंगानगर लक्ष्मी पेठ सोलापूर) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे. ते नऊ सप्टेंबर रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास घरातील जिन्यावरून दारूचे नशेत खाली बुडून जखमी झाले होते. त्यांना उपचाराकरता भाऊ धनाजी यांनी येथील शासकीय रुग्णालयात संध्याकाळी दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान मंगळवारी सायंकाळी मृत्यू झाला.

### बाथरूममध्ये पडलेल्या इसमाचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

तोल जाऊन बाथरूम मध्ये पडलेल्या एका ५९ वर्षीय इसमाचा उपचारदरम्यान येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी सकाळी ११ वाजता मृत्यू झाला. अमोल तुकाराम जाधव ( वय ५९ वर्ष, रा. प्रताप नगर तांडा, विजापूर रोड) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. ते ३० ऑगस्ट रोजी मध्यरात्री राहत्या घरातील बाथरूम मध्ये तोल जाऊन पडले होते. यात पोटाला मार लागल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात मुलगा राजू यांनी सायंकाळी दाखल केले असता त्यांचा उपचार दरम्यान आज बुधवारी सकाळी मृत्यू झाला.

### शिव्या दिल्याचा जाब विचारल्याने डोक्यात घातली बाटली

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

शिव्या दिल्याचा जाब विचारल्याने एका तरुणास बियर बाटलीने मारून जखमी करण्यात आल्याची घटना अक्कलकोट येथील लांडगे वाईन शॉप जवळ मंगळवारी रात्री घडली. बिराप्पा शिवपुत्र धुते (वय ३४ वर्ष, रा. बासलेगाव, ता. अक्कलकोट) असे त्या जखमी तरुणाचे नाव आहे.तो मंगळवारी रात्री अक्कलकोट येथील एका वाईन शॉप जवळ असताना त्याने शिवी का दिली अशी विचारणा केली म्हणून अज्ञात तीन-चार जणांनी मिळून त्याला बियरच्या बाटलीने मारहाण केली. यात डोक्याला जखम झाल्याने त्याला अक्कलकोट येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मित्र बंदीछोडे यांनी रात्री अकरा वाजता दाखल केले.

### मोहा येथे दुचाकी धडकेत जखमी वृद्ध इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

दुचाकीच्या धडकेत जखमी झालेल्या मोहा गावच्या एका वृद्ध इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज बुधवारी दुपारी साडेतीन वाजता मृत्यू झाला. मुनिरोद्दीन अजमोद्दिन पठाण (वय ७८ वर्षे, रा. मोहा, तालुका कळंब, जिल्हा धाराशिव) असे मयत इसमाचे नाव आहे. ते १० सप्टेंबर रोजी सकाळी गावात चालत जात असताना त्यांना एका दुचाकीने धडक दिली होती. यात जखमी झाल्याने त्यांना बार्शी येथील एका खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात खुर्शीद पठाण यांनी मंगळवारी संध्याकाळी बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज बुधवारी दुपारी मृत्यू झाला.

### जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून मनाई आदेश लागू झाला आहे. ३० सप्टेंबर २०२६ (रात्री २०.०० वा. पर्यंत) या कालावधीत महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोक एकत्र येण्यास बंदीचे आदेश लागू केले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी याबाबत आदेश जारी केले आहेत.

# सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत ‘नेटबॉल’ खेळाचा समावेश करा



### सोलापूर जिल्हा नेटबॉल संघटनेचे कुलगुरूंना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत ‘नेटबॉल’ या खेळाचा समावेश करावा, अशी मागणी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. कर्नल प्रकाश महानवर यांना सोलापूर जिल्हा नेटबॉल संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य प्रशांत लोंढे यांनी बुधवारी निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा जिल्हा नेटबॉल संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष प्रा. सचिन गायकवाड, सिनेट सदस्य अजितकुमार सांगवे, जिल्हा नेटबॉल संघटनेचे चेअरमन एम. शफी, सचिव कुदूस शेख, उपाध्यक्ष विठ्ठल कुंभार, सहसचिव जुबेर शेख, खजिनदार तलहा शेख तसेच अब्दुल्ला चौधरी, मोईन सय्यद आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद केल्यानुसार, महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठांच्या क्रीडा स्पर्धांमध्ये ‘नेटबॉल’ या खेळाचा आधीच समावेश आहे. सोलापूर जिल्ह्यात सन २००७ पासून या खेळाची सुरुवात झाली आहे. आजघडीला सोलापूर शहरासह मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, माळशिरस, अक्कलकोट आणि मोहोळ या तालुक्यांमध्येही नेटबॉल खेळाची मैदाने व सक्षम संघ उपलब्ध आहेत.

खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ सध्या विद्यापीठात नेटबॉलचा समावेश नसल्यामुळे येथील प्रतिभावान खेळाडूंना इतर विद्यापीठांकडे वळावे लागते. विद्यापीठातच हा खेळ सुरू झाल्यास स्थानिक खेळाडूंना उत्तम संधी मिळेल आणि त्यांचा ओघ बाहेर जाण्याऐवजी विद्यापीठाच्या संघास बळकटी येईल. तसेच थेट 'ऑल इंडिया विद्यापीठ नेटबॉल स्पर्धेत' सोलापूरच्या खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची सुवर्णसंधी प्राप्त होईल. त्यानुसार सन २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात या खेळाचा समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्हा संघटनेतर्फे विद्यापीठाला संपूर्ण तांत्रिक सहकार्य करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

#### राष्ट्रीय व राज्य यश

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये हा खेळ २०१२ पासून अनुदानित खेळ म्हणून समाविष्ट करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर विविध वयोगटांत चमकदार कामगिरी केली असून, अनेकदा राज्यस्तरावर संघ उपविजेता ठरला आहे. खेळाडूंच्या या उज्ज्वल भविष्यासाठी विद्यापीठ स्तरावरही या खेळाला हक्क मिळणे गरजेचे असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

## निर्मल मॅरेथॉन स्पर्धेत छत्रपती शिवाजी प्रशालेचे यश



**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

माजी आ. स्वर्गीय निर्मलाताई ठोकळ यांच्या स्मृतिदिनानिमित्त झालेल्या शालेय निर्मल मॅरॅथॉन स्पर्धेत येथील छत्रपती शिवाजी प्रशालेच्या खेळाडूंनी यश संपादन केले.

त्यांना क्रीडा विभाग प्रमुख मारुती घोडके, नितीनकुमार गोरे, क्रीडा मार्गदर्शक पुंडलिक कलखांबकर, प्रशांत राणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे, जनरल सेक्रेटरी, प्रा महेश माने, शालेय समिती चेअरमन शिवदास चटके, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, उपमुख्याध्यापक श्रीपतराव जगदाळे, पर्यवेक्षकद्वय सुरेश जगताप किरण देशमुख यांनी अभिनंदन केले.

**खेळाडूंची कामगिरी :**

**१४ वर्ष मुले :** प्रथम- श्रीधर डोंगरीतोट, तृतीय- सनिल मर्गमकोळी. **मुली:** प्रथम-जानवी हरिहर, द्वितीय-श्रीदेवी कोंढूर.

**१७ वर्ष मुले :** प्रथम- दीपक इपोळे, तृतीय- विजयसिंग आंबेवाले, चतुर्थ- भाग्योदय नागलगाव.

**मुली :** प्रथम-सृष्टी हडपद, द्वितीय- पवित्र नागलगाव, तृतीय- अक्षता गंगोंडा, चौथा- सिरीन जमादार.

### नरसिंह कनकी यांचे निधन

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**



रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी डिव्हिजनचे अध्यक्ष नरसिंह कनकी यांचे बुधवारी (दि.१६) पहाटे ६:४० वाजता हृदयविकाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुली, मुलगा, जावई, नातू असा परिवार आहे



### खादी आणि ग्रामोद्योग आयोग

सत्यमेव जयते
सूक्ष्म,लघु और मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार
Ministry of Micro, Small & Medium Enterprises
Government of India

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार**
ग्रामोदय, ३, इर्ला रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०००५६
**टेलेफैक्स:** 022-2671 4267, **ई-मेल:** adm.kvic@gov.in
**वेबसाइट:** www.kvic.org.in

KVIC
कामये दुःखतप्तानाम्। प्राणिनाम् आर्तिनाशनम्॥

#### कंत्राटी तत्त्वावर तरुण व्यावसायिक, सल्लागार आणि वरिष्ठ सल्लागारांची नियुक्ती

खादी आणि ग्रामोद्योग आयोग (केवीआईसी) ही संसदेच्या कायद्याद्वारे स्थापन झालेली एक वैधानिक संस्था असून ती सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय (भारत सरकार) च्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्य करते. भविष्यातील विकास आणि बदलांशी संबंधित आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि विकासाचा वेग वाढवण्यासाठी, खालील पदांसाठी ऑनलाईन अर्ज मागवत आहे.

| अ. क्र. | पद | रिक्त जागा | आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि अनुभव |
|---|---|---|---|
| १ | तरुण व्यावसायिक | २० | पदव्युत्तर पदवी / संबंधित क्षेत्रातील पोस्ट ग्रॅज्युएट |
| २ | सल्लागार | १५ | सरकारी विभाग/पीएसयूमधून निवृत्त किंवा स्वेच्छानिवृत्त व्यक्ती आणि संबंधित क्षेत्रात किमान १५ वर्षांचा अनुभव. |
| ३ | वरिष्ठ सल्लागार | १५ | पदव्युत्तर पदवीसह / संबंधित क्षेत्रात किमान ५ वर्षांचा अनुभव. |

**नियुक्तीचे ठिकाण :** केंद्रीय कार्यालय, खादी आणि ग्रामोद्योग आयोग, ‘ग्रामोदय’, ३ इर्ला रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०००५६.
**नोंदणी आणि अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : ३०/०९/२०२६**
**टीप :** सविस्तर अटी व शर्तींसाठी केवीआईसीच्या www.kvic.gov.in या संकेतस्थळावरील रिक्त पदे विभागात अपलोड केलेली सविस्तर जाहिरात पहा.

**संचालक / प्रभारी (प्रशासन आणि मानव संसाधन)**
**केवीआईसी, मुंबई**



### सिलिंग जमीन भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करीता जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पिलीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ४२७/४ क्षेत्र २४४ हे.आर. ही मिळकतीचे खातेदार श्री. सिंधू मारुती रणदिवे रा. बचेरी यांनी सदरची जमीन भोगवटादार वर्ग-२ ची असल्याने सदर जमिनीची भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करीता आमचे अशिल श्री सिंधू मारुती रणदिवे यांनी मा. अपर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमूद शेतजमिनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगीहक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्युपत्र, खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे-घेणे इ. बाबत काही हरकत / तक्रार / हितसंबंध / अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा.अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमिनीचा झालेला खरेदी व्यवहार विधीग्राह्य होण्यासाठी पुढील कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.
ता. १०/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. अजय प्रकाश घाटे**
**पत्ता : पिलीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर**
**अशिल - श्री. सिंधू मारुती रणदिवे**
**पत्ता : बचेरी, ता माळशिरस, जि. सोलापूर**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे मजरेवाडी, ता. उत्तर सोलापूर येथील लोकांस कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन - डि. व सब डी. सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढीतील मजरेवाडी येथील सवेरा नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरामधील बांधलेली घरजागा त्यासी जुना स.नं. ३४७/१ यांसी नवीन स. नं. ११०/१ पैकी प्लॉट नं. ८ याचे क्षेत्र ९२.९० चौ.मी. असून त्यामध्ये दुमजली बांधकाम असून त्याच्या चतुःसिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ७, दक्षिणेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.९, उत्तरेस : प्लॉट नं.५. ही मिळकत श्री. प्रशांत आण्णाराव धुळेराव यांच्या मालकी व कब्जेहक्काची असल्याची व ती पूर्णतः निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची त्यांनी आमचे अशिलांस विश्वास व भरोसा देऊन ती आमचे अशिलांस विक्री करण्याच्या हेतूने व्यवहार निश्चित करुन इसारापोटी रक्कम आमच्या अशिलाकडून घेतलेली आहे व लवकरात लवकर खरेदीखत आमचे अशिलाच्या हक्कात करुन देणार आहेत.

तथापि सदर मिळकतीशी अन्य कोणाचे कसल्याही प्रकारचे हक्क-हितसंबंध निर्माण होऊन ते चालू राहिले असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह येऊन तशी खात्री पटवून द्यावी. सदरप्रमाणे मुदतीत कोणी न केल्यास आमचे अशिल हे सदर मिळकतीचे खरेदीखत त्यांचे मालकी व कब्जेहक्कात करुन घेतील, मग सदर प्रसंगांती त्यासंबंधी कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर सबब मुळीच कायद्यानुसार विचारात घेतली जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

ही जाहीर नोटीस दिली ता. १६/०९/२०२६.

**सही/-**
**ॲड. संदीप कं. सातलगांव**
**चेंबर नं. २८, जिल्हा न्यायालय आवार, सोलापूर. मो.नं. ९६६५४९०१४३**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं.: ७५/२०२६
नि. ०६

#### बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात
#### (मा. आर.एस. रोटे सो.)

१) **गौरी पृथ्वीराज यादव उर्फ देशमुख**
२) **समृध्दी पृथ्वीराज देशमुख**
३) **चिन्मयी पृथ्वीराज देशमुख**
४) **राज पृथ्वीराज देशमुख**
५) **पृथ्वीराज धनराज देशमुख**
सर्व रा. मदनवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे — **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन वगैरे** — **सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे खातगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात दि.कि. अर्ज क्रमांक ७५/२०२६ हा मौजे खातगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर ७३/४/ब पैकी अर्जदार नंबर १ ते ४ यांची मालकीचे क्षेत्र ०० हे. ४२ आर, पो.ख. ०० हे. ०६ आर. आकार ०० रु. ४१ पैसे हे विक्रीस काढलेले असून त्याची विक्री परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्यावरून कळविण्यात येते की, वरील अज्ञान अर्जदार नंबर १ ते ४ याचे नावे असलेल्या वरील नमूद मिळकतीबाबत विक्री परवानगी मिळण्याबाबतचा आदेश पारीत होणेबाबत कोणाची काही तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली ता. २२/१०/२०२६ रोजी स्वतः अथवा विधीज्ञामार्फत या न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे अर्जदाराचा पुरावा घेऊन पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील. तद्नंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आज दि. १६/०९/२०२६ रोजी माझी सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/-**
**लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक,**
**अति. जिल्हा न्यायालय, बार्शी, ता. बार्शी**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन - डि. सोलापूर, सब. डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी, ता. बार्शी येथील म्यूनि.पल. हद्दीतील बिनशेती प्लॉट याचा गट नंबर ८४५ आहे यापैकी प्लॉट नं. २५ पैकी प्लॉट याचे क्षेत्रफळ ७५.०० चौ.मी. आहे., याचे मोजमाप पूर्वपश्चिम बाजू :- १५.०० मी. दक्षिणोत्तर :- ५.०० मी. आहे. असा संपूर्ण प्लॉट. तसेच सदर मोजमापात नगरपालिका खंड रजिस्टरनुसार कच्च्या स्वरुपाचे ७५.०० चौ.मी. बांधकाम व स्वतंत्र लाईट नळ आहे. पूर्वेस : ४० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस : गट नं.२५ पैकी पश्चिमेस :- वायकुळे यांची जमीन व उत्तरेस : गट नं.२४ आहे. येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक्क प्लॉट आतील सर्व झाडझुडुप दगड माती तदंगभूत वस्तू हक्कासह व जाणे-येण्यासाठी रस्ता व पाणी वागणूक व वहिवाट ही पूर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे.

सदर मिळकत श्री समाधान संपत अनभुले यांच्या खरेदी मालकीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद असून सदर प्लॉट व बांधकाम त्यांचे प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे. सदरचा प्लॉट व बांधकाम ते विक्री करू इच्छितात, सदर प्लॉट व बांधकाम विक्रीस निघाल्याबाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने सदर प्लॉट व बांधकाम विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशिलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारा समक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे. व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशिलबरोबर ठरविला आहे.

सदर प्लॉट व बांधकामावर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत अशिलातर्फे वकील यांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क साबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून प्लॉट व बांधकाम बिनबोजाचे क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर प्लॉट व बांधकाम खरेदी करतील. खरेदीनंतर कोणाची कसलेली हरकत आलेस आमचे अशिलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवगत होऊ नये याकरिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. १५/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. अमरदिप राजीव क्षीरसागर**
**ऑफिस पत्ता :- गाळा नं. २७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स, सुलाखे हायस्कूल रोड, बार्शी. रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर. (अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

### खरेदीपूर्व जाहिर नोटीस

अशिलांनी दिलेल्या तोंडी माहिती व कागदपत्रावरून तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि।। व सब डि।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. २५०/१/अ यांसी नवीन सर्व्हे नं. ५७/१/अ यापैकी ‘शांती नगर’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वसाहतीमधील प्लॉट नं. १०३ यांसी एकूण क्षेत्र ३८४.०० चौ.मी. यापैकी उत्तर दिशेचे क्षेत्र १९० चौ.मी. अथवा २०४४.४० चौ.फुट. इतके आहे. ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे क्षेत्र १.९०.०० आर.चौ.मी. इतके असून सदरहु जागा खुली आहे, यासी चतुःसिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ९६, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : सदर प्लॉट नं. १०३ पैकी उर्वरीत जागा, उत्तरेस : प्लॉट नं. १०४

वर नमूद मिळकत ही अब्दुल गनी हमीद शेख यांचे मालकीची असून सदरची मिळकत त्यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून आमचे अशिलासोबत बोलणी करून वर नमूद मिळकतीबाबत साठेखत करारपत्र लिहून दिलेले आहे व सदरची मिळकत आमचे अशिलांस खरेदी देण्याचे ठरविलेले आहे.

वर नमूद मिळकत ही आमचे अशिल खरेदी घेणार असून वर नमूद मिळकतीवर ए.यु. स्मॉल फायनान्स बँक, शाखा सोलापूर या बँकेचा बोजा असून त्या व्यतिरिक्त कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दाद, टाच, बक्षीस, पोटगी, वगैरे असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली तारीख : १५/०९/२०२६.

**सही/-**
**ॲड. जैद अहमद आर. शेख**
**बी.ए., एलएल.बी**
**रा.डी-२, भाग्योदय पीडब्ल्युडी सोसायटी, अमन चौक, मजरेवाडी, सोलापूर-०४.**
**मो.नं. ९०२८३४७४९०.**
**(अशिलांतर्फे ॲडव्होकेट)**

### IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

#### सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड**, जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या तारणावर (गहाणखत) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड**, जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित नोटीसनुसार दिली आहे, आणि सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

<table>
<tr><th>अं. क्र.</th><th>कर्ज खाते क्र.</th><th>कर्जाचा प्रकार</th><th>कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे</th><th>कलम १३ (२) नोटीस दिनांक</th><th>कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम</th></tr>
<tr><td>1</td><td>63516323</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. गोरख निवृत्ती माने<br>२. स्वप्निल गोरखनाथ माने</td><td>06-May-2026</td><td>INR 4,23,802.71/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : प्लॉट नं. २६, गट नं. ५९/२/२ मधील, एकूण क्षेत्रफळ १५०० चौ. फूट, कांची कामाक्षी नगर, ग्रामपंचायत मुळेगाव लमाण तांडा हद्द, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - ४१३००२. सीमा : पूर्वः प्लॉट नं. १९, पश्चिम : रस्ता, उत्तर : प्लॉट नं. २५, दक्षिण : प्लॉट नं. २७.</td></tr>
<tr><td>2</td><td>69682212</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. सुरेश रामकृष्ण नरुटे<br>२. कविता सुरेश नरुटे</td><td>10-Jan-2026</td><td>INR 5,97,444.62/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. १३८, एकूण क्षेत्रफळ २४० चौ. फूट, मौजे कवठे, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - ४१३००२. सीमा : पूर्वः रामकृष्ण नरुटे यांची जागा, पश्चिम : सटप्पा बंडगर यांची जागा, उत्तर : रमेश मदने यांची जागा, दक्षिण : रस्ता.</td></tr>
<tr><td>3</td><td>106354539</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. दीपक केरप्पा लवटे<br>२. ताई दीपक लवटे</td><td>02-Sep-2026</td><td>INR 8,87,217.60/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. ६८८/१, एकूण जागा १११६ चौ. फूट, तळमजला बांधकाम ६२० चौ. फूट, मौजे पुळुज, ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३३०४. सीमा : पूर्व : रस्ता, पश्चिम : दत्तात्रय केरप्पा लवटे, उत्तर : ग्रामपंचायत बोळ, दक्षिण : मिळकत नं. ६८७ (मारुती पांडुरंग नाळे).</td></tr>
<tr><td>4</td><td>130965572</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. विकास भानूदास निकम<br>२. नंदा भानूदास निकम</td><td>26-Aug-2026</td><td>INR 15,2</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. ३५२, निवासी घर, क्षेत्रफळ ३० X ३० = ९०० चौ. फूट (८३.६४ चौ. मीटर), मौजे खेळवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३११२. सीमा : पूर्व : भीमराव महादेव चंदनशिवे, पश्चिम : पवनकुमार महादेव चंदनशिवे, उत्तर : ग्रामपंचायत रस्ता, दक्षिण : स्वतःची जागा.</td></tr>
<tr><td>5</td><td>144952523</td><td>गृहकर्ज</td><td>१. सावकार तुकाराम चौगुले<br>२. बाळाबाई सावकार चौगुले</td><td>25-Jul-2026</td><td>INR 9,74,621.61/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. ६२८, एकूण क्षेत्रफळ २३०० चौ. फूट, ग्रामपंचायत रांजणी हद्द, ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३३०४. सीमा : पूर्व : जिल्हा परिषद शाळा, पश्चिम : अमोल घोडके, उत्तरः रस्ता, दक्षिणः संदीप बावचे</td></tr>
<tr><td>6</td><td>145267304</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. दत्ता सुखदेव पिसे<br>२. सविता सुखदेव पिसे</td><td>20-Jun-2026</td><td>INR 7,44,787.03/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. २३०/१, एकूण क्षेत्रफळ २४०० चौ. फूट, मौजे पिसेवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३११३. सीमा : पूर्व : बजरंग पिसे, पश्चिम : इन्नुस मुलाणी, उत्तर : मोकळी जागा, दक्षिण : रस्ता.</td></tr>
<tr><td>7</td><td>145268108</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. धनराज तुकाराम चव्हाण<br>२. छाया चव्हाण</td><td>10-Jun-2026</td><td>INR 7,64,457.71/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. २७५/१, एकूण क्षेत्रफळ १५२० चौ. फूट, मौजे मुळेगाव तांडा, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर - ४१३००६. सीमा : पूर्व : रस्ता, पश्चिम : गट नं. ५, उत्तर : मिळकत नं. २९५/४ (शाका देऊ पवार), दक्षिण : मिळकत नं. २७४ (हिरा सोमालू जाधव).</td></tr>
<tr><td>8</td><td>147089903</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. गणेश महारुद्र कोळी<br>२. वनिता गणेश कोळी</td><td>26-Aug-2026</td><td>INR 8,33,792.52/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. १२, दगड, वीट आणि आरसीसी बांधकामाचे घर (तळमजला बांधकाम १०५६ चौ. फूट, एकूण जागा ३६०० चौ. फूट), मौजे येवती, ता. मोहोळ, जि. सोलापूर - ४१३२४८. सीमा : पूर्व : ग्रामपंचायत रस्ता, पश्चिम : ग्रामपंचायत रस्ता, उत्तर : महादेव जनार्दन माने, दक्षिण : गणेश लक्ष्मण कोळी.</td></tr>
<tr><td>9</td><td>150271672</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. कुमार दत्ता माने<br>२. शोभा कुमार माने</td><td>02-Sep-2026</td><td>INR 2,94,587.05/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. ७१२, निवासी घर (तळमजला बांधकाम ६०० चौ. फूट, एकूण जागा ७२० चौ. फूट), मौजे नारायण चिंचोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३३०४. सीमा : पूर्व : मुख्य रस्ता मारुती मंदिर, पश्चिम : अरुण महादेव माने, उत्तर : अनिल नागनाथ माने, दक्षिण : विष्णू दत्तात्रय माने.</td></tr>
<tr><td>10</td><td>150687721</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. अभिजित शंकर पाटील<br>२. शंकर आप्पा पाटील</td><td>01-Jul-2026</td><td>INR 7,91,003.82/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. ७४३, एकूण क्षेत्रफळ ३४०० चौ. फूट, मौजे जुजारपूर, ता. सांगोला, जि. सोलापूर - ४१३३०७. सीमा : पूर्व : संभाजी पाटील, पश्चिम : रस्ता, उत्तर : उमेश सरवदे, दक्षिण : बाबासो पाटील.</td></tr>
<tr><td>11</td><td>151185580</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. प्रविण ज्ञानदेव भुसनर<br>२. नंदा ज्ञानू भुसनर</td><td>17-Apr-2026</td><td>INR 7,82,675.00/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. २१०, एकूण क्षेत्रफळ ३८२५ चौ. फूट, मौजे हटकर मांगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर - ४१३३०७. सीमा : पूर्व : रस्ता, पश्चिम : मोकळी जागा, उत्तर : रस्ता, दक्षिण : जगन्नाथ नारायण भुसनर यांचे घर.</td></tr>
<tr><td>12</td><td>164255594</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. चांगदेव भारत वेदपाठक<br>२. सपना चांगदेव वेदपाठक</td><td>29-Aug-2026</td><td>INR 7,55,072.89/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. २४३, निवासी बांधकाम ७५० चौ. फूट (३०X२५) व मोकळी जागा २०२५ चौ. फूट (४५X४५), एकूण २७७५ चौ. फूट, मौजे उंबरे दहीगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०७. सीमा : पूर्व : ग्रामपंचायत रस्ता, पश्चिम : स्वतःची जागा, उत्तर : बाळू चोरमले, दक्षिण : ग्रामपंचायत रस्ता.</td></tr>
<tr><td>13</td><td>143997491</td><td>मालमत्तेवर कर्ज</td><td>१. महेश भारत वाघमारे<br>२. मनीषा भारत वाघमारे</td><td>08-Apr-2026</td><td>INR 7,21,398.20/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत नं. ८०४, एकूण क्षेत्रफळ १७७५ चौ. फूट, मौजे लोणारवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३३०६. सीमा : पूर्व : किसन शिंदे, पश्चिम : रस्ता, उत्तर : धुळदेव शिंदे, दक्षिणः नाथा बाड.</td></tr>
</table>

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड**, जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**दिनांक : 17/09/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दुखापतीमुळे वरुण चक्रवर्ती स्पर्धेतून बाहेर

**नवी दिल्ली :** अनुभवी फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती बरगडीच्या स्नायूला झालेल्या दुखापतीमुळे आशियाई क्रीडा स्पर्धेतून बाहेर पडला असून, त्याच्या जागी लेग-स्पिन अष्टपैलू विप्राज निगमला भारतीय संघात स्थान देण्यात आले आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबरपासून जपानमधील आयची-नागोया येथे सुरू होत आहेत. बीसीसीआयच्या सूत्राने सांगितले, वरुण अनिश्चित काळासाठी संघाबाहेर आहे. आमच्याकडे विप्राज निगम आणि कुलदीप यादव हे दोन पर्याय होते. कुलदीप या महिन्याच्या अखेरीस वेस्ट इंडीजविरुद्ध एकदिवसीय मालिका खेळणार आहे. अफगाणिस्तानविरुद्ध सुरू असलेल्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यादरम्यान चक्रवर्ती जखमी झाला होता. त्याला पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी काही वेळ लागण्याची शक्यता आहे. आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २२ वर्षीय निगमने आतापर्यंत लीगमध्ये १९ सामने खेळले असून १३ बळी घेतले आहेत.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांची क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. भारत उपांत्यपूर्व फेरीपासून सुरुवात करेल. चक्रवर्तीची माघार भारतासाठी एक मोठा धक्का आहे. कारण अफगाणिस्तान मालिकेपूर्वी हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरल्यानंतर हा ३५ वर्षीय खेळाडू राष्ट्रीय संघात परतला होता. पहिल्या टी-२० सामन्यानंतर त्याला अस्वस्थ वाटू लागले आणि त्यानंतर पुढील तपासणीसाठी त्याला बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये परत पाठवण्यात आले.

### डोपिंग प्रकरणी राकेश कुमारवर आजीवन बंदी

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेने (नाडा) बुधवारी जाहीर केलेल्या ताज्या निर्बंधांच्या यादीनुसार, प्रतिबंधित पदार्थांचे सेवन केल्याबद्दल ॲथलेटिक्स प्रशिक्षक राकेश कुमार यांच्यावर आजीवन बंदी घालण्यात आली आहे, तर पॉवरलिफ्टर गौरव वत्स याला प्रतिबंधित औषधे बाळगल्याबद्दल आणि त्यांची तस्करी केल्याबद्दल तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे. राकेश यांना गेल्या वर्षी मार्चमध्ये निलंबित करण्यात आले होते आणि त्यांच्यावर लादलेली बंदी त्याच कालावधीपासून लागू होईल.

राष्ट्रीय आंतरराज्यीय चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक विजेती धावपटू प्रकृती रूपा राव हिला प्रतिबंधित स्टिरॉइड्स स्टॅनोजोलॉल आणि ड्रोस्टानोलोनसाठी पॉझिटिव्ह चाचणी आल्यानंतर तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे. इतर प्रमुख नावांमध्ये खेलो इंडिया गेम्समधील सुवर्णपदक विजेती वेटलिफ्टर चेल्सी हिचा समावेश आहे, जिच्यावर डोप चाचणीत अयशस्वी ठरल्याबद्दल पाच वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. ■

# आज सूर्यवंशीला ‘वैभवा’ची संधी

## भारत-अफगाणिस्तान तिसरा टी-२० सामना, भारताकडून जोरदार फटकेबाजीची अपेक्षा

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

पहिले दोन सामने जिंकून मालिकेत अभेद्य आघाडी घेतल्यानंतर, भारतीय संघ गुरुवारी येथे होणाऱ्या तिसऱ्या आणि अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अफगाणिस्तानविरुद्ध क्लीन स्वीप करण्याचा प्रयत्न करेल. या निर्णयामुळे वैभव सूर्यवंशीसारख्या प्रतिभावान खेळाडूला संधी मिळू शकते.

भारतीय संघाने पहिल्या दोन सामन्यांमध्ये दमदार कामगिरी करत अफगाणिस्तानला प्रत्येक विभागात मात दिली आहे. भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने मंगळवारी दुसऱ्या सामन्यानंतर सांगितले की, १९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशियाई खेळांसाठी जपानला रवाना होण्यापूर्वी सर्व खेळाडूंना आवश्यक सराव मिळावा यासाठी फिरोजशाह कोटला येथे होणाऱ्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यासाठी संघात बदल केला जाऊ शकतो.



आतापर्यंतच्या निवडीवरून हे स्पष्ट झाले आहे की, सूर्यवंशीला संघात स्थान देण्यासाठी भारत कोणतेही विशेष प्रयत्न करण्यास इच्छुक नाही. त्यावेळी संजू सॅमसन सर्वोत्तम फॉर्ममध्ये नसल्यामुळे सूर्यवंशीने जुलैमध्ये इंग्लंड दौऱ्यावर पदार्पण केले होते. सध्या, सॅमसन आणि अभिषेक शर्मा दोघेही चांगल्या फॉर्ममध्ये आहेत. ते नियमितपणे एकाच फॉरमॅटमध्ये खेळतात आणि त्यामुळे त्यांना विश्रांती घ्यायची नसेल. म्हणून, संघ व्यवस्थापनाला बदलाचा निर्णय घ्यावा लागेल.

ईशान किशनला विश्रांती देऊन सूर्यवंशीला अंतिम ११ मध्ये स्थान देण्याचा पर्यायही आहे. राष्ट्रीय संघात सहभागी होण्यापूर्वी किशनने दुलिप ट्रॉफीमध्ये पूर्व विभागाचे कर्णधारपद भूषवले होते. सध्याच्या मालिकेत सॅमसन यष्टीरक्षणाची जबाबदारी सांभाळत आहे. संघ व्यवस्थापन अय्यर आणि तिलक वर्मा यांनाही खेळपट्टीवर काही वेळ देऊ इच्छिते, कारण पहिल्या दोन सामन्यांमधील पहिल्या तीन फलंदाजांच्या प्रभावी कामगिरीमुळे इतर फलंदाज मर्यादित राहिले आहेत. नितीश कुमार रेड्डी आणि शिवम दुबे यांसारख्या खेळाडूंना अद्याप फलंदाजीची संधी मिळालेली नाही. मंगळवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात नितीश कुमार रेड्डीने २४ धावांत तीन बळी घेतले. ते संघासाठी एक चांगले चिन्ह आहे. त्याला दुखापतग्रस्त हार्दिक पांड्यासाठी पर्यायी खेळाडू म्हणून पाहिले जात आहे. दुखापतग्रस्त वरुण चक्रवर्तीच्या जागी खेळणाऱ्या रवी बिश्नोईने दुसऱ्या सामन्यात चांगली कामगिरी केली आणि त्याला आणखी एक संधी मिळण्याची शक्यता आहे. जसप्रीत बुमराह आणि अर्शदीप सिंग नेहमीप्रमाणेच प्रभावी ठरले.

अफगाणिस्तानला पुन्हा प्रथम फलंदाजीची संधी मिळाली, तर भारताला आव्हान देण्यासाठी त्यांना किमान २०० धावा कराव्या लागतील. आणखी एका मोठ्या पराभवानंतर, अफगाणिस्तानचा कर्णधार इब्राहिम झद्रान म्हणाला, १५०-१६० धावांचे २०० धावांमध्ये रूपांतर कसे करायचे यावर आम्ही चर्चा केली. जर तुम्हाला आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वात बलाढ्य संघांना हरवायचे असेल, तर आमच्या फलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागेल, यावर त्याने भर दिला. ◀ (वृत्तसंस्था)

**भारत-अफगाणिस्तान तिसरा टी-२० सामना**
**स्थळ :** अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ :** सायं. ७.३० पासून
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्टसवर



जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर येथे बुधवारी आयोजित ‘नॉर्थ इंडिया डेडलिफ्ट चॅम्पियनशिप २०२६’ दरम्यान २१ वर्षीय पॉवरलिफ्टर बरिराह फयाज वजन उचलताना

### भारतीय तिरंदाज चांगली कामगिरी करतील : बॅनर्जी

**कोलकाता :** १९ वर्षांनंतर तिरंदाजी विश्वचषक अंतिम फेरीत सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय तिरंदाज डोला बॅनर्जी यांनी धीरज बोम्मादेवराच्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त केला, यामुळे भारतीय तिरंदाजांना आशियाई क्रीडा स्पर्धेत चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळेल, असे डोला बॅनर्जी म्हणाल्या. ■

### मिली, मोना, अवनीला सांघिक सुवर्ण पदक

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

मिली शाह, मोना अग्रवाल आणि अवनी लेखरा यांनी दक्षिण कोरियात झालेल्या चांगवॉन २०२६ डब्ल्यूएसपीएस पॅरा शूटिंग जागतिक चॅम्पियनशिपमध्ये महिलांच्या १० मीटर एअर रायफल आर २ प्रकारात सुवर्णपदक जिंकले.

**पॅरा शूटिंग जागतिक चॅम्पियनशिप**

राकेश निदागुंडी, आनंद कृष्णा आणि स्वरूप उन्हळकर यांनी पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल आर १ स्टँडिंग एसएच१ सांघिक प्रकारात रौप्यपदक जिंकले. महिलांच्या संघाने एकूण १८७८.६ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. मोनाने वैयक्तिक प्रकारात रौप्यपदक, तर अवनीने कांस्यपदक जिंकले. आर १ प्रकारात, हात किंवा पायाचे अपंगत्व असलेले पुरुष खेळाडू १० मीटर अंतरावरील लक्ष्यावर नेम साधण्यासाठी उभे राहून किंवा बसून आपल्या रायफलचे संपूर्ण वजन पेलतात. आर २ प्रकारात हात किंवा पायाचे अपंगत्व असलेल्या महिला स्पर्धकांचा समावेश असतो, ज्या उभ्या राहून किंवा बसून आपल्या रायफल हाताळतात. ◀ (वृत्तसंस्था)

## ‘नेमबाजांनी वैयक्तिक पदके जिंकण्याकडे लक्ष द्यावे’

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी सांघिक स्पर्धांऐवजी वैयक्तिक पदके जिंकण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे मत ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता विजय कुमारने व्यक्त केले.

आशियाई क्रीडा स्पर्धेत तीस भारतीय नेमबाज सहभागी होणार आहेत. माजी पिस्तूल नेमबाज असलेल्या विजय कुमारचा विश्वास आहे की, भारतीय खेळाडूंकडे पुरेसा अनुभव आहे आणि ते सर्व स्पर्धांमध्ये पदके जिंकतील. विजयने सांगितले, भारतीय नेमबाजीमध्ये प्रचंड सुधारणा झाली आहे आणि आमचे नेमबाज आता खूप अनुभवी आहेत. त्यांनी यावर्षी अनेक पदके जिंकली आहेत. मला आशा आहे की संघातील प्रत्येक सदस्य पदक घेऊन परतेल. तथापि, खेळाडूंनी सांघिक पदकांऐवजी वैयक्तिक पदके जिंकण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. यामुळे त्यांची कामगिरी अधिक चांगली आणि उल्लेखनीय होईल, यावर त्याने भर दिला.

भारतीय खेळाडूंना चीनकडून कठीण आव्हानाचा सामना करावा लागेल. चीन अजूनही पुढे असल्याचे विजयने मान्य केले.

चीनची कामगिरी चांगली आहे. ते तळागाळाच्या स्तरावर तयारी करतात आणि या बाबतीत भारत अजूनही मागे असल्याचे कबूल केले. प्रशिक्षण हे एक असे क्षेत्र आहे जिथे भारताला लक्षणीय सुधारणा करण्याची गरज आहे. त्यांनी प्रशिक्षण चमूमध्ये आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंचा समावेश करण्याची शिफारस केली. ◀ (वृत्तसंस्था)

# डब्ल्यूपीएलच्या तारखा घोषित; स्थळ मात्र अनिश्चित

### खेळाडू कायम ठेवण्याची अंतिम मुदत जाहीर

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

महिला प्रीमियर लीगचा (डब्ल्यूपीएल) पाचवा हंगाम १४ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२७ दरम्यान खेळवला जाईल आणि खेळाडूंचा लिलाव २८ ऑक्टोबर रोजी कोची येथे होईल, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) बुधवारी जाहीर केले. तथापि, बीसीसीआयने अद्याप डब्ल्यूपीएलसाठी यजमान शहरांची घोषणा केलेली नाही.

एका निवेदनात, बीसीसीआयने म्हटले आहे की, महिला क्रिकेटमधील सर्वात मोठी टी-२० लीग म्हणून, टाटा डब्ल्यूपीएलने खेळाच्या विकासासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून स्वतःला स्थापित केले आहे. ही लीग भारत आणि जगभरातील अव्वल खेळाडूंना एकत्र आणते आणि उदयोन्मुख प्रतिभेला सर्वोच्च स्तरावर कामगिरी करण्याची संधी देते.

**मुंबई, बंगळुरू विजेता**

आतापर्यंत डब्ल्यूपीएलचे चार हंगाम खेळले गेले असून, दोन संघांनी दोनदा चषक जिंकला आहे. मुंबई इंडियन्सने पहिला हंगाम जिंकला, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने २०२४ चे विजेतेपद पटकावले. यानंतर, मुंबईने २०२५ मध्ये पुन्हा विजेतेपद पटकावले आणि बंगळुरूने २०२६ मध्ये पुन्हा विजेतेपद मिळवले. या स्पर्धेत यूपी वॉरियर्स, गुजरात टायटन्स, दिल्ली कॅपिटल्स, मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांचा समावेश आहे. ■

**खेळाडू कायम ठेवण्याची तारीख जाहीर**

खेळाडू कायम ठेवण्याची अंतिम मुदत २८ सप्टेंबर निश्चित करण्यात आली आहे. बीसीसीआयने सांगितले की, सर्व पाच फ्रँचायझींना त्यांच्या सध्याच्या संघांमधून खेळाडू कायम ठेवण्याची संधी मिळेल. यासह, ते आगामी हंगामासाठी त्यांच्या संघाची रचना अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू करतील.

डब्ल्यूपीएलची ठिकाणे अद्याप निश्चित झालेली नाहीत. मागील हंगाम मुंबई, वडोदरा आणि बंगळुरु येथे खेळला गेला होता. तथापि, पुढील हंगामासाठी ठिकाणे बदलू शकतात. वाराणसीच्या गंजारी येथे बांधण्यात येत असलेल्या नवीन स्टेडियममध्ये डब्ल्यूपीएलचे सामने आयोजित केले जाऊ शकतात. तथापि, सुरुवातीला तेथे रणजी ट्रॉफीचे सामने देखील आयोजित केले जाण्याची शक्यता आहे. ◀ (वृत्तसंस्था)

## दिल्ली हाफ मॅरेथॉन पदकांचे अनावरण

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

वर्ल्ड ॲथेलिटिक्सची ‘गोल्ड लेबल’ शर्यत असलेल्या दिल्ली हाफ मॅरेथॉनच्या २१व्या आवृत्तीचे बुधवारी प्रतिष्ठित ‘फिनिशर्स मेडल’चे (शर्यत पूर्ण करणाऱ्या स्पर्धकांना दिले जाणारे पदक) अनावरण करण्यात आले. प्रत्येक धावपटूसाठी यशाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या पदकाचे अनावरण दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या हस्ते दिल्ली सचिवालयात करण्यात आले.



दिल्ली हाफ मॅरेथॉन रविवार, १८ ऑक्टोबर रोजी प्रतिष्ठित जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर आयोजित केली जाईल. या स्पर्धेत देशभरातून आणि जगभरातून हजारो धावपटू सहभागी होतील. गेल्या दोन दशकांत, दिल्ली हाफ मॅरेथॉन ही राजधानीच्या क्रीडा ओळखीचा एक अविभाज्य भाग बनली आहे. या उपक्रमाने दिल्लीकरांना फिटनेस, सहभाग आणि धावण्याच्या उत्साहाच्या उत्सवात एकत्र आणले आहे.

आरोग्य आणि फिटनेसवर लक्ष केंद्रित करणे, महिलांचा वाढता सहभाग आणि त्याचा व्यापक सामाजिक-आर्थिक व परोपकारी प्रभाव यामुळे दिल्ली हाफ मॅरेथॉन राष्ट्रीय राजधानीसाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम बनला आहे. सहभागींचा उत्साह आणि जोश खरोखरच प्रेरणादायी आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिल्ली सरकार या कार्यक्रमाच्या पाठीशी उभे आहे, असे मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या. ◀ (वृत्तसंस्था)

## विजयाच्या इच्छेने महिला क्रिकेट संघ जपानमध्ये दाखल

**टोकियो, १६ सप्टेंबर**

आशियाई खेळांमधील गतविजेता संघ आपले अलिकडील यश कायम ठेवण्याच्या वचनबद्धतेने जपानमध्ये दाखल झाला आहे. आमचे खेळाडू आशियाई खेळांच्या अनोख्या वातावरणाची आतुरतेने वाट पाहत आहेत, असे भारतीय महिला क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मजुमदार यांनी सांगितले.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने नुकतेच दुबईमध्ये टी-२० आशिया कपचे विजेतेपद पटकावले. आता त्यांचे लक्ष आशियाई खेळांवर आहे. तेथे ते आणखी एक सुवर्णपदक जिंकण्यासाठी कटिबद्ध आहेत. भारतीय संघाने २०२३ मध्ये हांगझू येथे सुवर्णपदक जिंकले होते.

आशियाई खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी संघ उत्सुक आहे. त्यांना या बहु-क्रीडा स्पर्धेचा पुरेपूर आनंद घ्यायचा आहे, असे मजुमदार आपल्या सपोर्ट स्टाफ आणि काही संघ सदस्यांसह येथे दाखल झाल्यानंतर म्हणाले.

प्रशिक्षण स्टाफसोबत येथे दाखल झालेल्या संघ सदस्यांमध्ये वेगवान गोलंदाज क्रांती गौड आणि फिरकी गोलंदाज श्री चरणी यांचाही समावेश आहे. मजुमदार म्हणाले की, आमच्या खेळाडूंनी विविध खेळांतील खेळाडूंसोबत राहण्याचा, गेम्स व्हिलेजच्या वातावरणाचा आणि बहु-क्रीडा स्पर्धेत भाग घेण्याचा पुरेपूर आनंद घ्यावा अशी माझी इच्छा आहे. संघाला निवासाची कोणतीही अडचण नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. ◀ (वृत्तसंस्था)

## भारतात होणार आयपीएल खेळाडूंचा लिलाव

### इम्पॅक्ट प्लेयर नियमावर अरुण धुमाळांनी मांडले मत

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

आगामी २०२७ च्या आयपीएल हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव भारतातच होणार आहे, असे आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमाळ यांनी सांगितले. गेल्या तीन वर्षांपासून हा लिलाव देशाबाहेर आयोजित केला जात होता, पण आता तो भारतात होण्याची इच्छा आहे. मागील तीन हंगामांचे लिलाव दुबई, जेद्दाह (मेगा लिलाव) आणि अबू धाबी येथे झाले होते.

अरुण धुमाळ म्हणाले, दरवर्षी आम्ही तो भारतात आयोजित करण्याचा प्रयत्न करतो, परंतु लग्नसराईच्या गर्दीमुळे आम्हाला जागा मिळत नाही. त्यामुळे, हा एक छोटा लिलाव असल्याने, यावर्षी तो निश्चितपणे भारतातच व्हावा अशी आमची इच्छा आहे आणि योग्य जागा मिळेल अशी आशा आहे. लिलावासाठी यजमान शहर बीसीसीआयच्या पसंतीच्या जागेच्या उपलब्धतेनुसार ठरवले जाईल, असे ते म्हणाले.

नुकत्याच झालेल्या बीसीसीआय नियामक परिषदेच्या बैठकीत वादग्रस्त ‘इम्पॅक्ट प्लेयर’ नियमावरही चर्चा झाली, कारण मंडळाने या नियमावर संघांकडून नवीन अभिप्राय मागवले आहेत, जो २०२७ पर्यंत लागू राहणार आहे. बहुतेक खेळाडूंचे म्हणणे आहे की, हा नियम अष्टपैलू खेळाडूंच्या भूमिकेला कमी लेखतो. ◀ (वृत्तसंस्था)

# स्वामी रामदेव यांनी लुटला कबड्डीचा आनंद

**भारतीय शिक्षण मंडळाची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

**हरिद्वार, १६ सप्टेंबर**

भारतीय शिक्षण मंडळांतर्गत दुसऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा पहिला टप्पा हरिद्वार येथील आचार्यकुलमच्या भव्य आणि दिमाखदार इनडोअर स्टेडियममध्ये संपन्न झाला. स्वामी रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांनी राष्ट्रीय स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले.



१०० कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या आचार्यकुलमच्या इनडोअर स्टेडियममध्ये देशाच्या विविध भागांतील खेळाडूंनी कबड्डी, बॅडमिंटन, बास्केटबॉल, फुटबॉल आणि कुस्ती या खेळांमध्ये आपले सामर्थ्य दाखवले. उद्घाटन सोहळ्यातील एक मनोरंजक बाब म्हणजे स्वामी रामदेव यांनी कबड्डीमध्येही आपली जादू दाखवली. दुसऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा पुढील टप्पा वाराणसी, प्रयागराज, बुलंदशहर, दिल्ली आणि हापूर येथे आयोजित केला जाईल. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा २५ ऑक्टोबर रोजी संपेल. स्पर्धेच्या पहिल्या फेरीच्या समारोपप्रसंगी, स्वामी रामदेव यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व खेळाडूंना पदके आणि चषक देऊन सन्मानित केले.

भारतीय शिक्षण मंडळांतर्गत दुसरी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा १४ आणि १५ सप्टेंबर रोजी हरिद्वार येथील आचार्यकुलम येथे सुरू झाली. उद्घाटनप्रसंगी स्वामी रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांनी सर्व सहभागींना आशीर्वाद दिला. त्यांनी यावर जोर दिला की खेळ कधीही जय-पराजयाच्या भावनेने खेळला जाऊ नये, तर तो खिलाडूवृत्तीने खेळला जावा. भारतीय शिक्षण मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष एन. पी. सिंग यांनीही देशाच्या विविध भागांतील सहभागींना उत्साहाने कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित केले. भारतीय शिक्षण मंडळाचे राष्ट्रीय समन्वयक, स्वामी पुण्यदेव म्हणाले की, पहिल्या फेरीनंतर क्रीडा स्पर्धेचा दुसरा टप्पा १९ व २० सप्टेंबर रोजी वाराणसी, २६ व २७ सप्टेंबर रोजी प्रयागराज, ३ व ४ ऑक्टोबर रोजी बुलंदशहर, १० व ११ ऑक्टोबर रोजी दिल्ली आणि २४ व २५ ऑक्टोबर रोजी हापूर येथे सुरू होईल.

१४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील बॅडमिंटन स्पर्धांमध्ये, १४ वर्षांखालील गटात आचार्यकुलमने प्रथम क्रमांक पटकावला, त्यानंतर गुरुकुल किशनगड घासेरा दुसऱ्या स्थानावर राहिले, तर द एरूडाइट वर्ल्ड स्कूल आणि स्वामी दर्शनानंद हायर सेकंडरी स्कूल यांनी तिसरे स्थान विभागून घेतले. ◀ (वृत्तसंस्था)

# वेस्ट इंडीजविरुद्धच्या टी-२० साठी भारतीय संघ जाहीर

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

वेस्ट इंडीज संघ सप्टेंबर-ऑक्टोबर २०२६ मध्ये भारताचा दौरा करणार असून, या दौऱ्यात ३ एकदिवसीय आणि ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाईल. बीसीसीआयने १६ सप्टेंबर रोजी या मालिकेसाठी भारतीय एकदिवसीय आणि टी-२० संघांची घोषणा केली. भारतीय संघात अनेक स्टार खेळाडूंची निवड झाली आहे. श्रेयस अय्यर संघाचे कर्णधारपद भूषवणार आहे. या दौऱ्याची सुरुवात ३ एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेने होईल, त्यानंतर टी-२० मालिका खेळवली जाईल.

प्रिन्स यादव आणि मयंक यादव यांची वेस्ट इंडीजविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी निवड झाली आहे. या दोन्ही खेळाडूंनी पुनरागमन केले आहे. टी-२० संघात अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, ईशान किशन आणि तिलक वर्मा यांसारख्या नियमित खेळाडूंचाही समावेश आहे. दरम्यान, हार्दिक पांड्याला दुखापतीमुळे संघातून वगळण्यात आले आहे.

दीर्घ काळानंतर ऋतुराज गायकवाडचे एकदिवसीय मालिकेसाठी पुनरागमन झाले आहे. वेगवान गोलंदाज आकिब नबीचीही एकदिवसीय मालिकेसाठी निवड झाली आहे. नमन धीरचीही पहिल्यांदाच भारतीय एकदिवसीय संघात निवड झाली आहे. शेर-ए-पंजाब टी-२० लीगमध्ये धीरच्या प्रभावी कामगिरीमुळे त्याचे कौतुक होत आहे. जसप्रीत बुमराहला टी-२० आणि एकदिवसीय मालिकेसाठी विश्रांती देण्यात आली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली एकदिवसीय मालिकेत पुन्हा एकदा मैदानात उतरताना दिसतील. ◀ (वृत्तसंस्था)

**टी-२० मालिकेसाठी भारतीय संघ**

श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, ईशान किशन (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), तिलक वर्मा (उपकर्णधार), शिवम दुबे, कुलदीप यादव, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, नितीश कुमार रेड्डी, अर्शदीप सिंह, प्रिंस यादव, मयंक यादव.

**एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघ**

शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, केएल राहुल (उपकर्णधार), ध्रुव जुरेल, नितीश कुमार रेड्डी, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, प्रसिध कृष्णा, गुरनूर ब्रार, मोहम्मद सिराज, आकिब नबी, यशस्वी जैस्वाल, नमन धीर. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पुरस्कारांची फाइल धूळखात; कर्मचाऱ्यांच्या कौतुकाला मुहूर्त कधी?

## आदर्श शिक्षक, अभियंता, ग्रामसेवक पुरस्कार दोन-तीन वर्षांपासून रखडले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात उल्लेखनीय काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या पुरस्कारांनाच आता प्रशासकीय दिरंगाईचे ग्रहण लागले आहे. आदर्श शिक्षक, आदर्श अभियंता आणि आदर्श ग्रामसेवक पुरस्कार गेल्या दोन ते तीन वर्षांपासून रखडल्याने गुणवंत कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, पुरस्कारांची निवड प्रक्रिया आणि वितरण वेळेत होत नसल्याने चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांत कार्यरत



असलेले कर्मचारी ग्रामीण भागातील शिक्षण, विकासकामे, पाणीपुरवठा, ग्रामविकास तसेच प्रशासकीय कामकाजात योगदान देतात. अशा कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी विविध पुरस्कार दिले जातात. मात्र, मागील काही वर्षांपासून ही प्रक्रिया नियमित राहिलेली नाही.त्यामुळे प्रशासनाच्या या आश्वासनानंतर पुरस्कार वितरणाचा रखडलेला प्रवास खरोखरच पूर्ण होतो का, याकडे आता जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### प्रशासनाकडून १५ दिवसांत वितरणाचे आश्वासन

रखडलेल्या पुरस्कारांच्या प्रश्नावर प्रशासनाने आता हालचाली सुरू केल्या आहेत. सर्व आस्थापनविषयक प्रलंबित बाबींसह आदर्श शिक्षक, अभियंता आणि ग्रामसेवक पुरस्कारांचे वितरण पुढील पंधरा दिवसांत मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल.

**- सूर्यकांत भुजबळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

### तीन वर्षांपासून पुरस्कार रखडले

आदर्श ग्रामसेवक पुरस्काराचे वितरण गेल्या तीन वर्षांपासून झाले नसल्याचे समोर आले आहे. आदर्श शिक्षक आणि आदर्श अभियंता पुरस्कारांची स्थितीही अशीच असल्याने संबंधित प्रस्ताव आणि निवड प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. पुरस्कारासाठी पात्र कर्मचाऱ्यांची निवड, प्रस्तावांची छाननी आणि अंतिम मान्यता याबाबत वेळापत्रक निश्चित करून प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज आहे.

### प्रोत्साहनाऐवजी प्रतीक्षाच

गुणवंत कर्मचाऱ्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना सन्मानित केल्याने इतर कर्मचाऱ्यांनाही चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे पुरस्कार केवळ सन्मानापुरते मर्यादित न राहता प्रशासनातील कार्यक्षमतेला चालना देणारे माध्यम ठरतात. मात्र, पुरस्कारच वेळेत मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांच्या उत्साहावर परिणाम होत असल्याची भावना आहे.

# खासदार ओमराजे निंबाळकर शेतकऱ्यांच्या बांधावर

## बार्शी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १६ सप्टेंबर -**

दीड महिन्यापासून पावसाने दिलेल्या ओढ्यामुळे बार्शी तालुक्यात शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. सोयाबीनसह विविध पिके आणि फळबागा पाण्याअभावी जळून जात असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत खासदार ओमराजे निंबाळकर यांनी तालुक्यातील विविध गावांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली.

खासदार निंबाळकर यांनी आगळगाव, बाभळगाव, पुरी, कुसळंब तसेच पांगरी आणि घारी या गावांचा दौरा केला.



### संकटाच्या काळात बळीराजाच्या पाठीशी

दीड महिन्यापासून पाऊस नसल्याने पिके डोळ्यादेखत वाळत आहेत. शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. या कठीण प्रसंगात आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. बाधित शेतकऱ्यांना शासनाकडून योग्य ती नुकसानभरपाई व मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडे सतत पाठपुरावा केला जाईल.'

**- खासदार ओमराजे निंबाळकर**

शेतामध्ये वाळून चाललेल्या सोयाबीन व फळबागांची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा, अडचणी आणि आर्थिक संकटाची माहिती जाणून घेतली. प्रशासनाने विलंबाशिवाय सर्व नुकसानग्रस्त भागाचे तातडीने आणि वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, अशा कडक सूचना खासदार निंबाळकरांनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत.

# महालक्ष्मी सणासाठी महिलांची बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी

## आराशीच्या साहित्यांची मोठ्या प्रमाणात विक्री

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ सप्टेंबर -**

पंढरपूर येथे गणपती आणि महालक्ष्मी सणासाठी बाजारपेठ सजली असून विविध सजावटीच्या वस्तू खरेदीसाठी महिलांनी गर्दी केली.

शहरातील महात्मा गांधी रोड, नवी पेठ, भादुले चौक, स्टेशन रोड आदी भागांत विविध तात्पुरती दुकाने थाटण्यात आली आहेत. महालक्ष्मी ज्येष्ठा-कनिष्ठांसाठी लागणारे मांडव, फोल्डिंग पाईप, पडदे, देवीसमोर ठेवण्यात येणारी मातीची खेळणी, आदी साहित्य खरेदीसाठी झुंबड उडाली होती.

तयार मांडव २,५०० ते ३,५०० रुपयांपर्यंत उपलब्ध




### ... तरी सर्वकाही करावेच लागते

बाजारपेठेत प्रत्येक वस्तुंची मागणी बाढल्याने सध्या दरदेखील वाढलेले दिसत आहेत.पंढरपूर येथे अहमदाबाद, मुंबई, हैदराबाद, पुणे, संभाजीनगर येथुन सजावटीचे साहित्य आले आहे. महालक्ष्मीचा सण हा महत्वाचा सण आहे. त्यामुळे महागाई, पाऊस नसला तरी काही नाही म्हटले तरी सर्वकाही करावेच लागते असे महिलावर्गातून बोलले जात होते.

आहेत. चिनी मातीची खेळणी, प्राणी-पक्ष्यांच्या जोड्या ५० ते ७५ रुपये, लाईटच्या माळा १५० ते २५० रुपये, मांडवासाठी पडदे १,५०० ते २,००० रुपये, प्लास्टिक फुलांचे ताटवे, हार, फ्लॉवर पॉट १०० ते १५० रुपयांना मिळत आहेत.

# जबरी चोरीचा गुन्हा १२ तासांत उघड; २ आरोपी अटकेत, २ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## सोलापूर शहर गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर गुन्हे शाखेने धडक कारवाई करत दत्त चौक परिसरातून एका वयोवृद्धास धमकावून १ लाख रुपयांची रोकड लुटणारा जबरी चोरीचा गुन्हा अवघ्या १२ तासांच्या आत उघडकीस आणला आहे. या प्रकरणात दोन आरोपींना जेरबंद केले आहे. लुटलेली रोकड आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण २ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मल्लिनाथ जवळगी (वय ३६, रा. घर नं. ८१६, उत्तर कसबा शेटे वाडा सोलापूर) आणि नागेश मल्लिनाथ बळते (वय १८ वर्षे २० दिवस, रा. ८१६ उत्तर कसबा शेटे वाडा सोलापूर) अशी अटक



केलेल्या आरोपींची नावे आहेत.शहर गुन्हे शाखेचे पोलीस उप-निरीक्षक विजय बनसुडे व त्यांचे पथक हे आज बुधवार दि. १६ सप्टेंबर रोजी सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत गणेशोत्सवाच्या अनुषंगाने चोरी व इतर गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेत गस्त घालत होते.

त्या दरम्यान, सोलापूर शहरातील जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागील कम्पाऊंडच्या भिंतींलगत (मार्केट चौकी ते हरिभाई प्रशाला जाणारा सार्वजनिक रस्ता) दुचाकीसह दोन संशयित तरुण थांबल्याची बातमी पोलिसांना मिळाली. त्याप्रमाणे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन दोघांनाही ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांच्याजवळील पिशवीत रोकड सापडली. चौकशीत आरोपींनी दत्त चौकातील 'राजेंद्र ज्वेलर्स'च्या दुकानाजवळून पादचारी एका वयस्क इसमाचा पाठलाग करून, त्यांना दमदाटी करून त्यांच्याकडील एक लाख रोकड असलेली पिशवी जबरदस्तीने हिसकावून नेल्याचे कबूल केले.या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. पोलिसांनी अवघ्या १२ तासांत या गुन्ह्याची उकल केली.

सदरची कामगिरी शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक विजय बनसुडे व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे व शंकर याळगी यांनी पार पाडली आहे.

# पीएम सूर्य घर व 'स्मार्ट' योजनेची माहिती आता तालुका पातळीवर

## महावितरण आजपासून उभारणार 'किओस्क' सेवा सेतू कॅम्प

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा सेतू कॅम्प'चे विशेष आयोजन केले आहे. मोहिमेंतर्गत 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट)' योजनेची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महावितरण तालुका पातळीवर विशेष 'किओस्क' उभारणार आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सर्व तालुका पातळीवर हे किओस्क उभारण्याचे निर्देश दिले आहेत. या किओस्कच्या माध्यमातून ग्राहकांना रूफटॉप सौर ऊर्जा योजनांचा लाभ घेण्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल.

किओस्कमध्ये सौर योजनेसाठी ऑनलाईन अर्ज कसा करावा, याचे थेट प्रात्यक्षिक व मार्गदर्शन महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून केले जाईल.विविध बँकांचे




प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे ग्राहकांना घटनास्थळीच ऑनलाईन अर्ज भरण्यासोबतच सोलर सिस्टीमसाठी लागणाऱ्या बँक कर्जासाठीही अर्ज करता येईल. 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्मार्ट' योजनेची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# काम होत नसल्याच्या तक्रारीवरून सत्ताधारी सदस्याचा ठिय्या

## माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर आंदोलन

## अध्यक्ष-उपाध्यक्षांच्या हस्तक्षेपानंतर प्रकरण शांत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील प्रलंबित कामावरून सत्ताधारी गटाच्या सदस्याने थेट शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर ठिय्या दिल्याने बुधवारी जिल्हा परिषदेत काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. काम होत नसल्याचा आरोप करीत सदस्य सोनाली कडते व त्यांचे पती प्रशांत कडते यांनी शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या कार्यालयासमोर ठिय्या मांडला. अखेर जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या हस्तक्षेपानंतर या प्रकरणावर तोडगा काढण्यात आला.

मंद्रूप जिल्हा परिषद गटाच्या सदस्य सोनाली कडते व प्रशांत कडते बुधवारी सकाळी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर आले. शिक्षकाच्या कामासंदर्भात शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करूनही कार्यवाही होत नसल्याचा त्यांचा आरोप होता. शिक्षणाधिकारी जगताप यांनी त्यांना दालनात येऊन चर्चा करण्याची विनंती केली. मात्र, 'सत्ताधारी सदस्य असूनही आमची कामे होत नाहीत,' अशी भूमिका घेत कडते यांनी कार्यालयात जाण्यास नकार दिला.

दरम्यान, हा प्रकार जिल्हा परिषदेत चर्चेचा विषय ठरला. विभागातील कर्मचाऱ्यांनीही समजूत काढण्याचा प्रयत्न केला; मात्र ठिय्या सुरूच राहिल्याने कार्यालय परिसरात गर्दी झाली.

### कार्यालयातील गोंधळाची दुसरी घटना

माध्यमिक शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्यालयात दबाव आणण्याचा हा पहिलाच प्रकार नसल्याची चर्चा जिल्हा परिषदेत सुरू झाली आहे. यापूर्वी जिल्हा परिषदेच्या एका माजी सदस्याने माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयात गोंधळ घातल्याची घटना घडली होती. त्याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर पुन्हा विद्यमान सदस्याने कार्यालयाबाहेर ठिय्या दिल्याने शिक्षण विभागातील प्रशासकीय कामकाजावर लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपाचा मुद्दा चर्चेत आला आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष वैद्य यांनी संबंधित मागणीवर नियमांनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना शिक्षणाधिकाऱ्यांना दिल्या. त्यानंतर कडते यांना ठिय्या मागे घेण्यास सांगण्यात आले आणि काही वेळातच परिस्थिती निवळली.

**अध्यक्षांच्या हस्तक्षेपाने चर्चा**

घटनेची माहिती मिळताच अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी माध्यमिक शिक्षण विभागात धाव घेतली. त्यांनी कडते यांच्याशी चर्चा करून त्यांना शिक्षणाधिकाऱ्यांच्या दालनात नेले. यावेळी शिक्षणाधिकारी जगताप यांनी संबंधित प्रकरणातील प्रशासकीय बाबी व आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली.

**'सदस्यांनी कामे माझ्याकडे द्यावीत'**

या घटनेवर अध्यक्ष दीपक वैद्य यांनी स्पष्ट भूमिका मांडली. सदस्यांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन व पदाधिकारी उपलब्ध असताना सदस्यांनी थेट अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर ठिय्या देण्याऐवजी आपली कामे पदाधिकाऱ्यांकडे मांडावीत. प्रत्येक काम नियम व प्रशासकीय प्रक्रियेनुसारच करण्याचा आग्रह सदस्यांनी धरावा, असे त्यांनी सांगितले.

**'कागदपत्रांची पूर्तता आवश्यक'**

शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी सांगितले की, कडते यांनी मांडलेल्या प्रकरणात काही प्रशासकीय त्रुटी आहेत. वादग्रस्त शिक्षण संस्थांमधील शिक्षकांच्या मान्यतेच्या प्रकरणात संबंधित संस्थेचे पदाधिकारी कोण आहेत, हे स्पष्ट करण्यासाठी सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडील उतारा आवश्यक असतो. संबंधित कागदपत्र सादर करण्याबाबत कडते यांना कळिवण्यात आले होते. मात्र, आवश्यक पत्र न आणता ठिय्या आंदोलन करण्यात आले. नियमबाह्य कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही, अशी भूमिका जगताप यांनी स्पष्ट केली.

## महत्वाचे...

### श्रीपूरमध्ये तरुणावर हल्ला; आठ जणांवर गुन्हा

**श्रीपूर, दि.१६ सप्टेंबर -**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील शिवाजीनगर व छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या वादातून एका तरुणावर सत्तूर, गज व दांडक्यांनी हल्ला झाल्याची घटना १५ सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी अकलूज पोलिस ठाण्यात आठ नामनिर्देशित तसेच दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.अक्षय शिरसट (वय २१ रा. शिवाजीनगर (सेक्शन ९ ) यांच्या तक्रारीनुसार, ते घरासमोर बसले असताना काहीजण तेथे आले. एकाने वाद घालत सत्तूरने डोक्यावर दोन-तीनदा वार केला. इतरांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादीचा भाऊ सौरभ शिरसट व मदतीसाठी आलेले विकास जाधव यांनाही मारहाण झाल्याचा आरोप केला आहे. नंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात पुन्हा सत्तूर, गज व दांडक्यांनी हल्ला केला. आरोपींनी धमकी दिल्याचाही आरोप आहे. या घटनेत फिर्यादीच्या डोक्यास, हातास व पायास दुखापत झाली असून इतर दोघेही जखमी झाले आहेत.या प्रकरणात किशु कदम, ओम पवार, सिद्धू नाईकनवरे, समाधान जगताप, बापू नाईकनवरे, अमर कांबळे, अमोल कांबळे व विश्वजीत माने यांच्यासह दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक करिश्मा वनवे करीत आहेत.

### अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून भेट; दोघांविरुद्ध पॉक्सोअंतर्गत गुन्हा

**बार्शी दि.१६ सप्टेंबर -**

अल्पवयीन मुलीचा पाठलाग करुन भेट घेणे, मोबाईलवर संदेश पाठवल्याने बार्शी शहर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.याबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संशयित आरोपी अबक (नाव बदलेले) याला संबंधित मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही तो तिला मोटारसायकलवरुन बार्शी येथील विविध ठिकाणी नेत असे. तिच्याशी मोबाईलवरुन संदेशाद्वारे संपर्क साधत असे. वेळोवेळी तिचा पाठलाग करीत असल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.दुसरा संशयित आरोपी तथद (नाव बदलेले) याने संबंधित मुलीला, 'तू माझ्याशीही अबकप्रमाणे भेट व बोल, अन्यथा तुझ्या घरी सर्व सांगेन,' अशा आशयाची धमकी दिली. तसेच तिच्याशी फोनवर चॅटिंग करुन वेळोवेळी भेटत असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात कलम ७४, ७८ तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ (पॉक्सो) कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा तपास सपोनि बाळासाहेब जाधव करीत आहेत.

### म्हशी उधळल्याच्या कारणावरुन दाम्पत्याला मारहाण; पत्नीच्या मनगटाचे हाड मोडले

**बार्शी दि. १६ सप्टेंबर -**

म्हशी उधळून दुसरीकडे लावल्याच्या कारणावरुन झालेल्या वादातून दाम्पत्याला काठी, दगड व बुक्यांनी मारहाण करण्यात आली. ही घटना बार्शी शहरातील लोकरे हॉस्पिटलसमोर घडली. मारहाणीत पत्नीच्या डाव्या मनगटाजवळील हाड फ्रॅक्चर झाले असून पतीच्या डोक्यासह पाठ व चेहऱ्यावर दुखापत झाली आहे. याप्रकरणी चौघांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पांडुरंग व्हनकळस (वय ४३, रा. भीमनगर, बार्शी) यांनी जगदाळे मामा हॉस्पिटल येथे उपचारादरम्यान जबाब दिला आहे. त्यांच्या जबाबानुसार, दि. १४ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास ते पत्नी रुक्मिणी यांच्यासोबत त्यांच्या म्हशी चारण्यासाठी शेताकडे घेऊन जात होते. भीमनगर कॉर्नरजवळील लोकरे हॉस्पिटलसमोर त्याच परिसरात राहणाऱ्या अक्षय वाघमारे याने मोठ्याने ओरडून म्हशी उधळून दुसरीकडे लावल्या. याचा जाब विचारल्यावर वाद वाढला. अक्षय वाघमारे याच्यासह सागर ओहोळ, प्रेम ओहोळ व अंदाजे २० वर्षे वयाच्या एका व्यक्तीने दाम्पत्याच्या हातातील काठ्या हिसकावून घेतल्या. तसेच केलेल्या मारहाणीत पत्नी रुक्मिणी यांच्या डाव्या मनगटाचे हाड मोडले. तसेच सागर पांडुरंग यांच्या चेहरा, नाकावर, तसेच रुक्मिणी यांच्या पाठीवर बुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे.

### माहेरहून २५ लाख रुपये आणण्यासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

माहेरून २५ लाख रुपये घेऊन येण्याच्या मागणीसाठी एका विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह तिघा जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती ललित, सासू पुष्पा, सासरे धर्मराज (सर्व रा. सिडको, नाशिक) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत अक्षता ललित कोठावदे (रा. संगमेश्वर नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी ही १७ डीसेंबर २०२३ ते २६ एप्रिल २०२६ दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला तू नोकरी करत नाहीस, तू नोकरी करुन तुझे घर चालव. तुझ्या वडीलांच्या शेतजमिनीतील हिस्सा घे तसेच माहेरून २५ लाख रुपये घेऊन येण्यासाठी शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . पोलीस हवालदार मुजावर हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### पोलिसात तक्रार केल्याच्या रागातून तलवार आणि रॉडने प्राणघातक हल्ला

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

पोलीसात तक्रार केल्याचा राग मनात धरून एकाच कुटुंबातील सदस्यांवर तलवार, लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी सामूहिक हल्ला केल्याची घटना मिलिंद नगर भागात घडली. या हल्ल्यात फिर्यादीसह त्यांच्या कुटुंबातील तीन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. दरम्यान याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात ७ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. किरण साळवे, मनिष साळवे, प्रतिक साळवे, यश साळवे, भिमराज साळवे, प्रतिभा साळवे आणि शकुंतला साळवे (सर्व रा. मिलींद नगर, बुधवार पेठ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत रतन काशिनाथ साळवे (रा. मिलिंद नगर, बुधवार पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे १४ सप्टेंबर रोजी रात्री १० च्या सुमारास कामावरून घरी परतत होते . त्यावेळी आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवले. ''तुम्ही आमच्याविरुद्ध पोलिसात तक्रार का करता? आज तुमच्या संपूर्ण कुटुंबालाच संपवून टाकतो,'' अशी धमकी देत आरोपींनी त्यांच्यावर लोखंडी रॉड आणि तलवारीने हल्ला चढवला. हा जीवघेणा हल्ला होत असल्याचे पाहून रतन साळवे यांची आई, बहीण, भाऊ आणि वहिनी हे भांडण सोडवण्यासाठी धावून आले. मात्र, आरोपींनी महिलांचाही मुलाहिजा न ठेवता त्यांना लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव करत आहेत.

## महत्वाचे...



### माजी राष्ट्रपती कोविंद यांची ठाण्यातील माला चिल्ड्रेन अँड न्यूबॉर्न हॉस्पिटलला सदिच्छा भेट

**ठाणे, १६ सप्टेंबर-**

ठाण्यातील माला चिल्ड्रेन अँड न्यूबॉर्न हॉस्पिटलला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंदजी यांनी त्यांच्या पत्नी व कन्येसह नुकतीच सदिच्छा भेट दिली. बालहृदयरोग तज्ज्ञ डॉ. दीपक चांगलानी आणि डॉ. तृप्ती डोंगरे चांगलानी यांच्या नेतृत्वाखाली माला चिल्ड्रेन अँड न्यूबॉर्न हॉस्पिटल नवजात शिशू, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आधुनिक, दर्जेदार व संवेदनशील आरोग्यसेवा देण्यासाठी कार्यरत आहे.नवजात शिशूंची विशेष काळजी, बालरोगविषयक उपचार तसेच बालहृदयरोग निदान व उपचार यांसह सर्वसमावेशक बालआरोग्य सेवा देण्यावर रुग्णालयाचा विशेष भर आहे.या भेटीदरम्यान कोविंदजी यांनी रुग्णालयाच्या कार्याची माहिती घेतली आणि डॉक्टर व वैद्यकीय पथकाशी संवाद साधला. मुलांच्या आणि नवजात शिशूंच्या आरोग्यासाठी रुग्णालयाकडून करण्यात येत असलेल्या कार्याचे त्यांनी कौतुक केले तसेच रुग्णालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले. त्यांची ही भेट डॉ. चांगलानी, डॉ. डोंगरे चांगलानी आणि माला हॉस्पिटलच्या संपूर्ण टीम साठी अत्यंत अभिमानाची आणि प्रेरणादायी ठरली. त्यांच्या शुभेच्छा व आशीर्वादामुळे बालआरोग्य क्षेत्रातील आपले कार्य अधिक समर्पणाने पुढे नेण्याची प्रेरणा मिळाली आहे.

# नेहरु वसतिगृहाचे स्ट्रक्चर ऑडिट नऊ लाख रुपये भरुनही रखडले

### शासकीय तंत्रनिकेतनची असमर्थता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

नेहरू वसतिगृहाच्या जुन्या इमारतीच्या सुरक्षिततेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले स्ट्रक्चरल ऑडिट तब्बल नऊ लाख रुपये शुल्क अदा करूनही रखडले आहे. जिल्हा परिषदेने हे काम शासकीय तंत्रनिकेतनकडे सोपविले होते; मात्र, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने ऑडिट करणे शक्य नसल्याचे संस्थेने कळिवले आहे. त्यामुळे आता सक्षम तांत्रिक संस्थेचा नव्याने शोध घेण्याची वेळ जिल्हा परिषदेवर आली आहे.

नेहरू वसतिगृहाची इमारत जुनी असल्याने तिच्या बांधकामाची सद्यस्थिती, मजबुती, संभाव्य धोके आणि आवश्यक दुरुस्ती अथवा पुनर्बांधणीबाबत निर्णय घेण्यासाठी स्ट्रक्चरल ऑडिट महत्त्वाचे आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेने शासकीय तंत्रनिकेतनची निवड करून त्यांना सुमारे नऊ लाख रुपयांचे शुल्कही अदा केले. मात्र, कर्मचारी संख्या अपुरी असल्याचे कारण देत संस्थेने हे काम पूर्ण करण्यास असमर्थता दर्शविली. परिणामी, अद्याप ऑडिटचा अहवाल जिल्हा परिषदेला मिळालेला नाही.

#### वालचंद किंवा स्वेरीकडे जबाबदारी देण्याची हालचाल

आता जिल्हा प्रशासनाकडून वालचंद किंवा स्वेरी पॉलीटेक्नीकल महाविद्यालय यापैकी सक्षम संस्थेकडून ऑडिट करून घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. इमारतीच्या सुरक्षिततेशी संबंधित बाब असल्याने विलंब



न करता तांत्रिक तपासणी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ऑडिट अहवालानंतर इमारतीची दुरुस्ती, मजबुतीकरण किंवा आवश्यक असल्यास पुनर्बांधणीबाबत पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

#### नऊ लाख रुपये व्याजासह वसूल करणार


शासकीय तंत्रनिकेतनकडे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण झाले नाही. मात्र, अदा केलेले नऊ लाख रुपये व्याजासह वसूल करण्यात येतील, शासकीय तंत्रनिकेतनकडे मनुष्यबळाअभावी काम पूर्ण झाले नसल्याने जिल्हा परिषदेने अदा केलेली नऊ लाख रुपयांची रक्कम अडकली आहे. ही रक्कम व्याजासह परत वसूल करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

**-इंद्रजीत पवार, उपाध्यक्ष जिल्हा परिषद**

#### सक्षम तांत्रिक संस्थेकडून ऑडिट करणार

सक्षम तांत्रिक संस्थेकडून ऑडिट करून घेऊन त्यानुसार इमारतीच्या सुरक्षिततेबाबत पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

**- संदीप कोहिणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद**



### महाराणा प्रताप तरुण मंडळ

**सोलापूर :** शहरातील लोधी गल्ली परिसरातील महाराणा प्रताप तरुण मंडळाच्या वतीने श्री शंकराच्या तांडव नृत्याचा अवतार असलेली श्री गणरायाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.



**सोलापूर: दैनिक 'तरुण भारत' कार्यालयातील श्रींची पूजा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु कर्नल डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी मुख्य संपादक प्रशांत माने, सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, व्यवस्थापक विनायक पुला, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसंपादक आरती कुसेकर, विकास चाटी, जगदीश माढेकर, वामन बावडेकर.**



### गोविंदराज नगरात लालबागच्या राजाची प्रतिष्ठापना उत्साहात

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

गोविंदराज नगर गणेशोत्सव मंडळ, विष्णू महेश चौक (प्रगती चौक), विडी घरकुल यांच्या वतीने यंदा मुंबईतील प्रसिद्ध लालबागचा राजा गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. श्रींची पूजा व प्रतिष्ठापना प्रभाग क्रमांक १०च्या नगरसेविका उज्वला अविनाश दासरी आणि मंडळाच्या भाग्यलक्ष्मी जगपती मिठ्ठा यांच्यासह गोविंदराज नगरमधील महिला भगिनीच्या प्रमुख उपस्थितीत श्री ची प्रतिष्ठापना करण्यात आली. बाप्पाच्या चरणी अर्पण करण्यात आलेल्या मोदकांचा लिलाव घेण्यात आला. १०१ रुपयांपासून सुरू झालेली बोली थेट २१२१ रुपयांपर्यंत पोहोचली. अखेर दिनेश दुडम परिवाराने २१२१ रुपयांना मोदक घेतला. मंडळाचे अध्यक्ष जगपती मिठ्ठा यांनी दिनेश दुडम परिवाराचा पुष्पगुच्छ व प्रसाद देऊन सत्कार केला. या लिलावाचे सूत्रसंचालन व्यंकटेश दोंता यांनी केले. तत्पूर्वी लालबागच्या राजा गणपतीची ढोल-ताशांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात मिरवणूक काढण्यात आली. भक्तगण बाप्पाच्या भक्तीत तल्लीन होऊन सहभागी झाले होते. यावेळी मंडळाचे सचिव अनिल गोसकी, उपाध्यक्ष दिनेश दुडम, खजिनदार अमर कोलप्याक, तसेच श्रीशैल बंदगी, उमेश कामुर्ती, शंकर श्रीकोंडा, किरण रच्चा, चक्रधर अन्नलदास आदी उपस्थित होते.

# 'सप्तरंग'चे प्रकाशन बहुभाषिक कवितेने रंगले

### तेलुगु मराठी साहित्यिक संस्था व पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**



कवी नरेंद्र गुंडेली लिखित शिवप्रज्ञा प्रकाशन निर्मित 'सप्तरंग' चारोळी संग्रहाचे प्रकाशन कार्यक्रम पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथे ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कवयित्री वंदना कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

तेलुगु मराठी साहित्यिक संस्था आणि पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय, सोलापूरच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात मंचावर नरेंद्र गुंडेली यांच्यासह ज्येष्ठ साहित्यिक गोविंद काळे, कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण सोलापूर महाविद्यालयाचे प्राचार्य युवराज मेटे, दयानंद महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. डी. आर. गायकवाड, दत्तात्रय इंगळे, अरविंद चिन्नी, शिवप्रज्ञा प्रकाशनाच्या प्रकाशिका राजश्री भोसले उपस्थित होते. या चारोळी संग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक गोविंद काळे व मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी राजेंद्र भोसले यांनी 'चारोळी' या वाङमय प्रकारांत महत्व सांगून या साहित्य प्रकाराचा इतिहास कथन केला. सूत्रसंचालन प्रा.अन्नपूर्णा गोटीपामूल यांनी केले तर आभार कवी सुरेश निकंबे यांनी मानले.

कार्यक्रमात बहुभाषिक कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कविसंमेलनात अनेक कवींनी विविध विषयांवरील कविता सादर केल्या. कवी संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून अय्युब नल्लामंदू उपस्थित होते. या वेळी त्यांनी उर्दू कविता सादर केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष कालिदास चवडेकर यांनी 'सप्तरंग' चारोळी संग्रहाच्या प्रकाशनाला शुभेच्छा व्यक्त करून वाचकापर्यंत सदरचा चारोळी संग्रह पोहोचणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. या वेळी त्यांनी आपली हजल सादर करून रसिकांची मने जिंकली. सूत्रसंचालन संध्या धर्माधिकारी यांनी केले. मदन जवळगेकर यांनी आभार मानले.

#### या कवींनी सादर केल्या कविता

दत्तात्रय इंगळे (श्रावण संपताना), मुक्तेश्वर मुळे (श्रावण झालाय गुलाम), सुरेश येमूल (संवाद कुठे हरवला) , छाया उंब्रजकर(जेन जीची मुलं), संतोष जाधव ( वेदना) , रामकृष्ण अघोर ( हे असंच चालायचं), विजयकुमार सोनवणे (सैनिक) , नरेंद्र गुंडेली (गजानना गणराया) , डॉ.रामचंद्र धर्मसाले (पान्हा नभाला फुटला), मदन जवळगेकर (आपण) , जमालोद्दीन शेख (ग्रंथ आपले मित्र) संस्कृती कांबळे (डॉ.बाबासाहेब आंबेडकर), मुबारक शेख ( वचन), राजेंद्र भोसले (बाय बाय) , प्रतिभा गडेकर दंदे ( शिक्षणाचा बाजारीकरण), गोविंद काळे (धरण), शैलेश उकरंडे (बालपणीची मैत्री) , सुरेश निकंबे (अबोला) , दत्तात्रय कडवेरी (अम्मा),रेखा रुद्रोज ( मेलुको मित्रमा) , संध्या धर्माधिकारी(विठू), नागेंद्र माणेकरी(निशब्द किनारा), ओगन्ना देवनपल्ली(मनषी ओक स्वार्थम), वंदना कुलकर्णी(स्त्रीची रुपे), चंद्रकांत मंजुळकर(सावित्रीची लेक)



### सामाजिक कार्यकर्ते अमृतदत्त चिन्नी यांचा चंदेले स्मृती केंद्राच्या वतीने सत्कार

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

जुना विडी घरकुल येथील सामाजिक कार्यकर्ते अमृतदत्त चिन्नी यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त भाई छन्नुसिंह चंदेले स्मृती केंद्राच्या वतीने बुधवारी त्यांचा सत्कार करण्यात आला. स्मृती केंद्राचे अध्यक्ष हेमूजी चंदेले यांच्या हस्ते चिन्नी यांचा सत्कार झाला. यावेळी स्मृती केंद्राचे सचिव रवींद्र मोकाशी, राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक मुख्याध्यापक महादेव तोळणूरे, देशभक्त छन्नुसिंह चंदेले माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक काकासाहेब गाढवे, भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सिद्धार्थ गायकवाड, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य राहुल चंदेले उपस्थित होते. यावेळी तोळणूरे, गाढवे व गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

# ज्ञानोबा-तुकोबांच्या कीर्तनातून महाराष्ट्राची लोकसंस्कृती जिवंत : सदानंद मोरे

### रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी, उद्योग बँक सेवक सांस्कृतिक मंडळ बौद्धिक व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

सोलापूर : धर्मकार्यातून सांस्कृतिक चळवळ पुढे नेण्याचे काम महाराष्ट्रातील संतांनी केले. अध्यात्म हे अंतर्मनातून जन्माला यावे आणि आध्यात्मिक चळवळीला योग्य दिशा मिळावी, यासाठी संतांनी समाजात उत्साह आणि ऊर्जा निर्माण केली. कीर्तन आणि प्रबोधनाच्या माध्यमातून ज्ञानोबा आणि तुकोबांनी महाराष्ट्राची आध्यात्मिक तसेच लोकसंस्कृती जिवंत ठेवली, असे मत संत साहित्याचे अभ्यासक सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.



रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी तसेच उद्योग बँक सेवक सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आयोजित बौद्धिक व्याख्यानमालेत बुधवारी सदानंद मोरे यांनी 'संत विचारांची दोन शिखरे... ज्ञानोबा आणि तुकोबा' या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. येथील डॉ. फडकुले सभागृहात ही व्याख्यानमाला सुरू असून, यंदा व्याख्यानमालेचे ६१ वे वर्ष आहे. यावेळी व्याख्यानमाला समितीचे प्रेसिडेंट यल्लादास लचमापुरे उपस्थित होते. जनता बँकेचे संचालक पुरुषोत्तम उडता यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. वल्लभ कुंटला यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. तर रेणुका चव्हाण यांनी आभार मानले.

सदानंद मोरे यांनी आपल्या व्याख्यानात संतपरंपरेसोबतच धर्मप्रसार आणि मुद्रणाच्या इतिहासावरही प्रकाश टाकला. १८३५ च्या सुमारास इंग्रजांनी ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी विदेशातून मोठ्या प्रमाणात धर्मप्रसारक ग्रंथ जहाजातून आणल्याची माहिती पसरली होती. त्या वेळी ते जहाज पेटवून देण्याचा विचार पुढे आला. मात्र, तत्कालीन 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांनी हिंदू धर्मातील ग्रंथ छापून धर्मकार्य पुढे नेण्याचा संकल्प केला. त्यानुसार त्यांनी ज्ञानेश्वरी छापून तिच्या प्रती वितरित केल्या, असे मोरे यांनी सांगितले.भारतीय इतिहासात बाळशास्त्री जांभेकर यांनी प्रथमच ज्ञानेश्वरी ग्रंथ मुद्रित केल्याचेही त्यांनी नमूद केले.

#### आज डॉ. अविनाश भोंडवे यांचे व्याख्यान

गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी आरोग्यम धनसंपदा या विषयावर पुणे येथील वक्ते डॉ. अविनाश भोंडवे हे व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफणार आहेत.

### टिकेकरवाडी येथे रेल्वेखाली डोणगावच्या तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

सोलापूर -अज्ञात कारणावरून डोणगाव येथील एका २३ वर्षीय तरुणाने रेल्वेखाली उडी टाकून आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास होटगी ते टिकेकरवाडी दरम्यान सिद्धेश्वर मळी समोर उघडकीस आली. रेल्वे अंगावरून गेल्यामुळे तरुणाच्या शरीराचे कमरेपासून दोन तुकडे झाले असून, याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

निखिल संतोष धाकतोडे (वय २३ वर्ष रा.डोणगाव ता.उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो गवंडीचे काम करायचा.मंगळवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास त्याने होटगी ते टिकेकरवाडी दरम्यान रेल्वेसमोर उडी टाकून आत्महत्या केली.त्याचे शरीर कमरेपासून वेगळे झाले होते. या घटनेची माहिती मिळताच विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार एस. टी. बहिर्जे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.सदरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केला.

मयत निखिल याच्या पश्चात दोन भाऊ आणि आई वडील असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकानी दिली.

# 'स्वच्छता ही सेवा' अभियानासाठी सोलापूर जिल्हा सज्ज : सीईओ कुशल जैन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर**

स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी न राहता त्यामध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने सोलापूर जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा-२०२६' अभियान राबविण्यात येणार आहे.

'स्वच्छतेमध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' ही यंदाच्या अभियानाची मध्यवर्ती संकल्पना असून, अस्वच्छ व वर्दळीच्या ठिकाणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि लोकसहभागावर विशेष भर दिला जाणार आहे.

अभियानाच्या नियोजनासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या अध्यक्षतेखाली विभागप्रमुख व गटविकास अधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव तसेच ग्रामविकास मंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी महादेव घुले उपस्थित होते. प्रत्येक तालुक्यातील अडचणीची, अस्वच्छ आणि वर्दळीची सार्वजनिक ठिकाणे निश्चित करून त्यांचे मॅपिंग करण्यात येणार आहे. या ठिकाणी नियोजनबद्ध पद्धतीने स्वच्छता करून कायमस्वरूपी स्वच्छता राखण्याच्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे केवळ एकदिवसीय स्वच्छता न करता संबंधित ठिकाणांच्या देखभालीकडेही लक्ष दिले जाणार आहे. शाळांमध्ये 'स्वच्छता ज्ञान यात्रा', घनकचरा व्यवस्थापन केंद्रांना भेटी तसेच 'स्वच्छता आणि जलसंचय संवाद' यांसारखे उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती केली जाणार आहे. ग्रामपंचायतींसोबत बचत गट, युवक मंडळे, ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक आणि प्रतिष्ठित नागरिकांनाही अभियानात सहभागी करून घेण्याचे नियोजन आहे. सफाई कामगारांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे घेण्याबरोबरच त्यांना पीपीई किट्स आणि आवश्यक सुरक्षा साधनांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यांच्या कामाची दखल घेत स्थानिक पातळीवर सफाई मित्रांचा सन्मानही केला जाणार आहे. अभियानाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून १ ऑक्टोबरला 'एक दिन, एक घंटा, एक साथ' या उपक्रमांतर्गत सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर श्रमदानाचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय कचरा वर्गीकरण, 'एक पेड माँ के नाम' वृक्षारोपण, क्रीडा स्पर्धा आणि २७ सप्टेंबरच्या जागतिक पर्यटन दिनानिमित्त विशेष स्वच्छता उपक्रम घेतले जाणार आहेत.'वेस्ट टू वेल्थ' आणि 'वेस्ट टू आर्ट' या संकल्पनांवर आधारित उपक्रमांद्वारे कचऱ्याचा पुनर्वापर व पुनर्निर्मितीला चालना देण्यात येणार आहे. अभियानातील दैनंदिन उपक्रमांचे फोटो व माहिती अधिकृत स्वच्छता ही सेवा पोर्टलवर वेळेत अपलोड करण्याची यंत्रणा उभारण्याचे निर्देशही देण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्रीकृष्ण गणेश मंडळाला जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

शहरातील गवळीवाडा येथील श्रीकृष्ण गणेश मंडळाने महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत सन २०२५ चा जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार पटकावला. मंडळाच्या सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रभक्तीपर उपक्रमांची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.



संस्थापक अध्यक्ष सुरेश गवळी यांच्यासह रत्नाकर दहीहंडे, दत्तात्रय पंगूडवाले, राजाभाऊ मिसाळ, आनंद विधाते व आनंद मिसाळ यांच्या पुढाकारातून मंडळाची स्थापना झाली.

गेल्या वर्षी 'ऑपरेशन सिंदूर' या विषयावर साकारलेल्या देखाव्यातून भारतीय जवानांच्या शौर्याला अभिवादन करण्यात आले होते. या देखाव्याचे मुंबई येथेही कौतुक झाले होते.

सांस्कृतिक कार्य विभाग व पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने आयोजित या स्पर्धेतील पुरस्काराबद्दल आमदार कैलास पाटील यांनी मंडळाचे संस्थापक, पदाधिकारी, कार्यकर्ते व गणेशभक्तांचे अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...



### रुईभर सोसायटीच्या चेअरमनपदी नवनाथ गव्हाणे

**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी नवनाथ श्रीरंग गव्हाणे, तर व्हाईस चेअरमनपदी पांडुरंग तुळशीराम आगळे यांची १५ सप्टेंबर रोजी बिनविरोध निवड झाली.निवड प्रक्रियेदरम्यान दोन्ही पदांसाठी संचालक मंडळात एकमताने निर्णय घेण्यात आला. निवडीनंतर उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवरांनी नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. निवड प्रक्रियेचे कामकाज ए.आर. सय्यद व सोसायटीचे सचिव कदम यांनी पाहिले. यावेळी शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे यांच्यासह संचालक मंडळ व कार्यकर्ते उपस्थित होते.



### 'तेरणा'च्या दर्शन दिवटेंची १७.२ लाखांच्या पॅकेजवर निवड

**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे माजी विद्यार्थी दर्शन दिवटे यांची डेटा इंजिनिअर म्हणून तब्बल १७.२ लाख रुपये वार्षिक पॅकेजवर निवड झाली आहे. सध्या ते अमेरिकास्थित कंपनीच्या स्किल डेव्हलपमेंट व प्रोफेशनल सोल्युशन विभागात कार्यरत आहेत. महाविद्यालयाला भेट दिल्यानंतर त्यांनी प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने व विभागप्रमुख डॉ. डी. डी. दाते यांनी दिवटे यांच्या यशाचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यासह संस्थेचे विश्वस्त, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### अभियंता दिनानिमित्त वीज अभियंत्यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.१६ सप्टेंबर -**

अभियंता दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने तुळजापूर व धाराशिव विभागातील अभियंता अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. वीज वितरण व्यवस्था सुरळीत ठेवताना अभियंत्यांकडून तांत्रिक अडचणी, वाढता वीजभार, ग्राहकांच्या समस्या तसेच देखभाल-दुरुस्तीची कामे सातत्याने केली जातात. या योगदानाबद्दल संघटनेने अभियंत्यांचा गौरव केला. यावेळी कार्यकारी अभियंता निलांबरी कुलकर्णी, नंदकुमार काळे, नरेंद्र रडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता दीपक कोतले व राहुल पवार यांचा सत्कार करण्यात आला.



### शिक्षकपदी निवड झाल्याबद्दल प्रतीक्षा गोसावींचा सत्कार

**तुळजापूर, दि.१६ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्हा पोस्टल कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आरळी बुद्रुक (ता. तुळजापूर) येथील प्रतीक्षा उमेश गोसावी यांची पवित्र पोर्टल शिक्षक भरती प्रक्रियेतून रयत शिक्षण संस्था, सातारा येथे शिक्षकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. १३ सप्टेंबर रोजी एका कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते प्रतीक्षा गोसावी यांचा गौरव करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन भीमराव पाटील, गणेश गुरव, विष्णू सूरवसे, महेश वाघमोडे, स्वाती हिंगमिरे यांच्यासह संचालक व सभासद उपस्थित होते.

### धोंडीराम पालकर यांचे निधन

**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

तालुक्यातील सौंदना (अंबा) येथील माजी सरपंच



धोंडीराम तात्याबा पालकर (वय ६२) यांचे मंगळवारी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. पालकर यांनी मोरेवाडी येथील गुरुदेव विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून सेवा बजावली. त्यांच्यावर बुधवार, दि. १६ रोजी सौंदना (अंबा) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते दयानंद पालकर यांचे ते वडील होत.

# 'मराठा समाजाने माझ्यावर विश्वास ठेवला; आता शेतकऱ्यांच्या बांधावर उतरून काम करण्याची वेळ' : पालकमंत्री प्रताप सरनाईक

**मराठा समाजाच्या भावना समजून घेऊन प्रश्न सोडविण्यास कटिबद्ध; १७ सप्टेंबरला कटुता नको, मुक्तिसंग्रामाला अभिवादन करा**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

धाराशिवचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर मराठा समाजाच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून, समाजाच्या भावनांशी निगडित सुमारे १५० फुटी भगव्या ध्वजाची उभारणी तसेच मराठा समाज मंदिराचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे समाजाच्या प्रश्नांवर संघर्षाबरोबरच संवाद, विकास आणि प्रत्यक्ष कृतीला प्राधान्य देण्याची गरज आहे, असे मत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केले.

धाराशिवमध्ये मराठा समाजाच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यास व्यक्त झालेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर सरनाईक यांनी समाजबांधवांना भावनिक आवाहन केले. मराठा समाजाच्या भावना आणि अपेक्षा आपल्यासाठी महत्त्वाच्या असून, भगवा ध्वज आणि मराठा समाज मंदिर या प्रमुख मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्रत्यक्ष काम सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



मराठा आरक्षणाच्या प्रश्नासोबतच मनोज जरांगे-पाटील यांनी शेतकऱ्यांच्या अडचणीही प्रभावीपणे मांडल्या आहेत, असे सांगून सरनाईक म्हणाले की, शेतकरी हा मराठवाड्याच्या जीवनाचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या समस्या केवळ कागदावर समजून न घेता शेताच्या बांधावर जाऊन जाणून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेणार असून, मदतीसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

१७ सप्टेंबर हा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन असून, निजामाच्या राजवटीतून मराठवाड्याच्या मुक्तीसाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्याग, संघर्ष आणि बलिदानाचे स्मरण करण्याचा हा दिवस आहे. त्यामुळे या ऐतिहासिक दिवशी सामाजिक वातावरणावर परिणाम होईल किंवा कटुता निर्माण होईल, अशा कोणत्याही कृती टाळाव्यात, असे आवाहन सरनाईक यांनी केले.

जिल्ह्यात तसेच संपूर्ण मराठवाड्यात दुष्काळाचे गंभीर सावट असल्याने मुक्ती संग्राम दिन साधेपणाने साजरा करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात हार-तुरे व पुष्पगुच्छ आणून सत्कार करू नयेत. तसेच फटाके अथवा वाद्यांच्या गजरात मिरवणुका काढू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिन हा कोणत्याही व्यक्तीचा किंवा पक्षाचा दिवस नाही. हा आपल्या पूर्वजांच्या त्यागाचा आणि संघटित संघर्षाचा गौरवदिन आहे. त्यामुळे मतभेद व कटुता वाढविण्याऐवजी संवादाचे वातावरण ठेवले पाहिजे, असे सरनाईक यांनी म्हटले.

मराठा समाजाच्या भावना मला समजतात. समाजाच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र, धाराशिवची सामाजिक एकजूट आणि मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामाची गौरवशाली परंपरा अबाधित राहावी, हीच माझी इच्छा आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भगवा ध्वज उंच फडकत राहावा, समाजाचे मंदिर ज्ञान, एकता व सामाजिक कार्याचे केंद्र बनावे आणि शेतकऱ्याच्या बांधावर शासन पोहोचावे, हीच धाराशिवच्या विकासाची दिशा असावी, अशी भूमिका सरनाईक यांनी व्यक्त केली. मराठा समाजाच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या भावना समजून घेण्यासह शेतकरी, युवक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष काम करण्यास कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

### पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण

मराठवाड्याच्या मुक्तीसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा ७८ वा वर्धापन दिन गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी धाराशिव येथे साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातील स्मृती स्तंभास सकाळी ८.४५ वाजता पुष्पचक्र अर्पण करून हुतात्मे आणि स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

## पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत आज जिल्हा नियोजन समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

जिल्ह्यातील विकासकामांना गती देण्यासह विविध योजनांची अंमलबजावणी आणि निधी खर्चाचा आढावा घेण्यासाठी जिल्हा नियोजन समितीची बैठक गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली आहे. परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवनातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात ही बैठक होणार आहे.

**विकासकामे व निधी खर्चाचा होणार आढावा**

बैठकीत १ मे २०२६ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास तसेच त्यानुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुपालनास मान्यता देण्याचा विषय विचारार्थ ठेवण्यात येणार आहे.

याशिवाय जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासींसाठीच्या उपयोजनेच्या ऑगस्ट २०२६ अखेर झालेल्या खर्चाचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

जिल्ह्याच्या विकासासाठी उपलब्ध निधीचा विनियोग, विविध योजनांवरील खर्चाची सद्यस्थिती आणि विकासकामांच्या प्रगतीबाबत बैठकीत चर्चा होणार आहे.

तसेच पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषयही चर्चेसाठी घेतले जाणार आहेत.

## तलमोड चेकपोस्टवर स्विफ्ट डिझायरमधून २.७५ लाखांचा गुटखा

**कारचालकासह दोघे अटकेत**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ सप्टेंबर -**

सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील तलमोड चेकपोस्ट परिसरात नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करत असताना उमरगा पोलिसांनी स्विफ्ट डिझायर कारमधून अंदाजे २ लाख ७५ हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केला. मंगळवारी (ता. १५) मध्यरात्री सव्वादोनच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. गुटखा वाहतूक केल्याप्रकरणी कारचालकासह दोघांना अटक करण्यात आली आहे.

शेख रिहान (३१) आणि सय्यद अफरोज (२८), दोघेही रा. मोमीनपुरा, बीड, अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यापैकी शेख रिहान हा कारचालक आहे.

तलमोड चेकपोस्ट परिसरात नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू असताना पोलिसांनी संशयावरून स्विफ्ट डिझायर कार थांबवून झडती घेतली. यावेळी कारमध्ये गुटख्याचा साठा आढळून आला. पोलिसांनी अंदाजे २ लाख ७५ हजार रुपयांचा गुटखा आणि सुमारे ३ लाख रुपये किमतीची कार, असा एकूण ५ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



गुटखा वाहतुकीविरोधात पोलिसांकडून गेल्या काही दिवसांपासून विविध ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली जात आहे. त्याच मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी पल्लवी इमडे यांनी फिर्याद दिली असून, गुटख्याची वाहतूक नेमकी कुठून करण्यात आली होती आणि तो कुठे पोहोचविला जाणार होता, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

विभागीय पोलीस अधिकारी प्रशांत संपते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक पिराजी तायवडे व पोलीस उपनिरीक्षक व्ही. एम. शेख यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल अतुल जाधव, विनोद मोरे, भागवत घाटे, होमगार्ड पवन राठोड, संतोष पवार व इतर कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

## देवगिरी महाविद्यालयाचे बुद्धिबळ स्पर्धेत दुहेरी विजेतेपद



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ सप्टेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धा यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर येथे ११ व १२ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांच्या खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला.

मुलांच्या गटात देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरने प्रथम, तर शिवछत्रपती महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळविला.

मुलींच्या गटातही देवगिरी महाविद्यालयाने प्रथम, तर एम.पी. विधी महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेतून आगामी आंतर विद्यापीठ व क्रीडा महोत्सवासाठी ९ मुले व ९ मुली अशा एकूण १८ खेळाडूंची विद्यापीठाच्या मार्गदर्शन शिबिरासाठी निवड करण्यात आली. बक्षीस वितरण समारंभास सिनेकलाकार उमेश जगताप, डॉ. सचिन देशमुख, प्राचार्य डॉ. श्रीरंग लोखंडे यांच्यासह प्राध्यापक व मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## दिंडेगावात घर फोडून दीड लाखांचा ऐवज लंपास

**पत्रा उचकटून चोरट्यांचा प्रवेश; ४३ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांसह चांदीचे दागिने चोरीला**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -**



घराला कुलूप लावून कुटुंबीय शेतात गेले असताना अज्ञात चोरट्याने घराचा पत्रा उचकटून आत प्रवेश केला आणि कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ५४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील दिंडेगाव येथे १२ सप्टेंबर रोजी घडली.

याप्रकरणी सचिन अशोक सुरवसे (२७, रा. दिंडेगाव, ता. तुळजापूर) यांनी १५ सप्टेंबर रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, १२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजण्याच्या दरम्यान सचिन सुरवसे व त्यांचे नातेवाईक घराचा दरवाजा बंद करून कुलूप लावून शेतात गेले होते. ही संधी साधून अज्ञात व्यक्तीने घराचा पत्रा उचकटून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील ४३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच चांदीचे दागिने, असा एकूण १ लाख ५४ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला.

कुटुंबीय घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अज्ञात चोरट्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त गावांत जनावरांसाठी चारा-पाणी, छावण्या तातडीने सुरु करा : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

जिल्ह्यात पावसाअभावी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून अनेक भागांत जनावरांसाठी चारा व पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. शेतकरी व पशुपालक आर्थिक संकटात सापडल्याने पशुधनाची देखभाल करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त गावांमध्ये जनावरांसाठी चारा व पाणी छावण्या तातडीने सुरू कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



पावसाअभावी दुष्काळाची तीव्रता वाढत असून पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

त्याचबरोबर पाण्याचे स्रोत आटत असल्याने जनावरांच्या पाण्याची उपलब्धताही कमी होत आहे. परिणामी शेतकरी व पशुपालकांवर आर्थिक संकटाचा अतिरिक्त भार पडत आहे. प्रशासनाने दुष्काळग्रस्त गावांची तातडीने पाहणी करून परिस्थितीनुसार चारा-पाणी छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी डॉ. पाटील यांनी केली.

तसेच आवश्यक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी पुरेशा प्रमाणात चारा आणि पशुवैद्यकीय सेवा व औषधोपचाराची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

दुष्काळग्रस्त शेतकरी आणि पशुपालकांना तातडीने दिलासा मिळण्यासाठी शासन व प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## नळदुर्गातील वाहतूक प्रश्नांवर आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -**

नळदुर्ग शहराजवळील राष्ट्रीय महामार्गावरील असुरक्षित वाहतूक व्यवस्था, वारंवार होणारे अपघात तसेच नळदुर्ग-सोलापूर जुना मार्ग तातडीने सुरू करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते भीमाशंकर बताले यांनी १७ सप्टेंबर रोजी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

मागण्या पूर्ण न झाल्यास आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक वळणे, अपुरे दिशादर्शक व चेतावणी फलक आणि अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

याबाबतच्या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, तहसीलदार व नळदुर्ग पोलीस ठाण्यास देण्यात आल्या आहेत.

# औश्यात शेतकरी महिलांचा आक्रोश मोर्चा

## दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी

तभा वृत्तसेवा

औसा दि.१६ सप्टेंबर : पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी शेतातील उभी पिके करपली असून कष्टाने पेरलेले सोयाबीन हातात येण्याआधीच उद्ध्वस्त झाले आहे. राज्य सरकारने औसा तालुक्यासह लातूर जिल्हा व मराठवाड्यात तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करावा.आणि शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी.या प्रमुख मागणीसाठी जिल्हा परिषद सदस्या दीपाली शाम भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली महिलांच्या वतीने औसा तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

करपलेले सोयाबीन हातात घेऊन औसा तालुक्यातील महिलांनी या आक्रोश मोर्चात सहभाग घेतला होता. शहरातील मुख्य रस्त्यावरून निघालेल्या मोर्च्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करा,



कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर एक लाख रुपये मदत द्या, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपये द्या,पिकांचे तातडीने पंचनामे करा.या आक्रोशाने शहरातील मुख्य रस्त्याचा परिसर दणाणून गेला होता.

यंदा शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने खरीप पिकांची पेरणी केली.परंतू अपेक्षित पाऊस पडला नाही . यामुळे पिकांची वाढ खुंटली आणि अनेक भागांत सोयाबीनसह इतर पिके करपून गेली. पेरणी, बियाणे, खते, औषध फवारणी व मशागतीवर झालेल्या खर्चाएवढे उत्पादन होण्याची शक्यता नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

नैसर्गिक संकटामुळे नुकसान झालेल्या कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर एक लाख रुपयांची तातडीची मदत द्यावी, तसेच नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही विशेष बाब म्हणून दोन लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, सरकारने कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीचे पंचनामे करावेत, अशी मागणी तहसिलदार घनशाम अडसुळ यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी हातात करपलेले सोयाबीन, डोळ्यांत अश्रू आणि सरकारकडे मदतीची आर्त हाक, अशा भावनिक वातावरणात निघालेल्या या मोर्चाने लक्ष वेधले होते.

मातोळा जिल्हा परिषद सदस्या दिपालीताई शाम भोसले, प्रहार संघटनेचे दत्ता आनंदगावकर, पप्पू भोसले, बबन भोसले, गणेश पाटील,काका पवार हरेगाव, कृष्णा जावळे,सयाजी दारफळकर, नेताजी भोसले, दयानंद भोसले.सरपंच सुजाता बनसोडे, पद्मिनी काकासाहेब पवार, पार्वती सूर्यवंशी, अनुसया चव्हाण, सोनाली चव्हाण, जनाबाई चव्हाण, शमाबी शेख, जन्नत बी शेख, शामामबी चव्हाण, मंजुश्री चव्हाण, शेख, सुनीता संजय चव्हाण, संगिता बनसोडे, सविता कांबळे, योगिता कांबळे, कस्तुराबाई मंगरुळे, गवळण मंगरुळे, रूपाली कांबळे, अंजना मंगरुळे, सुरेखा मंगरुळे, अनुसया वाघमारे, सुकमारबाई कांबळे, सुरेखा जाधव, भामाबाई कांबळे, अन्नपूर्णा कांबळे, रेखा कोव्हाळे, सचिता भेडाले, गिरिजा कोव्हाळे, द्रोपदी कोहाळे, लक्ष्मी कोव्हाळे, निमा कोव्हाळे आदीसह मोठया संख्येने महिला व शेतकरी उपस्थित होते.

---

## संक्षिप्त...

### दुष्काळ जाहीर करून भरीव मदतीची मागणी भाजपचे तहसीलदारांना निवेदन



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १६ सप्टेंबर : तालुक्यात पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे शिरूर अनंतपाळ तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी, या मागणीचे निवेदन भारतीय जनता पक्षाच्या वतीने आज तहसीलदारांना देण्यात आले.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष महाधव बिरादार, येरोळ जिल्हा परिषद सदस्य तुळसाबाई लोंढे, जिल्हा सरचिटणीस मंगेश पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गोविंदराव चिलकुरे, युवा मोर्चाचे जिल्हा सचिव अमरजी माडजे पाटील, संतोष डोंगरे, सतीश शिंदाळकर, उमाकांत पाटील, प्रसाद पाटील, पंकज रक्षाळे यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## एकदिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न

### डिजिटल साक्षरता आणि वाणिज्य: काळाची गरज' या विषयावर झाले मंथन ..



तभा वृत्तसेवा

जळकोट दि. १६ सप्टेंबर : जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने १२ सप्टेंबर २०२६ रोजी 'डिजिटल साक्षरता आणि वाणिज्य: काळाची गरज' या महत्त्वाच्या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या परिषदेचे उद्घाटन डॉ. के. हरीबाबू यांच्या हस्ते पार पडले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजामाता बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ (पाटोदा) चे अध्यक्ष मा. मानवेंद्र केंद्रे हे होते.

या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. अमोल तम्मलवार (प्रमुख मार्गदर्शक) यांनी बदलत्या आर्थिक पटलावर डिजिटल तंत्रज्ञान, ई-कॉमर्स, डिजिटल बँकिंग आणि ऑनलाईन व्यापार प्रणालीचे महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण भागातील विद्यार्थी व व्यावसायिकांपर्यंत डिजिटल साक्षरता पोहोचवणे ही काळाची मुख्य गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या राष्ट्रीय परिषदेतील तांत्रिक सत्रांचे अध्यक्षपद डॉ. बी. आर. शिंदे व डॉ. रेखा चौधरी यांनी भूषवले. या परिषदेच्या विविध सत्रांमध्ये देश-विदेशातील विविध महाविद्यालयांतील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले. या राष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी या राष्ट्रीय परिषदेच्या आयोजनाबद्द उपस्थित मान्यवर तज्ञ प्राध्यापक तथा संशोधकानी आयोजकांचे आणि वाणिज्य विभागाचे विशेष कौतुक केले. या सत्रांमध्ये विविध महाविद्यालयातून आलेल्या संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ बी टी लहाने 'जिजामाता बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा सर्व पदाधिकारी, वाणिज्य विभाग आणि उपस्थितांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. प्रस्ताविकपर मनोगत वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ विनोद कडूबाळ नारायण यांनी व्यक्त केले .

या कायक्रमाचे सुहासंचालन प्रा डॉ मनिषा देशपांडे यांनी केले तर आभार प्रा डॉ केंद्रा के के यांनी मानले .

---

## पोलिसांची दमदार कारवाई ५ जनावरे, २ वाहनांसह १३ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

किनगाव दि.१६ सप्टेंबर : येथील टोलनाक्याजवळ पोलिसांची मोठी कारवाई, जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या चौगा विरुद्ध किनगाव पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल, किनगाव पोलिसांनी जनावरांची बेकायदेशीर व निर्दयीपणे वाहतूक करणाऱ्या विरुद्ध कारवाई करत पाच जनावरे आणि दोन वाहनासह एकूण १३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास किनगाव टोलनाक्याजवळ ही कारवाई करण्यात आली. यावेळी जनावरांना एका महिंद्रा कंपनीचा चार चाकी पिकअप गाडी क्र. एम एच ५५ सी.०४७६ या गाडीमध्ये ५ गाईना पिकअप मध्ये कोंबून विनापरवाना व बेकायदेशीर रित्या वाहतूक केली जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या कारवाईदरम्यान चार जणांना ताब्यात घेण्यात आली असून त्यांच्याकडून पाच जनावरे महिंद्रा कंपनीचा पिकअप टेम्पो आणि मारुती स्विफ्ट डिझायर कार क्र. एम एच ५५.बी ३२७६ असा एकूण १३लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या जनावरांमध्ये खिल्लार जातीच्या ४ गाई व १ लाल रंगाचा गोराह यांचा समावेश आहे.



या कारवाईदरम्यान फजल निजाम कुर्वशी वय (२०वर्षे) राईनापुर येथील एक वय २१ वर्षीय व्यक्ती, मोईज एकबार खाटीक लातूर वय १९ वर्षे, जुनेद महम्मद तांबोळी वय २१ वर्षे रा . अहमदपूर येथील रहिवासी असून यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी किनगाव पोलीस स्टेशनचे साहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्या फिर्यादीवरून किनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रं .२४७/ २०१६ दाखल करण्यात आला आहे . महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६ मधील ५(अं),५(ब),९ तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० मधील अधिनियम११(१)(जी),११(१)(इ), अनवे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास किनगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली स.फौ. सिरसाठ हे करत आहेत.

---

## कर्जाची परतफेड करीत पतसंस्थेची स्वावलंबनाकडे वाटचाल : महादेव खिचडे

तभा वृत्तसेवा

औसा दि.१६ सप्टेंबर : गेल्या पन्नास वर्षांच्या वाटचालीत सभासदांचा अतुट विश्र्वास आणि संचालक मंडळाची प्रामाणिक साथ मिळाल्यामुळे औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेने शून्यातून कर्जमुक्ती पर्यंतचा प्रेरणादायी प्रवास पूर्ण केला आहे.संस्थेवर असलेल्या १५ कोटी रुपयांच्या बँकेच्या कर्जाची परतफेड करून पतसंस्था स्वावलंबी झाली असल्याची घोषणा पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे यांनी सुवर्ण महोत्सवी ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केली.

औसा शिक्षक पतसंस्थेची ५० वी सुवर्ण महोत्सवी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली.त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक गुरुवर्य इंद्रजीत देशमुख, ह.भ.प. दत्तात्रय पवार गुरुजी, पंचायत समिती सभापती सौ. गंगाबाई कोदळीकर यांच्यासह संचालक व मान्यवर उपस्थित होते.

गुरुवर्य इंद्रजीत देशमुख म्हणाले, आधुनिक शिक्षणात भावना, आपुलकी आणि संवाद कमी होत चालल्याची खंत व्यक्त करत त्यांनी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जगात जाऊन त्यांच्याशी एकरूप होण्याचे आवाहन केले. मोबाईल आणि स्क्रीनचा अतिरेक टाळून कुटुंब, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील संवाद वाढविणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

चेअरमन महादेव खिचडे म्हणाले, सभासदांना दिलेल्या वचननाम्यात संस्था स्वावलंबी करू या वचनाची पूर्तता संस्थेच्या सुवर्ण महोत्सवीच्या वर्षी केली आहे. कर्जमर्यादा १५ वरून २० लाख, तातडीचे कर्ज ५० हजारांवरून ८० हजार करण्यात आले आहे.यावर्षीही भागभांडवलावर ९ टक्के लाभांश देण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली आहे.तर ह.भ.प. दत्तात्रय पवार गुरुजी यांनी ,संस्थेची कर्जमुक्ती सभासदांसाठी आनंदाची आणि सुवर्णमहोत्सवी वर्षातील अभिमानाची बाब असल्याचे म्हटले आहे.

सुवर्ण महोत्सवी वार्षिक सभेत सेवानिवृत्त शिक्षकांचा निरोप, गुणवंत सभासद शिक्षकांच्या पाल्यांचा, संस्थामित्र सभासदांचा शाल, पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच कर्ज जीवन हमी योजनेच्या लाभाचे वाटप करण्यात आले. संचालक धीरजकुमार रुकमे, संचालिका संगीता कानडे यांनी सूत्रसंचालन केले. दुसऱ्या सत्रात पतसंस्थेचे सचिव संजय जगताप यांनी विषय पत्रिकेतील विषयाचे वाचन करून सर्व ठरावांची माहिती दिल्यानंतर सभासदांच्या संमतीने सर्व ठराव टाळ्यांच्या गजरात मंजूर करण्यात आले. व्हा.चेअरमन हरीश आयतनबोने यांनी उपस्थितांचे आभार मानले. वार्षिक सभेत सभासदांनी विचारलेल्या लेखी, तोंडी प्रश्र्नांबाबत सभासद व संचालक मंडळ यांच्यात खेळीमेळीच्या वातारणात चर्चा झाली. शेवटी राष्ट्रगीत घेवून सभेची सांगता करण्यात आली. या सभेस सर्व संचालक मंडळासह मोठ्या संख्येने शिक्षक सभासद सहभागी होते.

या वार्षिक सभेच्या यशस्वी आयोजनासाठी संचालक युसुफ पिरजादे, मधुकर गोरे, रमेश जाधव, महेश कांबळे, दिपक डोंगरे, संजय रोडगे, अमोल शेळके संचालिका मंदाकिनी माने व पतसंस्थेचे कर्मचारी मल्हारी कांबळे, शिरीष पवार, विनय आयतनबोने यांनी मोलाचे सहकार्य केले.

---

### कारवाईला लवकरच सुरुवात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ सप्टेंबर : शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीवरील गळती रोखण्यासाठी दिशा समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार लवकरच योग्य नियोजन करून व्हॉल्व्हवरील अनधिकृत कनेक्शन तोडण्यासाठी कारवाईला सुरुवात करण्यात येणार आहे.

---

## प्रशासनाकडून नणंद शिवारातील सोयाबीन नुकसानीची पाहणी

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १६ सप्टेंबर : तालुक्यातील नणंद येथे हातातून गेलेल्या सोयाबीनची पाहणी निलंग्याचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके व निलंग्याचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी वाळलेल्या सोयाबीनची पाहणी केली.

गेली तीन महिन्यापासून पाऊस न पडल्यामुळे सोयाबीन चे पीक संपूर्णता शेतकऱ्याच्या हातातून गेलेली आहे. सोयाबीन संपूर्णतः वाळून गेले असून आता शेतकऱ्याच्या हाती काहीही लागणार नाही. शेतकऱ्याच्या पुढे नैसर्गिक संकट पडले असून पशुधनाला सुद्धा चारा शिल्लक नाही. शेतकरी पूर्णतः कोलमडून गेला असून शासनाने आर्थिक मदत नाही केल्यास फाशी घेण्याची वेळ येणार आहे असे मत शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख अण्णासाहेब मिरगाळे यांनी उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यासमोर मत मांडले यासोबत अनेक शेतकऱ्यांनी आपले म्हणणे प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर मांडले. व तात्काळ शासनाकडून आर्थिक मदतीची अपेक्षा केली. यावेळी उपतालुका कृषी अधिकारी घारोळे,



तलाठी रत्नपारखे,तलाठी ननावरे तसेच अप्पाराव लादे,गुरुलिंग स्वामी, सुलतान अन्सारी,भगवान टाकेकर, निवृत्ती पाटील असे अनेक शेतकरी उपस्थित होते.

---

## महात्मा गांधी महाविद्यालयात सायन्स असोसिएशनचे उद्घाटन उत्साहात संपन्न



तभा वृत्तासेवा

अहमदपूर दि. १६ सप्टेंबर : महात्मा गांधी महाविद्यालयातील बी. एस्सी.च्या सर्व विभागांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील सायन्स असोसिएशनचे उद्धाटन व बी. एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम घेण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार हे होते. प्रमुख पाहुणे सिनेट सदस्य डॉ. विनोद माने, तसेच सायन्स असोसिएशनचे समन्वयक डॉ. आर. बी. देसाई, प्रा. डी. डी. कदम, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. ए. जी. जाधव, पालक शिक्षक परिषदेचे सचिव डॉ. आर. एम. कदम इत्यादी उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. व्ही. पी .पवार यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान मिळवण्यासोबतच विविध कौशल्य आत्मसात करून प्रगल्भ व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न करावे असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे डॉ विनोद माने यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवून आई-वडिलांच्या स्वप्नांसाठी झटले पाहिजे. आपले ध्येय उच्च ठेवून काही वेळा अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्नाची पराकाष्ठा कशी केली पाहिजे हे असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून सायन्स असोसिएशनचे समन्वयक प्रा. डी. डी. कदम यांनी विद्यार्थ्यांनी आयुष्यातील संधींचा उपयोग करून जीवनाचे सोने कसे करावे याबद्दल मार्गदर्शन करून सायन्स असोसिएशनची स्थापना केल्याची घोषित केले व पदाधिकाऱ्यांची उद्घोषणा केली. पालक- शिक्षक परिषदेचे सचिव डॉ. आर. एम. कदम यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये पालकांची भूमिका कशी असावी याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा उगिले आणि मयुरी राठोड यांनी केले तर आभार डॉ अनिल जाधव यांनी मानले. महाविद्यालयातील सायन्स विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

---

## शिवसेना पदवीधर मतदारसंघ समन्वयकपदी प्रा. मिरगाळे

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १६ सप्टेंबर : निलंगा विधानसभा उबाठा शिवसेनेच्या पदवीधर मतदार संघाच्या समन्वयकपदी प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र शिवसेनेचे लातूर लोकसभा संपर्कप्रमुख परमेश्र्वर सातपुते व मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे समन्वयक दिलीप हरिभाऊ घुगे यांच्या हस्ते देण्यात आले.

शिवसेना पक्षात केलेल्या उल्लेखनीय कामामुळे पदवीधर मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली. ही निवड करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, युवा सेनेचे राज्य विस्तारक ॲड.हेमंत रामगुडे, राज्य विस्तारक एड. रवी पिचारे, युवासेना जिल्हाप्रमुख एड. राहुल मातोळकर, दिनेश जावळे, तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, तालुकाप्रमुख शिवाजी चव्हाण, शिवाजी पांढरे, शिंदी जवळग्याचे सरपंच रमेश शिरसले,लातूर शहर प्रमुख शिवराज मुळावकर, शिरूर अनंतपाळचे तालुकाप्रमुख भागवत वंगे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

---

## मानाच्या श्री आजोबा गणपतीची आ. संजय बनसोडे यांच्या हस्ते महाआरती

### शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-समाधानासाठी श्री गणरायाच्या चरणी साकडे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १६ सप्टेंबर : श्री गणेशोत्सवानिमित्त शहरातील परकट्टी गल्ली येथे मानाचा श्री आजोबा गणपतीच्या चरणी भक्तिमय वातावरणात माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते श्री गणरायाची विधिवत महाआरती करण्यात आली. यावेळी त्यांनी श्री गणेशाच्या चरणी माथा टेकवत शेतकरी, कष्टकरी, महिला, युवकांसह सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-समाधानासाठी व पावसासाठी प्रार्थना केली.



गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर श्री आजोबा गणपती दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा व आरतीचा कार्यक्रम पार पडला. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता.

यावेळी आमदार संजय बनसोडे यांनी शहरातील श्री आजोबा गणपती, नवयुवक व्यापारी गणेश मंडळ , श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ या प्रमुख गणेश मंडळांना भेटी देऊन श्री गणेशाची आरती करून शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-समाधानासाठी व पावसासाठी श्री गणरायाच्या चरणी साकडे घातले .

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटुरे, नगराध्यक्षा स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा शितल शिंदे, नरसिंग शिंदे, ज्ञानेश्र्वर बिरादार , दिलीप मटके, संग्राम हुडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे, पो.नि. दिलीप गाडे , बी.डी. भुसनुर, नगरसेविका निकिता अंबरखाणे, वीरेंद्र अंबरखाने, वर्षा कांबळे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, धीरज कसबे, सुभाष धनुरे, मधुमती कनशेट्टे, वैशाली कांबळे, प्रा. मल्लेश झुंगस्वामी, रामदास जळकोटे, प्रशांत मांगुळकर मोतीलाल डोईजोडे, विजय मांगुळकर, नरसिंग कंदले, संतोष फुलारी, अनिरुध्द गुरुडे, विजय गडेकर,भारत करेप्पा, विजय निटुरे, आशिष अंबरखाने, अजय कबाडे, कैलास मोदी, रोहन कप्पीकेरे, राहुल सातापुरे, कलप्पा स्वामी, राहुल धनुरे, विष्णू रंजिरे, राजकुमार कुरुपखेळगे, बबलू मुळे, आदी उपस्थित होते .

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा उत्सव आहे. श्री गणेशाच्या आशीर्वादाने उदगीर-जळकोट मतदारसंघासह संपूर्ण परिसराच्या विकासाला अधिक गती मिळावी, नागरिकांच्या अडचणी दूर व्हाव्यात आणि प्रत्येक कुटुंबात सुख-समाधान नांदावे, अशी भावना यावेळी आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केली.

आरतीनंतर उपस्थित भाविकांनी आमदार संजय बनसोडे यांच्यासोबत श्री गणरायाचे दर्शन घेतले. उदगीर शहरात गणेशभक्तीचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## कोरडा दुष्काळ जाहीर करा; शेतकऱ्यांना ५० हजारांची मदत द्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

जिल्ह्यात सरासरीपेक्षा ४० टक्क्यांहून कमी पाऊस झाल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शासनाने तातडीने धाराशिव जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हा संयोजक संजय पाटील दुधगांवकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



सोयाबीन, मका, उडीद, मूग, ऊस तसेच पालेभाज्या व फळभाज्यांचे पावसाअभावी मोठे नुकसान झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. नियमित पीककर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांऐवजी दोन लाख रुपयांचे अनुदान द्यावे, २००९ ते २०२६ दरम्यान कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांना लाभ द्यावा, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी आणि पीक विम्याचे रद्द केलेले चार ट्रिगर पुन्हा लागू करून २५ टक्के आगाऊ विमा भरपाई द्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

ऊस उत्पादकांना एफआरपीप्रमाणे दर मिळावा, गूळ पावडर कारखान्यांना एफआरपीप्रमाणे ऊस बिले देण्याचे आदेश द्यावेत तसेच परतीच्या मान्सूनमध्ये कृत्रिम पाऊस पाडण्याबाबत कार्यवाही करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

### घोषणा झाली; मात्र प्रत्यक्ष कामाला मुहूर्त नाही : नळदुर्गकरांमध्ये नाराजी

## दोन वर्षानंतरही शहीद बचित्तर सिंह स्मारकाची प्रतीक्षाच!

**विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -**

मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी झालेल्या मुक्तिसंग्रामात नळदुर्गच्या ऐतिहासिक आलियाबाद पुलावर निजामाच्या सैन्य व रझाकारांशी लढताना शहीद झालेल्या जवान बचित्तर सिंह यांच्या स्मारकाची दोन वर्षानंतरही प्रतीक्षाच कायम आहे. १७ सप्टेंबर २०२४ रोजी आलियाबाद पुलाजवळ सुमारे १० एकर जागेवर शहीद बचित्तर सिंह यांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, दोन वर्षे उलटूनही स्मारकाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे ही घोषणा केवळ घोषणेपुरतीच राहिली का, असा सवाल नळदुर्गवासीयांकडून उपस्थित केला जात आहे.

भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला; मात्र त्यावेळी मराठवाडा निजामाच्या राजवटीखाली होता. निजाम भारतात विलीन होण्यास तयार नसल्याने मराठवाड्यातील जनतेला स्वातंत्र्यासाठी संघर्ष करावा लागला.



निजामाच्या सैन्यासह रझाकारांकडून जनतेवर अत्याचार करण्यात आले. त्याविरोधात मराठवाड्यातील नागरिकांनीही संघर्ष उभारला. या लढ्यात नळदुर्ग परिसरातील अनेकांनी हौतात्म्य पत्करले. नळदुर्गचे हुतात्मा बाबुराव बोरगावकर आणि हुतात्मा निलय्या स्वामी यांचाही त्यात समावेश आहे.

निजाम शरण येत नसल्याने तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदेशानुसार भारतीय सैन्याने 'ऑपरेशन पोलो' मोहीम सुरू केली. हैदराबादकडे जाणाऱ्या भारतीय सैन्याच्या एका तुकडीचा नळदुर्गच्या जुन्या आलियाबाद पुलाजवळ निजामाच्या सैन्य व रझाकारांशी सशस्त्र संघर्ष झाला.

या संघर्षात भारतीय सैन्यातील जवान बचित्तर सिंह यांनी असामान्य शौर्य दाखविले. निजामाच्या सैन्याने आलियाबाद पूल उडवून देण्यासाठी दारुगोळ्याने भरलेले वाहन पुलावर उभे केले होते. या वाहनाचा स्फोट होऊ नये यासाठी भारतीय जवानांनी जोरदार प्रतिकार केला. यावेळी बचित्तर सिंह यांनी जीवाची पर्वा न करता शत्रूशी सामना केला. गंभीर जखमी झाल्यानंतरही त्यांनी दारुगोळ्याने भरलेल्या वाहनाचा स्फोट होऊ दिला नाही. अखेर या संघर्षात ते आलियाबाद पुलावर शहीद झाले. त्यांच्या शौर्यामुळे पूल सुरक्षित राहिला आणि भारतीय सैन्याला हैदराबादकडे पुढे जाण्याचा मार्ग मोकळा झाला.

> **स्मारकासाठी पुन्हा प्रयत्नांची गरज...**
>
> बचित्तर सिंह यांच्या शौर्याची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने आलियाबाद पुलाजवळ सुमारे १० एकर जागेवर भव्य स्मारक उभारण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, दोन वर्षांचा कालावधी उलटूनही स्मारकाच्या उभारणीसाठी ठोस हालचाल झालेली दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त झाला. बचित्तर सिंह यांच्या या अतुलनीय शौर्याची दखल घेत भारत सरकारने १९५२ मध्ये त्यांना मरणोत्तर 'अशोक चक्र' प्रदान केले. अशोक चक्राचा पहिला पुरस्कार प्राप्त करणारे जवान म्हणून बचित्तर सिंह यांचे नाव देशाच्या इतिहासात नोंदले गेले.


ऐतिहासिक वारसा आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाची आठवण जपणारे हे स्मारक आतापर्यंत पूर्णत्वास जाणे अपेक्षित होते.

आता तरी प्रशासन व संबंधितांनी पुढाकार घेऊन पुढील वर्षीपर्यंत शहीद बचित्तर सिंह यांचे स्मारक उभारण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा नळदुर्गवासीयांकडून व्यक्त होत आहे.

## गणेश गौरव महोत्सव-२०२६' मध्ये गणेश मंडळांसाठी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

सामाजिक प्रबोधन, सांस्कृतिक परंपरांचे जतन, पर्यावरण संवर्धन व समाजोपयोगी उपक्रमांना चालना देण्यासाठी धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने 'गणेश गौरव महोत्सव-२०२६' अंतर्गत उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.




धाराशिव तालुका व शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

तालुका स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये, तर शहर स्तरावर अनुक्रमे ११ हजार, ७ हजार व ५ हजार रुपये रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

याशिवाय महिलांसाठी 'गौरी-गणपती सजावट स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक प्रबोधन, सांस्कृतिक वारशाचे जतन, सामाजिक सलोखा, पारंपरिक कार्यक्रम व समाजोपयोगी उपक्रमांच्या आधारे मंडळांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

गणेश मंडळे व महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, तसेच स्पर्धा नाव नोंदणीसाठी या नंबरवर ९१९७६३३३९९०८, ९१९९७५२२७७७१ साधावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांनी केले आहे.

## गुरुकुलचा विद्यार्थी पार्थ कदम इंडिगोमध्ये टेक्निशियन

### पहिल्याच प्रयत्नात मिळवले यश; शाळेतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ सप्टेंबर -**

अणदूर व परिसरातील ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षणासाठी परिचित असलेल्या श्री श्री गुरुकुल अणदूरचा माजी विद्यार्थी पार्थ व्यंकट कदम (जळकोट) याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पहिल्याच प्रयत्नात इंडिगो एअरलाईन्स, बंगळुरू येथे टेक्निशियन म्हणून यश संपादन केले.



पार्थ याचे नर्सरी ते दहावीपर्यंतचे संपूर्ण शिक्षण श्री श्री गुरुकुल अणदूर येथे झाले. त्यानंतर त्याने पुणे व संभाजीनगर येथे इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. त्याच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे, मुख्याध्यापक लक्ष्मण नरे, मुख्याध्यापक शिवराज भुजबळ व वर्गशिक्षक ज्ञानेश्वर बंडगर यांनी शाळेत त्याचा सत्कार केला.

शाळेतील शिक्षण व संस्कारांमुळेच हे यश मिळवता आले, अशी भावना पार्थ याने व्यक्त केली.

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पाठपुरावा सुरू

### पीक कापणी प्रयोग सप्टेंबरमध्येच; पंचनामे, अग्रीम अनुदान, पीक विम्यासाठी प्रयत्न : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

जिल्ह्यात निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांना तातडीने दिलासा मिळवून देण्यासाठी दररोज पाठपुरावा सुरू असून, यासंदर्भात काही महत्त्वाचे निर्णय झाले आहेत. शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देणे हीच आपली प्राथमिकता असून, त्यांच्या प्रश्नांवर प्रशासनाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे, अशी माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेताना पीक कापणी प्रयोग ऑक्टोबरऐवजी सप्टेंबरमध्येच घेण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे दुष्काळामुळे झालेल्या पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन लवकर होऊन शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याच्या प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा आहे.



जिल्ह्यातील गावागावांमध्ये पीक नुकसानीचे पंचनामे, दुष्काळी मदत, अग्रीम अनुदान तसेच पीक विम्याबाबत सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. संबंधित विभाग व यंत्रणांशी समन्वय साधून शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर मदत मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे पाटील यांनी सांगितले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबत प्रशासनाकडून कार्यवाही केली जात आहे. त्याचबरोबर टंचाईच्या पार्श्वभूमीवर उजनीचे पाणी जिल्ह्यात आणण्याच्या कामाचाही दररोज आढावा घेतला जात असल्याचे आमदार पाटील यांनी स्पष्ट केले.

संभाव्य अडचणी लक्षात घेऊन जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर स्वतः गांभीर्याने लक्ष देत असून, शेतकरी व नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक कार्यवाही केली जात आहे.

शेतकरी व नागरिकांचे सर्व प्रश्न मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहणार, अशी ग्वाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

## तुळजापूर-लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१६ सप्टेंबर -**

पाणलोट क्षेत्र विकास, जलसंवर्धन आणि वृक्षसंवर्धनाच्या माध्यमातून गावाचा शाश्वत व सर्वांगीण विकास कसा साधता येतो, याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी तुळजापूर व लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांची आदर्श गाव हिवरे बाजार येथे अभ्यास सहल आयोजित करण्यात आली. युवा मित्र संस्था आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक सहकार्याने धाराशिव जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांतर्गत हा अभ्यास दौरा घेण्यात आला.

या दौऱ्यात सहभागी शेतकऱ्यांनी हिवरे बाजारमधील जलसंवर्धन, पाणलोट क्षेत्र विकास, भूजल पुनर्भरण, वृक्षसंवर्धन तसेच गावाच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. या दौऱ्यामुळे यशस्वी गावाचा प्रत्यक्ष अनुभव मिळून गावाच्या शाश्वत विकासासाठी नवीन कल्पना व दिशा मिळाली.

## खड्डे आणि सांडपाण्यातून गणेश विसर्जन मिरवणूक कशी काढायची?

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१६ सप्टेंबर -**

शहरातील सोमवार गल्ली परिसरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि रस्त्यावर साचणाऱ्या सांडपाण्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. घरांमधून वाहून येणाऱ्या सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक गटारी व नाल्यांची व्यवस्था नसल्याने घाण पाणी थेट रस्त्यावर साचत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.



सोमवार गल्लीतील रस्त्यांची दुरवस्था; गणेश विसर्जनापूर्वी दुरुस्तीची नागरिकांची मागणी

शहरात सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरू असून, पुढील काही दिवसांत गणेश विसर्जनाची मिरवणूक याच मार्गावरून जाणार आहे. मात्र, रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि साचलेले सांडपाणी पाहता 'या परिस्थितीतून गणेश विसर्जनाची मिरवणूक कशी काढायची?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सोमवार गल्ली परिसरातील रस्त्यांची गेल्या अनेक वर्षांपासून आवश्यक ती दुरुस्ती झालेली नसल्याने जागोजागी खड्डे पडले आहेत.

त्यातच रस्त्याच्या कडेला गटारी व नाल्यांची पुरेशी व्यवस्था नसल्याने घरांमधील सांडपाणी रस्त्यावरच साचून राहत आहे. परिणामी पादचारी, वाहनचालक तसेच रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या परिसरात प्रभाग क्रमांक ७ आणि ८ चा भाग येतो. दोन्ही प्रभागांत सत्ताधारी आणि विरोधी गटाचे नगरसेवक असतानाही रस्ते व गटारींच्या समस्येकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

साचलेल्या घाण पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी निर्माण झाली असून, नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

विशेषतः वयोवृद्ध नागरिकांना या रस्त्यावरून ये-जा करताना त्रास सहन करावा लागत आहे.

> **विसर्जनापूर्वी तातडीने उपाययोजना करा**
>
> गणेश विसर्जन मिरवणुकीपूर्वी प्रशासनाने सोमवार गल्लीतील समस्येकडे तातडीने लक्ष देऊन रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, सांडपाण्याचा योग्य निचरा करण्यासाठी गटारी व नाल्यांची व्यवस्था करावी आणि परिसराची स्वच्छता करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## सोनेगावातील २६ वर्षीय युवक बेपत्ता

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

सोनेगाव येथील २६ वर्षीय अभिषेक रामलिंग सुतार हा युवक दि. १२ सप्टेंबर रोजी घरातून बाहेर पडल्यानंतर बेपत्ता झाला आहे. त्याचे अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, याप्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभिषेक हा वेल्डिंगचे काम करतो. दि. १२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास त्याने भाऊ सतीश याला सतीश सांगळे यांच्या शेडवर वेल्डिंगचे काम करण्यास सांगितले आणि आपण धाराशिवला जाऊन येतो, असे सांगून घरातून निघून गेला. मात्र, त्यानंतर तो घरी परतला नाही.

## विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वाला मिळाले व्यासपीठ; वैभवी गायकवाड प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वकलेला व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने रुईभर येथील जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य सेनानी विश्वनाथ आबा कोळगे सोसायटीच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे होते. पं.स. उपसभापती प्रमोद पाटील यांच्या हस्ते स्वातंत्र्य सेनानी विश्वनाथ कोळगे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विजेत्या विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत वैभवी गायकवाड हिने प्रथम, विद्या यादव हिने द्वितीय, श्रावणी ढोले हिने तृतीय, योगेश्वरी गडकर हिने चतुर्थ, तर श्रावणी जाधव हिने पाचवा क्रमांक पटकावला. यावेळी डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. गणेश शेटे यांनी मानले.

## 'एक गाव, एक गणपती'तून सामाजिक बांधिलकीला बळ

### गणेशोत्सवाच्या माध्यमातून गावाचा विकास आणि सामाजिक सलोख्याला चालना...

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वातंत्र्य चळवळीत समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली. त्यानंतर गणेशोत्सवाचे स्वरूप विस्तारत गेले. आता ग्रामीण भागात घरगुती व सार्वजनिक गणपतींसोबतच सामाजिक भान जपणारी 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पनाही मोठ्या प्रमाणावर रुजत आहे. धार्मिक उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत गावाच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे प्रभावी माध्यम म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींची प्रतिष्ठापना केली जाते. ग्रामीण भागातील अनेक गावांनी मात्र एकच गणपती बसवून संपूर्ण गावाने एकत्रितपणे गणेशोत्सव साजरा करण्याची परंपरा स्वीकारली आहे. यामुळे गावातील विविध घटक एकत्र येण्यासोबतच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि विकासात्मक उपक्रमांना चालना मिळत आहे.



गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी पोलीस प्रशासनावर असते. मर्यादित मनुष्यबळाच्या पार्श्वभूमीवर गावागावांत स्वतंत्र गणपतींच्या मिरवणुका आणि त्यातून निर्माण होणारे संभाव्य तणाव टाळण्यासाठी 'एक गाव, एक गणपती' उपक्रमाला प्रोत्साहन दिले जाते. पोलीस प्रशासनाकडून ग्रामस्थांच्या बैठका घेऊन शांततेत व सामाजिक सलोखा राखत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले जाते. उत्कृष्ट सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या गावांना विविध स्पर्धांच्या माध्यमातून प्रोत्साहनही दिले जाते.

सार्वजनिक गणेशोत्सव म्हटले की वर्गणी हा महत्त्वाचा भाग असतो. अनेकदा जमा झालेल्या वर्गणीचा उपयोग रोषणाई, सजावट आणि मिरवणुकीसाठी केला जातो.

मात्र, 'एक गाव, एक गणपती'च्या माध्यमातून हीच वर्गणी गावाच्या विकासासाठी आणि समाजोपयोगी कामांसाठी वापरण्याची दिशा अनेक गावांनी स्वीकारली आहे.

गाव स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, कचरा व्यवस्थापन, व्यसनमुक्ती, रक्तदान व आरोग्य शिबिरे, पशुधन आरोग्य तपासणी, महिलांचे सशक्तीकरण, मुलींच्या शिक्षणाबाबत जनजागृती, बेरोजगार युवकांसाठी लघुउद्योग मार्गदर्शन, वाचन संस्कृती संवर्धन, कृषी प्रदर्शन, शासकीय योजनांची माहिती तसेच शाळा व अंगणवाडी विकास अशा विविध उपक्रमांना गणेशोत्सवाच्या माध्यमातून चालना देता येते.

महिला, युवक, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग वाढल्याने सामाजिक विषयांवर जनजागृती करण्यासाठी गणेशोत्सव प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. पथनाट्ये, व्याख्यानमाला, शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धा तसेच प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती केली जात आहे.

> **गावाच्या विकासासाठी सामूहिक व्यासपीठ**
>
> 'एक गाव, एक गणपती'मुळे गावातील विविध घटक एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करतात. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत गावाच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची संधी या उपक्रमातून मिळते. त्यामुळे गावातील एकोपा, सामाजिक सलोखा आणि परस्पर सहकार्य वाढविण्यासोबतच विधायक कामांना चालना देणारी संकल्पना म्हणून 'एक गाव, एक गणपती' अधिक व्यापक होत आहे.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आज सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे साखळी उपोषण

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १६ सप्टेंबर : सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देयके व प्रलंबित निवृत्तीविषयक कामे तातडीने निकाली काढावीत, या मागणीसाठी चाकूर पंचायत समितीसमोर लातूर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन शाखा चाकूर यांच्या वतीने दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी साखळी उपोषण, तर मागण्या मार्गी न लागल्यास २ ऑक्टोबर २०२६ रोजी गांधी जयंतीदिनी आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या हक्काच्या देयकांसाठी वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न प्रलंबित राहिल्याचा आरोप दि. ०१ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी, उपदान (ग्रॅच्युइटी), रजा रोखीकरण, वेतन फरक तसेच इतर शासनमान्य लाभांशी संबंधित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रलंबित कामांमुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



## विविध वृत्त.....

### मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ सप्टेंबर : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आज गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ येथे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन होणार आहे. तत्पूर्वी हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण केले जाईल व मानवंदना दिली जाईल.

समारंभासाठी निमंत्रितांनी राष्ट्रीय पोषाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी १५ मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. या मुख्य शासकीय समारंभास सर्वांना उपस्थित राहता यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

### प्राचार्य चंद्रशेखर भोगडे सर यांचे निधन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ सप्टेंबर : दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे सदस्य तथा येथील बसवण्णाअप्पा वाले न्यू इंग्लिश मीडियम स्कूलचे आदरणीय प्राचार्य श्री. चंद्रशेखर चनबसप्पा भोगडे सर (वय ७९ वर्षे) यांचे मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता त्यांच्या लातूर येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने लातूरच्या शिक्षण क्षेत्रासह संपूर्ण शिक्षण जगतात आणि शालेय परिवारात मोठी शोककळा पसरली आहे.

कै. प्रा. चंद्रशेखर भोगडे सर हे एक कडक शिस्तीचे, कर्तव्यदक्ष आणि अत्यंत प्रेमळ मार्गदर्शक म्हणून ओळखले जात होते. दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटी आणि बसवणप्पा वाले न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांच्या पश्र्चात त्यांची पत्नी, एक मुलगी, मुलगा, सून आणि नातवंडे, तसेच त्याचा लहान भाऊ आणि त्यांचा संपूर्ण परिवार, असा मोठा आप्तपरिवार आहे.

### श्वान पथकात 'शक्ती 'चे आगमन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ सप्टेंबर : लातूर पोलीस दलाच्या श्वान पथकाच्या क्षमतेत आणखी एक भर पडली असून, बेल्जियन मॅलिनॉइस जातीचा 'शक्ती' हा श्र्वान दाखल झाला आहे. श्र्वान पथकाची स्थापना सन २००७ मध्ये झाल्यापासून प्रथमच या जातीचा श्र्वान पथकात दाखल झाला आहे. स्फोटक पदार्थांचा शोध घेण्यासाठी 'शक्ती'ला विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो सुरक्षा व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

लातूर पोलीस दलात दाखल झालेल्या या श्र्वानचे नाव पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी 'शक्ती' असे ठेवले. श्र्वान पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक कुलकर्णी, तसेच 'शक्ती'चे हँडलर पोलीस अंमलदार प्रदीप भालेकर आणि संजय जगताप यांनी 'शक्ती'ला पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्यासमोर हजर केले. यावेळी पोलीस अधीक्षकांनी त्याचे 'शक्ती' असे नामकरण केले. गणेशोत्सव, सार्वजनिक सभा, महत्त्वाचे कार्यक्रम, व्हीआयपी दौरे, गर्दीची ठिकाणे तसेच संवेदनशील ठिकाणी सुरक्षा तपासणी करताना त्याची मदत घेतली जाऊ शकते.

# जागा बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर कारवाईसाठी पालकमंत्री - मुख्यमंत्र्यांनाही भेटणार : मणियार

## प्लॉटवर अवैध कब्जा करणाऱ्या ९ जणांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ सप्टेंबर : लातूर शहर परिसरात जमीन, प्लॉटवर अवैधरित्या कब्जा करून त्या जमिनी इतरांना विक्री करण्याचा प्रयत्न होत आहे. आपल्याच भावाच्या पाखरसांगवी परिसरातील प्लॉटवर असा प्रयत्न झाला असून या प्रकरणी ९ आरोपींविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यांनी बुधवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली. प्लॉटचे कंपाउंड तोडून जबरदस्तीने वॉचमनला मारहाण करून हा गंभीर प्रकार घडल्याने यावरून आता लातूरमध्ये लॉट घेणे सामान्यांसाठी जिकिरीचे बनल्याचे दिसून येत असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.



अब्दुल गफार बद्दल रशीद मणियार यांच्या मालकीचे सहा प्लॉट पाखरसांगवी येथील गट क्रमांक ७७ मध्ये आहेत. या प्लॉटवर हाफिज शेख, रहेमतुल्ला शेख, बशीर शेख, विजय मस्के, सचिन देशमुख, गोपाळ लवटे, सतीश मानकुसकर यांनी कब्जा करण्याचा प्रयत्न केला. या मंडळींनी बनावट खरेदीखताद्वारे मौजे वरवंटी ता. लातूर येथील गट क्रं . ८५ च्या सातबाराच्या आधारे खोट्या व पाखरसांगवी मधील जमीन गट क्रं . ७७ चतुःसिमा भासवून ही जमीन गुंड प्रवृत्तीच्या मंडळींना विक्री केल्याची तक्रार एमआयडीसी पोलिसात दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तरीही या मंडळींकडून आपल्याला व आपल्या परिवाराला धोका असल्याची भीती राजा मणियार यांनी व्यक्त केली. आरोपींनी प्लॉटवरील सीसीटीव्ही कॅमेरे फोडले असून तेथील साहित्यही लंपास केले आहे. हा प्रकार गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी घडला असून याबाबत आपण आ. जयंतराव पाटील यांच्याशी अगदोर बोललो. आ. पाटील यांनी लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या कानावर हा विषय घातला. त्यानंतर आपण पोलीस अधीक्षकांशी बोललो, तेव्हा त्यांनी याप्रकरणी तुमच्या प्लॉटवर कोणी कब्जा करणार नाही,असा शब्द दिला. याविषयी पोलिसात गुन्हाही नोंद केला गेला आहे. यापूर्वीही अनेकदा या प्लॉटवर अनधिकृतपणे कब्जा करण्याचा प्रयत्न झाला आहे. यावेळचा प्रकार नेहमीपेक्षा भीषण होता. याप्रकरणी आपल्यावर खोटी अट्रॉसिटी दाखल होऊ शकते, आपल्यावर विनयभंगाची खोटी तक्रारही दाखल केली जाऊ शकते, अशी भीती व्यक्त करून राजा मणियार यांनी मागच्या चाळीस वर्षांपासून लातूरचे राजकारण करत असताना आपण सामान्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असल्याचे सांगितले.

लातुरात कोणाच्याही जागा, प्लॉटवर ठरवून जबरदस्तीने ताबा मिळवण्याचा प्रयत्न काही मंडळींकडून केला जात आहे. असा प्रकार कोणाच्याही बाबतीत घडला असेल तर संबंधितांनी कृपया योग्य त्या दस्तऐवजांसह आपल्याशी संपर्क साधावा. सामान्य लातूरकरांसाठी आपण ही लढाई लढणार असून येत्या हिवाळी अधिवेशनात माजी गृहमंत्री आ. जयंतराव पाटील, आ. रोहित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते महेबूब शेख यांच्या मार्गदर्शनाखाली विधिमंडळात आवाज उठविण्यासाठी आग्रही विनंती करण्यात येणार आहे. आपण लोकशाही मार्गाने न्याय मिळविण्यासाठी पालकमंत्री , मुख्यमंत्र्यांचीही भेट घेऊन हे प्रकरण त्यांच्याही कानावर घालणार आहोत. आपला प्लॉट बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांमागे कोण आहेत ? याचा शोध गृहखात्याने घ्यावा,अशी आपली आग्रही मागणी असल्याचेही राजा मणियार यांनी सांगितले. याप्रसंगी आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी गफार मणियार, शेळके, सिद्धेश्र्वर बिराजदार, प्रवीण साळुंके, चंद्रशेखर कत्ते, निशांत वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### उदगीरच्या इनलाईफ फिटनेसचा संभाजीनगरमध्ये गौरव! 'श्रेष्ठ फिटनेस ब्रँड अवॉर्ड २०२६'ने राधाकिशन डोंगरे सन्मानित




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १६ सप्टेंबर : फिटनेस क्षेत्रात आपल्या उत्कृष्ट कार्याचा ठसा उमटविणाऱ्या इनलाईफ फिटनेस, उदगीरचा प्रतिष्ठित 'श्रेष्ठ फिटनेस ब्रँड अवॉर्ड २०२६' देऊन गौरव करण्यात आला. संभाजीनगर येथे झालेल्या विशेष पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान सुप्रसिद्ध अभिनेत्री व गायिका वर्षा उसगावकर यांच्या हस्ते इनलाईफ फिटनेसचे संस्थापक राधाकिशन डोंगरे यांना प्रदान करण्यात आला.

इनलाईफ फिटनेसच्या माध्यमातून दर्जेदार फिटनेस सुविधा, आधुनिक व्यायाम उपकरणे, प्रशिक्षित मार्गदर्शन आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.

उदगीरसारख्या शहरातून सुरू झालेल्या इनलाईफ फिटनेसला मिळालेला हा सन्मान स्थानिक फिटनेस क्षेत्रासाठीही अभिमानाची बाब मानली जात आहे. पुरस्कार स्वीकारताना राधाकिशन डोंगरे यांनी हा सन्मान इनलाईफ फिटनेसच्या संपूर्ण टीमला आणि त्यांच्या सदस्यांना समर्पित केला. हा पुरस्कार म्हणजे आमच्या मेहनतीची पोचपावती असून, यापुढे आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा आहे. फिटनेस ही केवळ शरीराची नव्हे, तर निरोगी समाजाची गरज आहे, असे राधाकिशन डोंगरे यांनी सांगितले.

## पालकमंत्र्यांच्या भुमिकेकडे भादेकरांचे लक्ष

# मंजूरी कन्या शाळेची अन् घाट जिल्हा परिषद शाळेचा

तभा वृत्तसेवा /सुधीर गंगणे

औसा दि.१६ सप्टेंबर - औसा तालुक्यातील भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या बांधकामासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ९० लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला.यानंतर प्रशासनातील कांहीं मंडळींनी या कामात गावकऱ्यांना अंधारात ठेवून तांत्रिक खोडा घातला आहे.ज्या कामासाठी निधी मंजूर झाला तेच काम बाजूला ठेवून दुसऱ्या शाळेच्या उभारणीसाठी हेच प्रशासन कामाला लागले आहे.या कामाला दोन एकर जागा दान दिलेल्या गावकऱ्यांचा विरोध असून याच्या विरोधात गेल्या दोन दिवसांपासून आमरण उपोषण सुरू आहे.याच काळात मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाचे औचित्य साधून लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले लातूर येथे येत आहेत.यांमुळे पालकमंत्र्यांच्या भुमिकेकडे भादेकरांचे लक्ष लागले आहे.




गेल्या २५-३० वर्षांपासून जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा सुरू आहे.या शाळेच्या उभारणीसाठी गावातील ४०-४५ गावकऱ्यांनी दोन एकर जागा दान देवून शाळेच्या नावाने करून दिली.आ. रमेश कराड यांनी ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाची सोय आणि पालकांची अग्रीम मागणी लक्षात घेऊन या शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ९० लाख रूपयांचा निधी मंजूर करून देण्यात सिंहाचा वाटा उचलला.या कन्या शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी गुत्तेदाराला काम देण्यात आले असून यासाठी लागणारी कागदपत्रांची प्रक्रिया पुर्ण झाली आहे.

कन्या प्रशालेच्या इमारतीचे बांधकाम सुरू होणे गरजेचे असताना सुस्थितीत असलेल्या जिल्हा परिषद शाळेची इमारत लागणारी परवानगी न घेताच पाडली आहे. आणि कन्या शाळेचा मंजूर निधी जिल्हा परिषद शाळेसाठी वापरण्याचे षडयंत्र होत आहे.चांगल्या सुस्थितीत असलेल्या वर्ग खोल्या पाडताना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पर्यायी व्यवस्था केली नाही.तसेच विनापरवाना शाळेच्या शिक्षणाचे वेळापत्रक बदलून टाकले.या राजकीय ढंगात होत असलेल्या प्रकरणाची जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.यानंतर यांनी मंगळवार दि.१५ पासून आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.

पहिल्या दिवशी तालुका शिक्षण विस्तार अधिकारी, शिक्षण केंद्र प्रमुख व सहाय्यक केंद्र प्रमुख यांनी उपोषण स्थळी राम पाटील यांची भेट घेऊन मागण्या जाणून घेऊन कन्या शाळेसाठी नागरिकांनी जी जागा दान दिली त्याची पाहणी केली. यावेळी नागरिकांनी शाळा एकत्रिकरणाला विरोध दर्शविला आहे. दुसऱ्या दिवशी औसा गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांनी उपोषण स्थळी भेट दिली. पालकांच्या भावना व मागण्या जाणून घेत दीड तास चर्चा केली. यावेळी उपस्थित नागरिकांनी कन्या माध्यमिक शाळा स्वतंत्र रहावी.अशी मागणी केली.

याचबरोबर मुख्याध्यापक यांची सक्षम वर्ग खोल्या पाडताना,शाळेचे वेळापत्रक बदलतानाच्या गोलमाल भुमिकांची यावेळी चर्चा करण्यात आली.गटशिक्षणाधिर्काय़ांनी वरिष्ठांना आपल्या भावना कळवून माझे कर्तव्य पार पाडेन.असे आश्र्वासन उपोषण कर्त्यांना दिले.गेल्या दोन दिवसांत दोन वेळा संबंधित अधिकाऱ्यांनी उपोषण कर्त्यांची भेट घेतली मात्र अद्याप कोणतीही भुमिका स्पष्ट केली नाही.यामुळे उपोषण अजून किती दिवस सुरू राहणार?की प्रशासन या प्रकरणी पुन्हा एकदा वेळ ढकलीतच नेणार..? का पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर झालेले काम तात्काळ सुरू करण्याचे आदेश देऊन या प्रकरणाला पुर्णविराम देणार ...! याकडे भादेकरांसह तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ द्यावा : खासदार डॉ. काळगे

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ सप्टेंबर : जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्याला घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी योग्य नियोजन करावे आणि घरकुलाचे अनुदान कोणत्याही विलंबाशिवाय दिले जाईल यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीचे (दिशा) अध्यक्ष तथा खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी दिल्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली आज दिशा समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झाली.




या बैठकीला जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष उषाताई पाटील, आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, आमदार अमित विलासराव देशमुख, महापौर जयश्री सोनकांबळे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहूल कुलकर्णी यांच्यासह विविध पदाधिकारी, अशासकीय सदस्य व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत योजनांच्या लाभार्थी वयोवृद्ध व्यक्तींच्या आधार प्रमाणीकरणाच्या कामात येत असलेल्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, असेही खासदार डॉ. काळगे यांनी सांगितले. सध्या पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याने कृषी विभागाने तत्काळ अहवाल तयार करून शासनाकडे पाठवावा आणि पीक कापणी प्रयोग काळजीपूर्वक करून नुकसानीची अचूक नोंद करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. जिल्हा परिषद शाळांमधील स्वच्छतागृहांच्या दुरुस्तीची कामे प्राधान्याने हाती घेण्यात यावीत, तसेच पोषण आहाराच्या बाबतीत सर्व आवश्यक निकष काटेकोरपणे पाळले जावेत, असेही त्यांनी सांगितले.

यावर्षी जिल्ह्यातील एकही गाव स्मशानभूमीविना राहू नये, यासाठी व्ही. बी. जी. राम जी आणि जिल्हा वार्षिक योजनेतून कामे पूर्ण करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना आमदार विक्रम काळे यांनी यावेळी दिल्या. तसेच शहरी व ग्रामीण भागात एकही अंगणवाडी इमारतीविना राहू नये आणि सर्व अंगणवाड्यांना स्वतःची इमारत मिळावी, यासाठी जिथे जागा उपलब्ध नाही तिथे ती उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. कारण हा बालकांच्या शिक्षण व पोषणाचा अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार अमित देशमुख यांनी लातूर शहर भुयारी गटार योजनेची कामे गुणवत्तापूर्ण व गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. भुयारी गटाराच्या कामासाठी खोदलेल्या रस्त्यांची वेळेत दुरुस्ती न झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याने हे रस्ते तातडीने दुरुस्त करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. आगामी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक गावात व्ही. बी. जी. राम जी योजनेतून किमान एकतरी काम सुरू करावे, असे त्यांनी सांगितले. लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा धरणातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता अवैध पाणी उपसा रोखणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी महानगरपालिका, महसूल आणि पोलिस विभागाने संयुक्त पथक स्थापन करून आवश्यक कार्यवाही करावी, अशा त्यांनी दिल्या. प्रारंभी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे यांनी प्रास्ताविक केले. या बैठकीत केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. लोकप्रतिनिधी, अशासकीय सदस्य यांनीही यावेळी आपल्या सूचना मांडल्या. तसेच योजनांच्या अंमलबजावणीविषयी संबंधित शासकीय विभाग प्रमुखांनी माहिती दिली. सूत्रसंचालन जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे यांनी केले.

### कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष मोहीम

#### १० ते १५ सप्टेंबरदरम्यान ४६ शिबिरांमध्ये २३२ अर्ज प्राप्त

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ सप्टेंबर : जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर संबंधित तलाठी, ग्रामसेवक आणि मंडळ अधिकारी यांच्या संयुक्त पथकाद्वारे विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत १० ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्हाभरात एकूण ४६ शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांकडून कुणबी प्रमाणपत्रासाठी एकूण २३२ अर्ज प्राप्त झाले आहेत.

लातूर तालुक्यात १२ शिबिरे पार पडली असून त्यात सर्वाधिक १७४ अर्ज प्राप्त झाले आहेत. औसा व रेणापूर तालुक्यांत मिळून एकूण ७ शिबिरे घेण्यात आली, ज्यात २० अर्ज प्राप्त झाले असून २ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. औसा तालुक्यात ४ शिबिरांमध्ये ६ अर्ज प्राप्त झाले, ज्यापैकी १ अर्ज मंजूर झाला असून २ प्रकरणांत वंशावळ जुळविणे आणि ३ प्रकरणांत घरातील उर्दू दस्तऐवजांची पडताळणी करणे बाकी असल्याने ५ अर्ज प्रलंबित आहेत. रेणापूर तालुक्यात ३ शिबिरांमध्ये १४ अर्ज प्राप्त झाले, ज्यापैकी १ अर्ज मंजूर झाला असून १३ अर्ज छाननीसाठी वंशावळ समितीकडे पाठवण्यात आले आहेत. निलंगा उपविभागात एकूण १३ शिबिरांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये निलंगा तालुक्यात ४ शिबिरांत ३३ अर्ज प्राप्त झाले. जळकोट तालुक्यातील २ शिबिरांमध्ये ५ अर्ज प्राप्त आहेत. जिल्हा प्रशासनामार्फत १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत ही शिबिर मोहीम सातत्याने राबवली जात आहे.

